# माणूस

शनिवार । १ जानेवारी १९७७ । साठ पैसे

समतोल की वृद्धी ?

**या देशातील मुख्य प्रश्न अधिक उत्पादनाचा व त्यातून उंचावणाऱ्या राहणीमानाचा असला तरी 'राहणीमान' कशाचे बनवायचे व त्याचा मानदंड व त्याची मर्यादा कोणती, हे प्रश्न शिल्लक राहतातच. हा निर्णय प्रगत देशांची नक्कल करून घेतला जाणार असेल तर विनाश अटळच आहे...**

—डोनेला एच्. मेडोज
आणि त्यांचे सहकारी

# साप्ताहिक माणूस

**वर्ष सोळावे – अंक एकतिसावा**

**१ जानेवारी १९७७**

**मूल्य : साठ पैसे**

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये

सहामाही वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤


# वंदेमातरम्

मोहोर
६४–१७ एरंडवणा, पुणे ४.
३१–१२–७६

प्रिय सौ. अनुताईंना–

स. न. वि. वि. तुमचं कमलताईंना आलेलं पत्र वाचलं. मन गलबललं. तुमचं जीवन डोळ्यासमोर उभं राहिलं. आणि वाटलं, ३१ तारखेला तुम्हाला साठ वर्षं पुरी होतील त्या निमित्ताने मोठा समारंभ होवो अगर न होवो पण तुमच्या सहवासात अनेक वर्षे काढलेल्या, अनेक गोष्टी शिकलेल्या माझ्यासारखीला या दिवसाच्या निमित्ताने हृदय मोकळे करावयाला काय हरकत आहे? खरं म्हणजे, तुमच्यापेक्षा माझंच जीवन माझ्या डोळ्यासमोर आलं. आणि तुमच्या नंदादीपासारख्या सतत तेवणाऱ्या, त्यागी आणि कार्यरत आयुष्यांनी ते कसं उजळून गेलं आहे याची जाणीव झाली.

तुम्ही कमलताईंना लिहिलं आहे, 'एकसष्टीचा कार्यक्रम तुम्ही मंडळींनी करावा असं मला खरंच वाटत नाही. तुमच्या सर्वांच्याच त्यामागच्या आपुलकीच्या आणि स्नेहाच्या भावना मी समजू शकते. पण मी आयुष्यात असं मोठं काही असामान्य केलं आहे असं मला वाटत नाही. मर्यादित ध्येयवाद, मर्यादित कार्यशक्ती याला परिस्थिती लाभत गेली तेवढं माझ्या हातून झालं.' हे तुम्ही लिहिलंत तेच तुमच्या स्वभावाचं स्वच्छ द्योतक आहे. तुम्ही मला आणि माझ्यासारख्या अनेक कार्यकर्त्यांना जे दिलं आहे त्याचा अहंकार तर जाऊंच पण त्याची साधी जाणीवही तुमच्यात नाही. असामान्य कर्तृत्वाची प्रखरता तुमच्याजवळ नसेलही पण खोलवर मुळे जाणाऱ्या वृक्षाचा प्रचंड विस्तार होतोच. त्याला वेळ लागतो एवढेच. हे खोलवर रुजवण्याचं तुम्ही करत असलेलं कार्य मर्यादित असूच शकत नाही. ते एकदा रुजलं की झंझावातातही ते भरभक्कम राहतं. म्हणून माझ्यासारख्या अनेकांच्या मनात जो ध्येयवाद तुम्ही रुजवला आहात त्याचं स्मरण करण्याचा हा दिवस असं मी मानते.

तुमचा ध्येयवाद घेऊन तुम्ही उभ्या राहिल्या आहात विरोधी पक्षात. सत्तेपासून दूर आणि अलिप्त राहण्याच्या तुमच्या स्वभावाने तर तुमचे कार्य अधिकच खडतर आणि तपश्चर्येचे झाले आहे आणि तरीही तुम्ही ते एकनिष्ठतेने करत आहात, अमर्यादपणे त्यात तुम्ही स्वतःला वाहून घेतले आहे हे आम्ही बघत आहोत, आणि म्हणूनच आजच्या परिस्थितीत, तुम्ही म्हणता त्याप्रमाणे 'आपल्या वर्तुळातील सर्वच मंडळी अस्वस्थ असताना, ...माझ्यासारख्या एका साध्या कार्यकर्तीचा सोहळा व्हावा हे मला फार चमत्कारिक वाटत आहे.' असं तुम्हाला वाटणं सहाजिकच आहे. पण तुमचं हे अधिक खडतर झालेलं कार्य तुम्ही ज्या नेटाने रेटत आहा, आपली तपश्चर्या कमी पडली या जाणिवेने ती या वयातही अधिक उग्र करीत आहात त्याची आम्ही दखल घेतली नाही तर ती कृतघ्नताच नाही का?'

१९४३ साली मी कराडच्या जेलमधून येरवड्याला आले. सुशिला (आंबिके) पूर्वीच आली होती. त्यामुळे तशी भीती मनात नव्हतीच. पुणे, मुंबई नाशिक येथील मुलींचा एक मोठा ग्रुप तेथे होता. खेळावं, दंगा करावा, थोडं वाचावं अशा या आनंदी ग्रुपमध्ये मी चटकन् रमले. तुम्ही, मदन, मणिबेन, प्रेमाबाई अष्टपुत्रे व मृणालिनी यांचा, आमच्यापेक्षा वयाने थोडा मोठा असा तुमचा ग्रुप होता. खूप वाचन, सतत

कोणत्या तरी पुस्तकावर चर्चा, व एकूण गंभीरपणे बोलणारा हा तुमचा ग्रुप. मला आणि सुशिलाला त्यावेळी तुमच्याबद्दल फार आकर्षण होतं. पण त्यावेळी तरी तुमच्या-जवळ येणं जमलं नाही. एक तर आम्ही निराळ्या वातावरणातून आलो होतो. आणि आमची बौद्धिक वाढही फारशी नव्हती. पण त्यावेळी तुमच्याबद्दल अतिशय आदराची भावना घेऊनच मी बाहेर आले.

नंतर कै. दादाच्या मृत्यूने घरच कोसळलं. मीही दुसऱ्या वातावरणात आले. आणि सर्वच विसरले. पण तुमच्याबद्दलच्या आदराची ज्योत विझली नव्हती. समाजवादी महिला सभेच्या अभ्यासमंडळाच्या निमित्ताने मी तुमच्या ग्रुपमध्ये परत आले. तुमच्या सान्निध्यात आणि कार्यक्षेत्रात माझी समाजसेवेची गोडी नकळत वाढीस लागली.

१९६१ च्या महापुराच्यावेळी आपण जोडीने पूरग्रस्त मदतीचे कार्य केले. आणि त्यावेळी आपण खूपच जवळ आलो. त्यावेळच्या त्या जवळिकेतून आणि विचारातून निर्माण झाली ती 'श्रमसहकार महिला संघ' ही संस्था. आज तिची इमारत आहे, ४०-५० बायका अर्धवेळ काम करीत आहेत, पण आठवतात ते सुरुवातीचे कष्ट, अडचणी आणि तुमची जिद्द आणि आधार. त्यावेळी तुम्ही मला जे शिक्षण दिले आहे ते माझ्या आजच्या कार्याचा जीवनाधार आहे. कुठल्याही कामासाठी कुठेही गेलं तरी तुम्हाला ओळखणाऱ्या एकदोन तरी व्यक्ती तेथे असतच. आणि मग ज्या आदराने आपले काम केलं जाई ते मी प्रत्यक्षच अनुभवले होते. तुमच्या स्वभावाचा असंख्य माणसे जोडण्याचा हा गुण मला प्रथम त्यावेळी दिसला. या गुणामुळेच सरकारी मदतीपासून तो जर्मन मदतीपर्यंत मदत मिळवून संस्थेचा आर्थिक तोल तुम्ही सांभाळलात. तुम्ही कुणाला कधी कमी लेखलं नाहीत. पण संस्थेचं हित आणि वैयक्तिक हित याचं भान तुम्ही कधी सुटू दिलं नाहीत. या भिन्न गोष्टींचा वेगवेगळा विचार करण्याची दृष्टी तुम्ही मला दिलीत.

तुमच्या कौटुंबिक जीवनाबद्दलही माझ्या मनात सदैव एक गूढ होतं. शिरुभाऊंचं जीवन झपाटलेलं आणि धाडसी तर तुम्ही शांत आणि विचारी. प्रश्न पडे या झपाटलेल्या जीवनाने शांत जीवनावर मात केली की शांत जीवनाने झपाटलेल्या जीवनाला सखोलता आणली? सुनिताच्या लग्नात तुम्ही आणि शिरुभाऊ दोघांनाही सारख्याच उत्साहाने आणि प्रसन्नतेने काम करताना पाहिलं आणि तो प्रश्न सुटला. शिरुभाऊमधली आईची माया आणि तुमच्यामधली गृहिणीसचीव यांचा सुरेख संगम मी अनेक वेळा पाहिला आहे. सुनिताला मुलगा झाला तेव्हा तुम्हा दोघांना मी दवाखान्यात पाहिलं आणि आजी आजोबांचं प्रेम तुमच्या दोघांच्या चेहेऱ्यावर वाचायला मिळालं. बरं सुनिता एकुलती एक म्हणून तिचे विलक्षण लाड वगैरे कधी मी पाहिलं नव्हतं. पण तिचं व्यक्तिमत्त्व वाढावं म्हणून सतत चालू असलेले तुमचे विचारही माझ्या परिचयाचे होते. अशा अनेक लहानमोठ्या प्रसंगी तुमचा समंजसपणा, विचार करण्याची पद्धती, वागण्याची पद्धती या सर्वच गोष्टींनी माझ्यावर परिणाम केला आहे आणि तुमच्याबद्दलचा आदर आणि प्रेम दिवसेंदिवस वाढवले आहे.

तुम्ही प्रथम उत्तम गृहिणी आहात की उत्तम समाजकार्यकर्त्या आहात हा प्रश्न मला नेहमीच पडत असे. तुम्हाला घरातलं काम करताना बघितलं की वाटतं तुमचा पिंड सुगृहिणीचाच अधिक असला पाहिजे. निरनिराळे पदार्थ हौसेने करून बघ, पापड घाल, लोणची घाल, घर सजव वगैरे गोष्टीत कुठल्याच गृहिणीपेक्षा तुम्ही कमी नाही. ज्या आवडीने तुम्ही समाजकार्य करता त्याच आवडीने तुम्ही राजकारण करता आणि तितक्याच उत्साहाने आणि आवडीने तुम्ही आपले घर सजवता आणि आतिथ्य करता.

आणि मला वाटतं म्हणूनच आपल्या कार्यातले गृहिणीवर्ग फार यशस्वी होतात. गृहिणीवर्गाची कल्पना तुमची, त्याचा कार्यक्रम आखण्यात पुढाकार तुमचा आणि त्याची आखणीही तुमचीच. स्त्रियांना सर्वात आवश्यक गोष्टींवर तुम्ही अचूक बोट ठेवलेले आहे. खेडेगावातील गृहिणीवर्गाचा शिक्षणक्रम, शहरातील शिक्षणक्रम, आधुनिक मुलीला आवश्यक असलेला शिक्षणक्रम, किती सांगोपांग अभ्यास तुम्ही या विषयाचा केला आहे ते पाहिलं म्हणजे तुम्ही हाडाच्याच शिक्षिका आणि संघटक आहात हे पटतं. मी काय शिकवलं यापेक्षा शिकणाऱ्याच्या पदरात किती पडलं याकडेच तुमचं लक्ष अधिक. प्रत्येकाची कुवत ओळखून त्याला गरज असलेल्या गोष्टी देणं ही गोष्ट सामान्य नाही. ही किमया साधायला माणसाशी जवळीकही असायला हवी आणि त्याबरोबर त्याच्यापेक्षा उच्च स्तरावरही वावरायला यायला हवे. आणि हे करीत असताना एक प्रकारची अलिप्तताही वृत्तीमध्ये यायला हवी. तुमच्याजवळ याची वाण नाही म्हणूनच माझ्यासारख्या सामान्य स्त्रीलासुद्धा तुम्ही तिची कुवत ओळखून योग्य कार्यक्षेत्रात काम करावयास प्रवृत्त केलेत. तुमच्यापासून कार्याची प्रेरणा घेतलेल्या अशा अनेक भगिनी आहेत. त्या सर्वांच्याच हृदयाचे बोल मी या पत्राने व्यक्त करीत आहे. त्या सर्वांच्या वतीने मी तुम्हाला प्रदीर्घ आयुरारोग्य चिंतिते.

तुमची

**चंपा**

(श्रीमती अनुताई लिमये यांना दि. ३१ डिसेंबर १९७६ रोजी ६० वर्षे पुरी होतात त्यानिमित्त श्रमसहकार महिला संघ (मर्यादित) या संस्थेच्या माजी अध्यक्ष चंपा कुलकर्णी यांनी त्यांना लिहिलेले अनावृत्त पत्र.)

# आर्थिक वृद्धीचा अंत

चंद्रकांत केळकर

अठराव्या शतकात पाश्चात्य देशात जी लोकसंख्येत वाढ झाली त्याबद्दल माल्थस या अर्थशास्त्रज्ञाने त्यावेळी पाश्चात्य जगाला धोक्याचा इशारा दिला होता. अमेरिका व इंग्लंड या देशांमधील लोकसंख्येच्या वाढीचा वेग अन्नउत्पादनाच्या वाढीपेक्षा अधिक होता, त्यामुळे अन्नपुरवठ्याच्या मानाने लोकसंख्या अधिक होऊन उपासमार, रोगराईने लोकसंख्या घटेल, असे त्याचे भाकीत होते. ही आपत्ती टाळण्याचा लोकसंख्या नियंत्रित करणे, हा त्याच्या मते एकच उपाय होता. परंतु त्यावेळी त्याच्या या ईशाऱ्याची एकच निराशावादी भविष्य म्हणून संभावना झाली. कारण त्यानंतर शेती व उद्योग यांमध्ये झालेल्या क्रांतीने त्याचे दारिद्र्य व रोगराईचे भविष्य खोटे ठरविले. त्याने गृहीत धरलेल्या अन्न व इतर वस्तूंच्या उत्पादनावरील मर्यादा तंत्रविद्येच्या जोरावर उल्लंघून मानवाने एकप्रकारे निसर्गाच्या मर्यादेवर मात केली. किंबहुना त्यानंतरचा मानवाचा इतिहास त्याने नैसर्गिक मर्यादांशी केलेल्या यशस्वी झुंजीचाच आहे. पण हे करत असताना त्याचे सामाजिक ध्येयधोरणावर जे परिणाम झाले, त्यामुळे अधिकाधिक उपभोग हे अर्ध्या कमीशा जगाचे ध्येय बनले. त्या ध्येयाचा पाठपुरावा करताना वेगाने जवळ येणाऱ्या नैसर्गिक सामग्रीच्या मर्यादांचे भान त्याला राहिले नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर जी तांत्रिक क्रांती झाली तिने तर नाना वस्तूंचे उत्पादन प्रचंड प्रमाणात वाढत आहे. 'आर्थिक वृद्धी' ( Economic Growth ) ही सबंध जगाचे उद्दिष्ट बनली आहे. या उद्दिष्टामागे आंधळेपणाने धावणाऱ्या जगाला पुन्हा एकदा माल्थसचा इशारा "लिमिटस् टु इकॉनॉमिक ग्रोथ" या ग्रंथात डोनेला एच. मेडोज् आणि त्याच्या सहकाऱ्यांनी दिला आहे.

आजच्या संपन्नतेबरोबरच अस्तित्वात असलेले दारिद्र्य, नैसर्गिक परिसराची होणारी वाढती दुरावस्था, मानवानेच आजपर्यंत निर्माण केलेल्या संस्थांवरील त्याचा उडालेला विश्वास, बेकारी, तरुणांची परात्मता ( alienation ) व अनेक आर्थिक आरिष्टे या आजच्या मानवापुढच्या समस्या आहेत. एकाच वेळी या समस्यांना, आर्थिक राजकीय व सामाजिक बाजू आहेत. ह्या समस्यांचे मूलभूत स्वरूप जरी मनुष्याला आकलन झाले असले तरी त्यांची उत्तरे शोधताना समस्यांच्या परस्परावलंबित्वाचे भान तो ठेवीत नाही. त्यामुळे त्याला अचूक उत्तर मिळत नाही. हे परस्परावलंबित्व विचारात घेऊन समस्यांची उकल करण्याचा प्रयत्न मेडोज्च्या या ग्रंथात केला आहे. या समस्यांची उत्तरे शोधण्याची व त्याप्रमाणे कृती करण्याची अतिशय निकड आहे. कारण जर काही मिश्रित धोरण आखून आज कृती केली नाही व आजची परिस्थिती आजच्या पद्धतीनेच चालू राहिली तर आणखी फार तर एका शतकातच जगाचा विनाश अटळ आहे, असे या अभ्यासगटाला वाटते.

हा विनाशाचा काळ इतक्या नजीक आला आहे, असे या अभ्यासगटाला का वाटावे? लोकसंख्या, अन्नोत्पादन, औद्योगिक उत्पादन, भरून न येण्यासारख्या (non-renewable) नैसर्गिक सामग्रीचा वापर व प्रदूषण या पाच गोष्टी यादृष्टीने महत्त्वाच्या आहेत. ज्या वेगाने या गोष्टींमध्ये बदल होत आहेत, तो वेग घातांकाच्या (exponential) आहे. या घातांकाच्या वेगाला विशेष महत्त्व आहे. अशा वेगाने ज्यावेळी बदल होतो, त्यावेळी होणारी वाढ किंवा घट सुरुवातीच्या काळात विशेष जाणवत नाही. परंतु नंतरच्या काळात होणारी वाढ किंवा घट प्रचंड होत जाते. याचे उदाहरण असे देता येईल, बक्षीस म्हणून राजाकडे बुद्धिबळाच्या पटावरील प्रत्येक घरामागे धान्याचे दाणे मागणाऱ्या धूर्ताची ती गोष्ट आहे. पटावरील प्रत्येक घरामागे त्याला द्यायची दाण्याची संख्या भूमितिश्रेणीने वाढते व पहिल्या काही घरांकरता धान्याचे काही दाणे बक्षीस घेणारा धूर्त चौसष्टाव्या घरात राजाचे कोठार रिकामे होईल इतकी धान्याची पोती बक्षीस म्हणून घेऊन जातो.

घातांकाच्या वेगाचे दुसरेही एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. प्रचंड वेगाने परिस्थितीतील बदल आणीबाणी निर्माण होईपर्यंत लक्षात येत नाही; व त्यामुळे आपण गाफील राहतो. हे वैशिष्ट्यही एका उदाहरणाने स्पष्ट करता येईल. समजा एका तळ्यात दररोज दुपटीने कमळे उगवतात; व ती वाढ होऊ दिली तर ते तीस दिवसांत कमळांनी पूर्णपणे भरते. परंतु २९ व्या दिवशी पाहिले तर ते तळे कमळांनी अर्धेच भरलेले दिसेल. तळे अर्धे मोकळे आहे म्हणून आपण गाफील राहू. पण काही करायचे असेल तर एकच दिवस शिल्लक राहिलेला असतो. एका दिवसात तळे पूर्णपणे भरल्यावर संधी हातची निघून गेलेली असेल. मानवापुढची आजची परिस्थिती अशीच आहे. वाढती लोकसंख्या, वाढते उत्पादन त्यामुळे भरून न येणारी नैसर्गिक सामग्रीतील वाढती घट व वाढते प्रदुषण यामुळे घातांक वेगाने जवळ येणारा मानवी जगाचा विनाश टाळायचा असेल तर या घडीला काही कृती करणे आवश्यक आहे. फक्त २५ वर्षांनी जरी उशीर केला तरी हा विनाश अटळ आहे. जितका लवकर विनाश टाळण्याचा माणूस प्रयत्न करील तितकी त्याला यश मिळण्याची शक्यता अधिक आहे. या प्रयत्नातून त्याला आजच्या तथाकथित 'प्रगती' घडून जागतिक समतोलाकडे जाणे शक्य होईल,

### वृद्धीच्या समस्येचे स्वरूप

आजच्या जगात लोकसंख्या, अन्नोत्पादन, औद्योगिक उत्पादन, मर्यादित निसर्गसामग्री व प्रदूषण हे घटक पूर्वी उल्लेखिलेल्याप्रमाणे

माणसापुढील समस्या निर्माण करीत आहेत. या घटकांतील परस्पर-पूरकता व घटकातील बदलाचा वेग या दोन गोष्टी या समस्येला कारणीभूत आहेत.

लोकसंख्या वाढत असल्याने अन्नोत्पादन वाढविणे क्रमप्राप्त आहे. परंतु अन्नोत्पादनाच्या वाढीवर जमिनीच्या उपलब्धतेची मर्यादा आहे. अन्नाच्या वाढत्या उत्पादनाला भांडवलाचे वाढते उत्पादन आवश्यक आहे. औद्योगिक उत्पादनही प्रचंड वेगाने वाढत आहे. परंतु त्या उत्पादनावरही नैसर्गिक सामग्रीच्या उपलब्धतेची मर्यादा आहे. अन्नोत्पादन व औद्योगिक उत्पादन यांच्या वाढीबरोबरच प्रदूषणही वाढत आहे. या वाढत्या प्रदूषणाचा लोकसंख्येवर परिणाम होत आहे, अशा तऱ्हेने हे घटक परस्परावलंबी आहेत.

या घटकांतील बदलांचा वेगही वैशिष्ट्यपूर्ण आहे. जगातील लोकसंख्या १६५० पर्यंत विशेष वेगाने वाढत नव्हती. याचे कारण जन्म व मृत्यूचे प्रमाण हे दोन्ही अधिक होते व त्यामध्ये फारसा फरक नव्हता. त्यानंतर नाना तऱ्हेच्या उपायांमुळे मृत्यूचे प्रमाण खूप घटले; परंतु जन्मप्रमाण तेच राहिले. त्यामुळे अलीकडे लोकसंख्येचा वार्षिक वाढीचा वेग २·१% असा झाला आहे व याच वाढीने लोकसंख्या वाढत राहिली तर ती येत्या ३० वर्षांत आजच्या दुप्पट म्हणजे ७ अब्जपर्यंत जाईल. हा वेग घटण्याला काही कारण दिसत नाही.

अन्नोत्पादन हे एकूण जमिनीच्या उपलब्धतेवर व ते वाढवण्याकरता वापरल्या जाणाऱ्या भांडवली वस्तूंवर अवलंबून आहे. जमिनीचा तुटवडा आजच जाणवत आहे. एकूण ७·८६ अब्ज एकर जमीन शेतीला योग्य अशी आहे. उरलेली जमीन लागवडीखाली आणणे अतिखर्चाचे आहे. उपलब्ध जमिनीचा विचार करता विसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत जमिनीची तीव्र टंचाई निर्माण होईल. अनेक शतकेपर्यंत जी जमीन मुबलक वाटत होती ती येत्या वीस वर्षांत अपुरी वाटू लागेल. जरी शेतीखेरीज इतर कारणांकरता जमीन वापरली नाही व जमिनीची उत्पादकता दोन पटीने वाढली तरी जमिनीची टंचाई थोडी उशीरा जाणवेल इतकेच. या टंचाईमुळे इतर पूरक भांडवली घटक वापरून जमिनीचा वापर अधिक सघनपणे केला तरी अन्नोत्पादनावरील मर्यादा जाणवणे अपरिहार्य आहे. जगाच्या अनेक भागात ती आजच तीव्रपणाने जाणवत आहे.

जमिनीला पूरक भांडवली सामग्री वापरून उत्पादन वाढविले तर नैसर्गिक सामग्रीचा वापर वाढत्या प्रमाणात होत राहील. तसेच अन्य उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाचा जो वाढता वेग आहे, त्यामुळेही भांडवलनिर्मितीचा वेग वाढत आहे. या वेगाचेही स्वरूप लोकसंख्येच्या वाढीच्या वेगासारखेच म्हणजे भूमितिश्रेणीचे किंवा घातांकाचेच आहे. त्यामुळे शेती व औद्योगिक उत्पादन यांच्या भांडवलाकरता लागणाऱ्या नैसर्गिक सामग्रीतील (उदा. खनिजे) घट विलक्षण वेगाने होत आहे. चालू उद्योगांना लागणाऱ्या अनेक खनिजांचा साठा आता वेगाने घटू लागला आहे. त्यांपैकी काही खनिजे आज ज्या प्रमाणात वापरली जातात त्या वापराच्या वाढीचा वेगही घातांकाचा आहे. ती खनिजे या शतकाच्या अखेरपर्यंत संपुष्टात येतील. खनिजसाठ्यांचे हे अंदाज चालू वापर कायम राहील, असे गृहीत धरून केले आहेत.

भांडवलनिर्मितीचे वैशिष्ट्यही लोकसंख्येसारखे आहे. एका बाजूला भांडवलामध्ये भर पडत असते व दुसऱ्या बाजूला त्याची झीज होत असते. उत्पादनाचा आहे तो वेग जर राखायचा असेल तर भांडवलवाढीचा वेग झिजेच्या वेगापेक्षा सतत अधिक असणे आवश्यक असते. म्हणजे अधिक उत्पादन तर अधिक तर अधिक भांडवलनिर्मिती—म्हणून अधिक झीज—म्हणून त्याहून अधिक भांडवलनिर्मिती. त्यामुळे भांडवलनिर्मितीचा वेग हा अधिकाधिक वाढवीत राहणे अपरिहार्य होते, म्हणजेच हा वेग पुन्हा सतत वाढणारा असा बनतो.

या वेगवान उत्पादनामुळे सांडसामग्रीचा ( effluent ) व त्यातून होणाऱ्या प्रदूषणांचा प्रश्न निर्माण होतो. अशी सांडसामग्री एका मर्यादेपर्यंत जिरवून घेण्याची व्यवस्था निसर्गामध्ये आहे. प्रत्येक प्रकारच्या प्रदूषणाबाबत ही मर्यादा किती आहे. याचा निश्चित अंदाज अद्याप उपलब्ध नाही. परंतु कोणत्याही प्रकारच्या प्रदूषणाचे प्रमाण वाढले की ते घातुक होते. मासातील पाऱ्यांचा अंश, हवेतील शिसे, शहरात साचत असलेला कचरा, कोळशाच्या वापरातून निर्माण होणारा कार्बन डायॉक्साइड, समुद्राच्या पाण्यावर तरंगणारे तेल—हे सर्व प्रदूषणांचे प्रकार, माणूस ज्या प्रकारे निसर्गदत्त सामग्रीचा उधळेपणाने वापर करीत आहे, त्यातून निर्माण झालेले आहेत. या प्रकाराच्या प्रदूषणांनी माणूस ज्या परिसरात राहतो त्याचा समतोल बिघडत चालला आहे. तांत्रिक बदलानेही प्रदूषणाचा प्रश्न सुटत नाही. उदा. कोळशाऐवजी अणूशक्ती जरी शक्तीच्या ( energy ) उत्पादनाकरिता वापरली तरी अणुशक्तीतून उत्सर्जनाचे प्रश्न निर्माण होतातच.

अशा प्रदूषणांचे दोन विशेष आहेत. एक तर तेही प्रचंड वेगाने वाढत आहे; व त्याचे दुष्परिणाम जाणवण्याइतके व्हायला बराच काळ लोटतो. अन्नोत्पादन व औद्योगिक उत्पादन द्रुत गतीने वाढत असल्याने प्रदूषणही त्याच वेगाने वाढत असल्याचे मोठ्या शहरातून आढळते. तसेच त्याचा परिणाम लक्षात येण्याजोगा व्हायला वेळ लागत असल्याने तो दुष्परिणाम टाळण्याला उशीर होतो.

## निष्कर्ष

अभ्यासगटाने वरील पाच घटकांतील बदलाच्या आजच्या प्रवृत्ती गृहीत धरून गणकयंत्रांच्या साहाय्याने काही निष्कर्ष काढले आहेत. एक तर, जी नैसर्गिक सामग्री आहे तिच्या मर्यादेमुळे अन्नोत्पादन व औद्योगिक उत्पादन यांची वाढ खुंटेल व त्यामुळे 'विनाश' जवळ येईल. जरी तंत्र संशोधनामुळे सामग्री वाढविता आली किंवा सामग्रीचा पुन्हा वापर करता येईल, असे गृहीत धरले तरीही जोपर्यंत उत्पादनाचा वेग हा घातांकाचाच राहतो तोपर्यंत वृद्धीला पडणाऱ्या मर्यादेचा काळ काही थोड्या प्रमाणात पुढे ढकलेल इतकेच; विनाश टाळता येणार नाही. या भौतिक ( physical ) मर्यादेबरोबरच प्रदूषणाची मर्यादाही तीव्रतेने जवळ येते. प्रदूषणाचे नियंत्रण पूर्णपणे करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. ते नियंत्रण काही थोड्या प्रमाणात केले व ती मर्यादा पुढे ढकलली तरी जमीन अपुरी पडू लागते. जमिनीचा हा अपुरेपणा जसा अन्नोत्पादनाकरता जाणवतो तसाच तो बिगर शेतीच्या वापराकरताही जाणवतो. त्यामुळे एका बाजूला अन्नोत्पादन कमी होत जाऊन दुसऱ्या बाजूला ते अधिकाधिक खर्चाचे होते. या सर्व परिस्थितीचा विचार करून अभ्यासगट

अशा निष्कर्षाप्रत येतो की, आजच्या व्यवस्थेत काही महत्त्वाचे बदल झाले नाहीत तर लोकसंख्या व उद्योग यांची वाढ येत्या शतकाच्या अखेरीला खुंटेल.

या निष्कर्षाविषयी जरी अभ्यासगट निःशंक असला तरी त्याविषयीच्या मर्यादांची जाणीव त्याला आहे. उदा. सामाजिक व्यवस्थेमध्ये जे बदल होतात किंवा नैसर्गिक सामग्रीच्या दृष्टीने जी प्रादेशिक विषमता आहे त्याचा विचार केला तर त्या निष्कर्षामध्ये बदल करावा लागेल, याची त्यांना जाणीव आहे. किंबहुना ही विनाशाची आपत्ती टाळण्याकरिता आजच्या समाजपद्धतीत, ध्येयधोरणात बदल करणे आवश्यकच आहे, याचे भानही त्यांना आहे. परंतु असे असले तरी मूळचा निष्कर्ष त्यामुळे बदलत नाही. उलट, सामग्रीच्या साठ्याच्या प्रादेशिक विषमतेमुळे जसजसा हा साठा केंद्रित होत जाईल, तसतसे मध्यपूर्वेतील तेलासारखे किंवा चिलीतील तांब्यासारखे नवीनच राजकीय प्रश्न निर्माण होतील, असे अभ्यासगटाला वाटते.

## तंत्रविज्ञानाच्या मर्यादा

अन्न, साधने वगैरेंच्या अपुरेपणाची जाणीव होण्याची ही वेळ मानवाच्या इतिहासात पहिलीच नाही. ज्या ज्या वेळी हा अपुरेपणा माणसाला जाणवला त्या त्या वेळी तंत्रज्ञानाच्या जोरावर त्याने या अपुरेपणावर मात केली आहे. त्यामुळे आताही त्याच तंत्रविज्ञानाची कास धरून सामग्रीच्या मर्यादांवर मात करणे स्वाभाविक आहे. परंतु ही शक्यता गृहीत धरूनही अभ्यासगटाने आपला निष्कर्ष कायम ठेवला आहे. तंत्रविज्ञानातील बदल गृहीत धरले तरी विविध प्रकारच्या त्रुटींची जाणीव फार काळ पुढे ढकलणे शक्य होणार नाही. मुख्य म्हणजे प्रदूषणामुळे निर्माण होणारी मर्यादा नजीक आल्यावरच तिची जाणीव होईल; व त्यावेळी इतका उशीर झालेला असेल की विनाश टाळण्यासाठी काही करता येण्यासारखे उरलेले नसेल.

## विनाश टाळण्याचा उपाय : समतोल

ही 'जगबुडी' टाळण्याचा एकच व आताच अमलात आणायला हवा असा मार्ग अभ्यासगटाने सुचविला आहे. जगाला 'वृद्धी' कडून 'समतोला' कडे नेणारा हा मार्ग आहे. या मार्गाचे उद्दिष्ट आजच्यासारखे वाढते राहणीमान व म्हणून वाढते उत्पादन हे नसून त्यामध्ये भांडवल व लोकसंख्या यांचा आकार निश्चित असेल. या समतोलात जन्म-मृत्यूची प्रमाणे खालच्या पातळीवर व समान असतील; त्याचप्रमाणे भांडवलनिर्मिती व तिची झीज ही प्रमाणेही किमान पातळीवर राहतील. या दोहोंतील वेग व सामाजिक धोरण यात सुसंवाद असेल.

हा समतोल प्रस्थापित करणे म्हणजे स्थितिशीलता पत्करणे नव्हे. या समतोलातही गतिमानता असू शकेल. यामध्ये अधिक वरच्या पातळीवर माणसाच्या किमान गरजा भागविणे, त्याला दीर्घ आयुरारोग्य मिळवून देणे व उरलेल्या सामग्रीचा वापर माणसाचे ऐहिक जीवन सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न करण्याकरता करणे, हे या धोरणाचे भाग असतील. तसेच जगाची अवस्था तंत्रविज्ञानाच्या आंधळ्या वापराने झाली असली तरी त्यामुळे तंत्रविज्ञान त्याज्य ठरविणे हे डोळसपणाचे लक्षण ठरणार नाही. तंत्रविज्ञानाच्या वापराला या समतोलाच्या अवस्थेतही अवसर असेल. सामग्रीचा पुनर्वापर कसा करता येईल, प्रदूषणाचे प्रमाण कमी करून निसर्गातील समतोल जास्तीत जास्त कसा राखता येईल, याचे संशोधन करण्याकरता तंत्रविज्ञानाचा वापर करणे इष्ट होईल.

## 'समतोला' ची किंमत

समतोलाच्या या अवस्थेत मानवाच्या काही स्वातंत्र्याचा संकोच होणे अपरिहार्य आहे. उदा. त्याला अनियंत्रित जननाचे किंवा अधिकाधिक उपभोगाचे स्वातंत्र राहणार नाही. परंतु आयुष्यसंपन्न जगण्याजोगे करणारी इतर स्वातंत्र्ये तो उपभोगू शकेल. दुष्काळ, प्रदूषण, युद्ध यांच्या छायेखाली सतत वावरण्यापेक्षा व त्यामुळे विपन्न असे आयुष्य जगण्यापेक्षा, जीवनावश्यक अशा सर्व वस्तू उपभोगून जी उसंत मिळेल किंवा जी सामग्री उरेल त्याचा वापर दीर्घ व सुदृढ आरोग्य, शिक्षण, कला वगैरे सांस्कृतिक अंगाच्या जोपासनेकरता करणे दूरदर्शीपणाचे व सुज्ञपणाचे ठरेल.

## सारांश

अभ्यासगटाच्या वरील विवेचनातून पुढील निष्कर्ष निघतात— (१) आज मनुष्यसमाज नैसर्गिक सामग्रीचा प्रचंड वेगाने वापर करीत आहे. लोकसंख्या वेगाने वाढत आहे. याबरोबरच निसर्गातील प्रदूषण वाढत आहे. त्यामुळे अन्न व इतर उत्पादन यावर भौतिक (physical) मर्यादा पडतील. व मानवी समाजाचा विनाश लवकरच ओढावेल. (२) या मर्यादा जाणवण्याचा काळ मनुष्य तंत्रविज्ञानाच्या साहाय्याने काही काळ पुढे ढकलू शकेल. परंतु ती परिस्थिती तो टाळू शकणार नाही. (३) यांवर उपाय म्हणून मानवाने आर्थिक 'वृद्धी' हे आपले ध्येय बदलून 'समतोल' राखणे, हे ध्येय ठेवावे. यामुळे आजच्या राहणीमानावर प्रतिकूल परिणाम होऊ न देताही माणसाला सांस्कृतिकदृष्ट्या अधिक संपन्न असे जीवन जगणे शक्य आहे. (४) हे आजच करणे निकडीचे आहे; अन्यथा वेळ निघून गेलेली असेल.

## खरेच; ही आपत्ती अटळ आहे का? दुसरा दृष्टिकोन

अभ्यासगटाच्या वरील विवेचनातून दोन प्रश्न उपस्थित होतात : (१) आर्थिक वृद्धीवर अभ्यासगटाने म्हटल्याप्रमाणे खरेच भौतिक मर्यादा आहेत का? (२) त्या नसल्या तरी आर्थिक वृद्धी हे ध्येय इष्ट आहे का?

आर्थिक वृद्धीवर मर्यादा पडण्याचे कारण नाही. आजही त्या अस्तित्वात नाहीत. अभ्यासगटाची जी गृहिते आहेत त्यामुळे अपरिहार्यपणे तो आपल्या 'मर्यादां'च्या निष्कर्षाप्रत येतो. नैसर्गिक सामग्रीविषयीची अभ्यासगटाची गृहितेही अधिक सावध आहेत. तशी ती असण्याची आवश्यकता नाही. अशी टीका सोलो आदीकरून टीकाकारांनी केली आहे.

सोलोच्या मताने नैसर्गिक सामग्री जरी वेगाने वापरली असली तरी ती संपुष्टात येऊ लागली आहे हे खरे नाही. कारण तसे असते

तर गेल्या ५० वर्षांच्या काळात या सामग्रीच्या किंमती वाढल्या असत्या; त्या वाढलेल्या नाहीत. तसेच या नैसर्गिक सामग्रीवर पडणाऱ्या मर्यादा विचारात घेताना तंत्रविज्ञानामुळे त्या सामग्रीची वाढणारी उत्पादकताही विचारात घेतली पाहिजे. सोलोच्या म्हणण्याप्रमाणे नैसर्गिक सामग्रीच्या एवढ्या वापरानंतरही ज्याअर्थी तिच्या किंमती वाढलेल्या नाहीत त्या अर्थी ही मर्यादा जवळ आलेली नाही.

सोलो (Solow) यांचा दुसरा युक्तिवाद असा की आज जी बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्था आहे तीमध्ये नैसर्गिक सामग्रीची मर्यादा जाणवू लागल्यावर त्यांचा वापर टाळण्याचे सामर्थ्य बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेमध्ये अंगभूत आहे. नैसर्गिक सामग्रीच्या टंचाईबरोबर तिच्या किंमती वाढतात व त्यांचा वापर कमी होतो व पर्यायी सामग्रीचा वापर सुरू होतो. त्यामुळे सामग्रीची टंचाई तात्पुरती ठरते. क्रांझबर्ग (Krazberg) यानेही याच संदर्भात तंत्रविज्ञानाच्या कामगिरीकडे अभ्यासगटाने दुर्लक्ष केल्याचे म्हटले आहे. तंत्रविज्ञानाने नवीन नैसर्गिक सामग्रीचा नवनवीन पद्धतीने वापर करणे शक्य केले आहे व ही भौतिक मर्यादा वेळोवेळी झुगारली आहे. त्यामुळे तंत्रविज्ञानाच्या या महत्त्वाकडे अभ्यासगटाने दुर्लक्ष केल्याचा आरोप क्रांझबर्गने केला आहे.

सोलो व क्रांझबर्ग यांची ही टीका समर्थनीय नाही. एक तर ज्या बाजाराच्या क्षमतेवर सोलो विश्वास ठेवून युक्तिवाद करतात तो विश्वास आता इतिहासजमा झाला आहे. बाजारातील किंमतीच्या द्वारा सामग्रीचे जे वाटप होते ते अनेक दृष्टींनी सदोष असते. हे आता सर्वमान्य आहे. बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेत सामग्रीचा वापर अनावश्यक गोष्टींवर कसा होतो हे मिशान ( Mishan ) या अर्थशास्त्रज्ञाने चपखल उदाहरण घेऊन दाखविले आहे. ते म्हणतात, "जाहिरातींचा खर्च टाळता येण्यासारखा आहे. या जाहिरातींना लागणाऱ्या कागदाकरता जंगले तोडावी लागतात. 'न्यूयॉर्क टाइम्स'च्या रविवारच्या एका अंकामध्ये असलेल्या जाहिरातीकरता लागणारा कागद १५० एकरांवरील जंगलांच्या लाकडाइतका असतो. खेळांकरता या भूमीचा वापर करता येईल."

जरी बाजाराच्या या क्षमतेकरता सार्वजनिक हस्तक्षेपाची व नियंत्रणाची आवश्यकता सोलो मान्य करीत असले तरी मागणी व पुरवठा यांतील संतुलनाची जबाबदारी प्रामुख्याने बाजारावर सोपवावी, असा आग्रह धरणे आजच्या काळात विसंगत आहे. किंबहुना एवढ्या प्रचंड वापरानंतरही नैसर्गिक सामग्रीच्या किंमती न वाढणे हे त्या बाजाराच्या कार्याच्या अपयशाचेच गमक आहे, असेच म्हणणे योग्य होईल. कारण उद्योगप्रधान देशांनी आपल्या खरेदीच्या एकाधिकाराने नैसर्गिक सामग्रीच्या किंमती पाडून ठेवण्यात यश मिळविले आहे, हा गेल्या एक-दीड शतकाचा इतिहास आहे. त्यामुळे सोलो यांचा युक्तिवाद खोटा ठरतो. नैसर्गिक सामग्रींच्या न वाढलेल्या किंमती हे सामग्रीच्या लवचिक पुरवठ्याचे लक्षण नसून बाजारातील खरेदी-विक्रीच्या व्यवहारातील विषमतेची ती स्थिती हे गमक आहे, असे म्हणावे लागते.

शिवाय बाजाराच्या कार्यक्षमतेवर अवलंबून राहताना बाजारामध्ये जी मागणी व्यक्त होते ती योग्य प्रकारची म्हणजे सामाजिक गरजांच्या श्रेणीप्रमाणे-असते, असे गृहीत धरणेही चुकीचे आहे.

तंत्रविज्ञानावरील जो विश्वास क्रांझबर्गने व्यक्त केला आहे, त्याबद्दलही असेच म्हणता येईल. गेल्या १५० वर्षांच्या विशेषत: गेल्या ५० वर्षांच्या काळात जे तांत्रिक बदल झाले त्यामुळे तंत्रविज्ञानावरचा व मानवाचा त्याबाबतीतील सर्जनशीलतेवरचा विश्वास दृढ होणे स्वाभाविक असले तरी ते चुकीचे नाही असे म्हणता येणार नाही. भौतिक मर्यादा एवढ्यात नजीक येत असता एवढ्या अल्प काळात किती प्रकारच्या नैसर्गिक सामग्रीला पर्याय शोधून काढता येतील, ही मिशान यांनी व्यक्त केलेली शंका रास्तच वाटते. एकाच वेळी चांदी, सोने, शिसे, तांबे, प्लॅटिनम, कथिल व जस्त या धातूंच्या त्रुटीमुळे त्यांना पर्याय शोधून काढावे लागतील. या असंभाव्यतेशिवाय अँडरसन यांनी याबाबतीतील मांडलेला मुद्दा महत्त्वाचा आहे. तंत्रविज्ञानाबाबत अँडरसन यांचे म्हणणे असे की नवीन तंत्राच्या वापरामध्ये "भौतिक व सामाजिक विलंब" अनुभवाला येतात. त्यामुळे तंत्राचा वापरही विलंबाने होतो. उदाहरणार्थ शक्तिचा वापर जर दुपटीतिपटीने वाढत असेल व त्याकरता अणुशक्तीच्या केंद्राविषयीचे निर्णय घ्यायचे असतील, तर त्यात विलंब होणे अपरिहार्य आहे. व त्याप्रमाणात शक्तीच्या टंचाईमुळे "ब्लॅक आउटस्" टाळणे कठीण आहे. या अडचणी लक्षात घेतल्या तर असे होता येईल की नवीन यंत्राच्या संशोधनाची शक्यता मान्य केली तरी त्याच्या वापरामध्ये विलंब होईल व त्यातून निसर्ग सामग्रीची मर्यादा प्रत्ययास येईल. अँडरसनना तर असेच वाटते की तंत्रविज्ञानाचा हा विलंब हेच मर्यादा निर्माण करायला एकमेव कारण पुरेसे आहे.

अभ्यासगटाने तंत्रविज्ञानाकडे दुर्लक्ष केलेले आहे, किंवा त्याचे महत्त्व जाणले नाही, हे खरे नाही. कारण 'समतोल' प्रस्थापित करायचा तर त्याकरताही नवीन तंत्राची आवश्यकता अभ्यासगटाला मान्यच आहे. नैसर्गिक सामग्रीच्या मर्यादांवर मात करणे, हे तंत्रविज्ञानाचे एकमेव उद्दिष्ट असू शकत नाही. तर ज्या भिन्न प्रकारच्या जीवनपद्धती निर्माण होतील. भांडवल, लोकसंख्या व अन्नोत्पादन यांच्या ज्या विविध पातळ्या असतील त्यांमध्ये निवड करण्याकरताही तंत्रविज्ञानाचे महत्त्व आहे.

अभ्यासगटाच्या विवेचनातून दुसरा प्रश्न निर्माण होतो, तो, वृद्धी इष्ट आहे का ? हा तत्त्वज्ञानातील प्रश्न आहे व त्याचे उत्तर माणसाच्या सध्याच्या जीवनाबद्दलच्या दृष्टीकोनावर अवलंबून आहे. यात दोन पक्ष आहेत. तंत्रविज्ञानाने माणसातील अंतर जे कमी केले आहे त्यामुळे पूर्वी कधी नव्हे एवढा माणूस एकमेकांजवळ आला, याबद्दल त्याला कौतुक आहे. दुसऱ्या पक्षाला माणसातील हे कमी होणारे अंतर त्याच्यातील परात्मता वाढवीत आहे असे मानणारा आहे व म्हणून असा बदल तो अनिष्ट मानतो. या दोन दृष्टीकोनांत सामंजस्य निर्माण होणे कठीण आहे.

## नवोदित राष्ट्रे व वृद्धी

अभ्यासगटाच्या निष्कर्षाचे नवोदित राष्ट्रांच्या दृष्टीने काही महत्त्व आहे का ? का ती अद्याप अविकसित असल्याने 'वृद्धी'ची

पृष्ठ ३२ वर

# सत्ता की संघटना?

## सर्वांचे डोळे सत्तेकडे

वा. दा. रानडे

ओरिसामागोमाग पश्चिम बंगालमध्येही मुख्यमंत्री बदलला जाईल असे वाटले होते, पण तसे घडलेले नाही. सध्या तरी तडजोडीने संघर्ष मिटविण्यात आला आहे. मुख्यमंत्रिपद टिकविण्यासाठी सिद्धार्थ शंकर रे यांना मोठी किंमत द्यावी लागली. आपल्याकडचे गृह व पोलिसखाते त्यांना तरुण कांति घोष यांच्याकडे सोपवावे लागले. प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी सहा मंत्र्यांची समिती नेमण्यात आली आहे. या समितीत निम्मे रे-विरोधी गटाचे आहेत. याचा अर्थ रे विरोधी गटाच्या संमतीशिवाय कोणताही महत्त्वाचा निर्णय घेऊ शकणार नाहीत. गृह व पोलिसखाते ज्यांच्याकडे सोपविण्यात आले ते तरुण कांति घोष रे-विरोधी गटाचेच आहेत. मुख्यमंत्र्यांकडून हे महत्त्वाचे खाते काढून हा एक प्रकारे त्यांच्यावर अविश्वासच नाही काय? रे मुख्यमंत्रिपदावर राहिले असले तरी त्यांची सत्ता बरीच कमी झाली आहे.

मुख्यमंत्र्यांची निवड, मंत्रिमंडळाची निवड, मंत्र्यांचे खातेवाटप याबाबत निश्चित संकेत रूढ करण्याची आवश्यकता आहे. मुख्यमंत्र्याची म्हणजेच सत्तारूढ पक्षाच्या नेत्याची निवड विधिमंडळ पक्षाने बहुमताने करावी. प्रदेश काँग्रेस, काँग्रेसचे केंद्रिय पार्लमेंटरी बोर्ड यांनी याबाबतीत कोणताही हस्तक्षेप करू नये. ही प्रथा रूढ व्हायला हवी. पण निरनिराळ्या राज्यात नेते ज्या पद्धतीने निवडले गेले आहेत ते पाहिले म्हणजे नेता निवडीत विधिमंडळ पक्षाला काही महत्त्व राहिलेले नाही, असे दिसते. गेल्या वर्षी बन्सीलाल यांचा केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश झाला तेव्हा त्यांच्या जागी हरियानाचा मुख्यमंत्री नेमताना विधिमंडळ पक्षाला डावलण्यात आले. बनारसीदास गुप्ता हे मुख्यमंत्री होतील, असे श्रेष्ठींनी ठरविले. त्यांचा शपथविधीही झाला. पक्षाने नेता निवडायचा असतो, याची कोणाला आठवणही झालेली दिसली नाही. दोन दिवसांनी मग पक्षाची बैठक भरून नेतेपदी बनारसीदास गुप्ता यांची औपचारिक निवड करण्यात आली. पंतप्रधानांनीच नेत्याची निवड करावी, अशी त्यांना विनंती केली जाते. या नेत्याला आम्ही एकमुखी पाठिंबा देऊ, अशी आश्वासने दिली जातात. पण काही महिन्यांनी गटबाजी पुनः डोके वर काढते आणि नेता बदलण्याची मागणी केली जाते. वारंवार नेता बदलण्याने निर्माण होणारी अस्थिरता टाळण्यासाठी दोन-तृतीयांश बहुमताच्या पाठिंब्याशिवाय नेता बदलता येणार नाही, असा संकेत रूढ केला पाहिजे. पक्षाने एकदा नेता निवडल्यानंतर मंत्रिमंडळ निवड आणि खातेवाटप याबाबतीत त्याला पूर्ण स्वातंत्र्य हवे. मुख्यमंत्र्याने दिल्लीला जाऊन मंत्र्यांची यादी आणि खातेवाटपाची यादी मंजूर करून घेण्याची काय आवश्यकता आहे? पण आपल्याकडे काँग्रेस पक्षाची मंत्रिमंडळे याच पद्धतीने बनविली जातात. ही पद्धत रूढ होण्याचे कारण पक्षातील गटबाजी. मंत्रिमंडळात निरनिराळ्या गटांना योग्य प्रतिनिधित्व आपण दिले आहे. याची खात्री पटविण्यासाठी मुख्यमंत्री दिल्लीला जाऊन यादी मंजूर करून घेतात. श्रीमती नंदिनी सत्पथींनी दिल्लीची संमती न घेता मंत्रिमंडळाची पुनर्घटना केली आणि त्यांना मुख्यमंत्रिपद गमवावे लागले. आमच्या राजकारणावरील गटबाजीचा प्रभाव दूर झाल्याशिवाय मंत्रिमंडळ निवड आणि खातेवाटपाबाबत निकोप लोकशाही संकेत रूढ होणे कठीण आहे.

कारभारात सुधारणा करण्याच्या दृष्टीने पश्चिम बंगालमध्ये दोन नवे उपक्रम करण्यात आले आहेत. एक उपक्रम म्हणजे सहा मंत्र्यांची समिती तिचा उल्लेख वर केलाच आहे. 'अंतर्गत व्यवहार समिती' असे नाव या समितीस देण्यात आले आहे. केंद्रीय मंत्रिमंडळात अशी समिती आहे. पण राज्यपातळीवर अशी समिती प्रथमच नेमण्यात येत आहे. सर्व महत्त्वाच्या प्रश्नावर दोन्ही गटांच्या सहकार्याने व विचारविनिमयाने निर्णय घेतले जावेत, हा त्यामागे उद्देश आहे. दुसरा उपक्रम म्हणजे प्रत्येक खात्यासाठी काँग्रेस आमदारांची समिती नेमण्यात येणार आहे. त्या खात्यासंबंधीचे निर्णय घेतांना या समितीच्या शिफारशी विचारात घेतल्या जातील. केंद्रात प्रत्येक खात्यासाठी खासदारांची सल्लागार समिती असते. त्याच धर्तीवर हा उपक्रम आहे. पण दोहोंमध्ये एक फरक म्हणजे केंद्रीय खात्यांच्या समित्यांवर विरोधी पक्षांचेही प्रतिनिधी असतात. पश्चिम बंगालमधील नियोजित समित्यांवर फक्त काँग्रेस पक्षाचे सभासद राहतील. काँग्रेस सभासदांपुरत्याच या समित्या मर्यादित न ठेवता केंद्राप्रमाणेच विरोधी पक्षांचे काही सभासद त्यावर का घेऊ नयेत? हे उपक्रम पश्चिम बंगालपुरतेच मर्यादित आहेत की इतर राज्यांतही ते सुरू करण्याचा वरिष्ठ काँग्रेसनेत्यांचा विचार आहे? कदाचित पश्चिम बंगालमधील या समित्यांच्या कार्याचा अनुभव लक्षात घेऊन यासंबंधी निर्णय घेतला जाईल? मंत्रिमंडळातील सहा मंत्र्यांची वेगळी अंतर्गत व्यवहार समिती नेमण्याची खरोखर आवश्यकता आहे का? अशी समिती नेमल्याने या मंत्र्यांना भलतेच महत्त्व येईल. इतर मंत्र्यांपेक्षा हे मंत्री श्रेष्ठ मानले जातील. मंत्रिमंडळातील सहकार्यास व एकजुटीस हे पोषक नाही.

आम्ही सहकार्याने काम करू असे आश्वासन दोन्ही गटांच्या नेत्यांनी पंतप्रधानांना दिले आहे. गेल्या सप्टेंबरमध्येही असेच आश्वासन त्यांनी दिले होते पण ते पाळले गेले नाही. दोन्ही गटांचे सहकार्य कितपत टिकते यावर सध्याच्या समझोत्याचे यश अवलंबून आहे.

गुजरातमधील नेतृत्वाचा संघर्ष मिटविण्यासाठी हितेंद्र देसाईंना केंद्रीय मंत्रिमंडळात घेण्यात आले व माधवसिंह सोळंकी यांच्या नेतृत्वाखाली गुजरातेत काँग्रेसचे नवे

मंत्रिमंडळ अधिकारावर आले. आणीबाणी जाहीर झाली त्यादिवशी म्हणजे २५ जून १९७५ ला हितेंद्रभाईंनी संघटना काँग्रेसचा राजिनामा दिला. त्यानंतर तीन महिन्यांनी त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला व त्यानंतर सव्वा वर्षाने केंद्रीय मंत्रिमंडळात त्यांचा समावेश झाला आहे. पक्षांतरित नेत्याला एवढे महत्त्वाचे पद देणे योग्य होते का ? पक्षांतराच्या अनिष्ट प्रथेला त्यामुळे उत्तेजन मिळणार नाही का ? तसाच विचार केला तर गुजरात विधान सभेत काँग्रेसचे जे बहुमत झाले आहे ते इतर पक्षांचे सभासद फोडल्यामुळे झालेले नाही काय ? किमलोप म्हणजे गुजरातचे माजी मुख्यमंत्री चिमणभाईंनी काँग्रेसशी बंडखोरी करून काढलेला पक्ष. या पक्षाचे पाठिंब्याने मंत्रिमंडळ बनविले म्हणून जनता आघाडीवर काँग्रेसनेत्यांनी टीका केली होती पण त्याच किमलोपचे सभासद काँग्रेसला मिळाले व त्याना सन्मानाने काँग्रेसप्रवेश मिळाला. वास्तविक अशा संधिसाधूना काँग्रेसने पक्षाची दारे बंद करायला हवी होती पण आपले बहुमत करून मंत्रिमंडळ बनविण्याची घाई काँग्रेसला झाली होती ना ? पक्षांतर केलेल्या सभासदांने राजिनामा देऊन नव्या पक्षाच्या तिकिटावर निवडून आले पाहिजे असा संकेत सर्वच राजकीय पक्षांनी पाळायला हवा. देशातील सर्वात मोठा पक्ष म्हणून काँग्रेसने तर या बाबतीत इतरापुढे आदर्श ठेवायला हवा, पण काँग्रेस काय किंवा विरोधी पक्ष काय कोणालाच या प्रश्नाबद्दल आस्था दिसत नाही. आपल्या फायद्याचे असते तेव्हा पक्षांतराला सर्वच पक्ष उत्तेजन देतात. पक्षांतराला आळा घालण्यासंबंधीचे बिल पार्लमेंटपुढे गेली दोन अडीच वर्षे पडून आहे. गटबाजीप्रमाणेच पक्षांतर ही आमच्या लोकशाहीला लागलेली कीड आहे. कडक उपाय योजून या दोन्ही किडींचे समूळ उच्चाटन केले पाहिजे. शिस्तबद्ध पक्षाची त्याशिवाय उभारणी होणार नाही ? आणि शिस्तबद्ध पक्ष नसेल तर कोणताही कार्यक्रम निर्धाराने व यशस्वीपणे अंमलात आणता येणार नाही. आमचे सारे राजकारण सत्ताभिमुख झाल्याने हे दोष निर्माण झाले आहेत. शिस्तबद्ध पक्ष संघटना उभारण्याच्या कार्याकडे दुर्लक्ष होत आहे. प्रदेश काँग्रेस अध्यक्षांनी वास्तविक संघटनेच्या कार्यालाच का वाहून घेऊ नये ? पण त्यांनाही मंत्रिपदाचा मोह आवरत नाही. उत्तर प्रदेश काँग्रेस अध्यक्षांना मंत्रिमंडळात घेण्यात आले. कर्नाटकमधही तसेच घडत आहे आणि गुजरात प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हितेंद्र देसाईंना तर केंद्रीय मंत्रिपद मिळाले. सारेच जण मंत्री होऊ लागले तर संघटनेचे कार्य कोण करणार व ती बळकट होणार कशी ? □

# सोलकढी

## □ रजेशीर नोकरीने हैराण

नोकरीच्या बाबतीत मी भाग्यवान आहे. नोकरीतले काम माझ्या आवडीचे आहे. आणि मुख्य म्हणजे मला करण्यासारखे आहे. मला झेपली असती अशी कामे एकुणात एवढी कमी आहेत की त्यातलेच एक करून नोकरी साजरी होते ही व्यवस्था मोठी ऐटबाज आहे. बरे कामाच्या हिशेबात पैसेसुद्धा बऱ्यापैकी मिळतात : म्हणजे मनात आणले तर रोजच्या रोज मी बासमती तांदुळाचा भात आणि माशाचे कालवण सोलकढीबरोबर खाऊ शकेन, अशी फक्कड परिस्थिती आहे. शिवाय नोकरीचे उरकल्यावर जो ढीगभर वेळ मोकळा उरतो त्यातला अर्धापाऊण ढीग वेळ मस्त माझाच असतो. त्याचे मी काही पण करू शकतो.

आणि करतोही. मात्र ढीगभर वेळ कामाच्या मापट्यांनी उपसत बसावे लागत नाही मला. मी आपली कलाकुसरीची सुबक कामे करत राहतो, आणि वेळेचा उपसा झपाझपा होत राहतो. शेवटी माझ्या हातात वेळ नसतो आणि कंटाळाही नसतो. वेळाकामांची पारडी अशी समतोल राखली गेली म्हणजे कधी कधी त्यातले एखादे मुद्दाम झुकवून कंटाळयाची अथवा थकव्याची चटकचैन करता येते.

ही योगविद्या आपल्यालाही शिकवावी अशी कारुण्यपूर्ण विनंती काही अमेरिकनांनी अनंतरावाला नुकतीच केली. त्याचे असे झाले : अमेरिकेतल्या मोटारकारखान्यात काम करणाऱ्या कामगारांनी नको तेवढे काम केले. कारखानदारांनी त्यांना नको तेवढे प्रोत्साहन दिले. कामगारसंघटनांनी त्यांचे नको तेवढे कार्यक्षम नेतृत्व केले. या सर्वांतून नको तेवढे उत्पादन आणि नको तेवढा नफा झाला. त्यामुळे कामगारांवर आता नको तेवढ्या रजेची आपत्ती कोसळली आहे. चार दिवस काम आणि तीन दिवस रजा, अशी आठवड्याची सुटसुटीत व्यवस्था लागली आहे. पण या रजेशीर नोकरीने कामगार हैराणहप् झाले आहेत. चार दिवसांच्या कामाचे ठीक आहे; पण तब्बल तीन दिवसांच्या रजेचे काय ? तिच्यात करायचे काय आणि किती ? ती कंटाळ्याशिवाय गुजरायची कशी ? एकाच पद्धतीचे काम माणूस वर्षानुवर्षे सहन करू शकतो; पण एकाच पद्धतीची रजा फार काळ सहन करणे त्याला शक्य नसते. आणि रजाक्रमणाची नवी नवी पद्धत सारखी सारखी आणायची कोठून ?

म्हणून अनंतरावांची पायधरणी. आता, 'कंटाळा हमखास घालवण्याच्या दहा हजार आणि एक युक्त्या' यासारखी एखादी पुस्तिका लिहायच्या कामाला मी तडक लागावे हे बरे. याने बाकी काही साधले नाही तरी मला तात्पुरता आलेला कंटाळा तर जाईल. अशी पुस्तिका लिहिणे ही कंटाळा घालवण्याची युक्ती क्रमांक दहा हजार दोन होय.

—अनंतराव

ललित लेख

# जेव्हा मनाचा सूर्य बोलू लागतो

नीता चंद्रकांत शहा

तो १०-३५ च्या बसमध्ये चढला, कसातरी शरीराचा चोळामोळा झालेल्या नि मेलेल्या आत्म्यासहित. बसमध्ये नेहमीप्रमाणेच खूप गर्दी होती. एका अवाढव्य बाईशेजारी कशीतरी जागा मिळाली. तो अधिकच आखडला. त्याने सहज इकडे तिकडे मान वळविली–सगळीकडे माणसेच माणसे नि एक गुदमरून टाकणारा कोंदट वास. पुढच्याच स्टॉपवर एक लेकुरवाळी बाई बसमध्ये उभी राहिली. त्याने स्वत: उठून तिला जागा करून दिली. त्यात स्त्री-दाक्षिण्यापेक्षा सुटकेचाच भाग अधिक होता. त्याला माहिती होतं की, ही थकलेली पावलं शेवटी कुठेतरी आपणहूनच आधार घेतील. शेवटच्या स्टॉपपर्यंत जाणारा बहुदा तो एकटाच असावा. शेवटी तो एका रिकाम्या खिडकीपाशी टेकला. बसल्या बसल्या तो चढणाऱ्या नि उतरणाऱ्या प्रवाशांकडे पाहात होता नि बस सुरू झाल्यानंतर रस्त्यावरच्या लोकांना.

पुढचे स्टॉप एका हॉटेलसमोर होते. बस थांबली नि सूर आले–

'गाये चला जा गाये चला जा
एक दिन तेरा भी जमाना आएगा '

त्या वैशाखाच्या दुपारीही त्याला पावसात चिंब भिजल्यासारखे झाले. इथेच उतरूया का? पण तोपर्यंत बस सुरूही झाली होती. प्रत्येक वेळी निर्णय घेतां घेता असाच उशीर होऊन काळ असाच पुढे निसटला होता. तशाही स्थितीत त्याला हसू फुटलं–एक स्वप्नं होऊन! आता कसला जमाना येतोय? तो कधीचाच गेला. ज्या वेळी आपण होऊन आपल्याच हातांनी स्वप्नं तिजोरीत ब्लॉक केली तेव्हाच. ज्या प्रकाशात टॉलस्टॉयचे चरित्र वाचून मनाने केवढी स्वप्ने पाहिली होती. त्या प्रकाशात ब्लोअप पाहून तो कधी नव्हता एवढा मोठा झाला होता. सायगलच्या सूरात हरवला होता. पण आता त्याला तानसेनचे सूर ऐकूनही काही होत नव्हते. पूर्वी सारे काही होते. डोळ्याशी स्वप्ने होती; मनाशी मोर होते.

आपण पूर्वीच्याच वाटेने गेलो असतो तर? उगीचच दोन वाटा पाहून गोंधळलो. डोळे झाकून वाट निवडली, मनात नसताना-अनोळखी. ज्या रस्त्यावर कधी मखरही फिरकले नव्हते, त्या रस्त्यावर पोपडे आलेल्या भिंतीसारखा तो मख्ख उभा होता.

पुन्हा बस थांबली, कुणीतरी ट्रान्झिस्टर घेऊन आत चढला. बहुधा परिवार नियोजनावर मिळाला असावा. खरच आपल्याला मुलं हवी होती नाही? आपण काय नाव ठेवणार होतो बरं त्याचं, छानच होत, चू, तेही एवढ्यात विसरलो.

तेवढ्यात ऐकू आलं–' ये दुनिया अगर मिल भी जाय तो क्या है?'

त्याला गुरूदत्त आठवला, शांत चित्ताने झोपी जाणारी ॲन रेड आठवली. सानेगुरूजींवरची भक्तीसुद्धा उफाळून आली. आत्महत्या करणारे सारे मोठे मोठे सुखी (?) कलाकार जीव आठवले. डोळ्यापुढून सरकले. परत एकदा आत्महत्येच्या इच्छेने उबळ घेतली. त्याचे तोंड एकदम कडू झाले. त्याने बाहेर पाहिले. समोरची बाग मुकी मुकी दिसत होती; फुलं रडत होती, रस्त्यावरची माणसं प्रेतासारखी भासत होती. लाख स्वप्नांनी भरभरून येणारे डोळे निर्जिव वाटत होते. रस्ता खचत खचत चालला होता. सारं निर्जीव–निस्तेज! खरंच आपण कशाकरिता नि कुठे चाललो? कुणाकडे? आपलं कोण? कुणाचे आपण? छे, कुणीच कुणाचे नाही. घर, स्मशान, –तेही आपल्याला सध्या बंद आहे.

पुन्हा बस थांबली, ७-८ जण घाईघाईत उतरले नि ९-१० जण चढले. त्याला वाटत राहिले, ह्यांना काय काम असावे? सारेच एवढ्या घाईत कसे जगतात? त्यांच्या दृष्टिकोनातून आपला विचार तो करीत राहिला. तेवढ्यात एकजण लोंबकळून आत चढला. बरीच दाढी वाढलेला, निस्तेज चेहऱ्याचा. स्थिर पण तेजस्वी नजर, त्यात कुठे तरी एक वेदना, एक स्वप्न, एक आग. त्याला आपल्या जागेवरून सुद्धा जाणवत होती. काहीतरी चेहऱ्यावरचे लपविण्याचा त्याचा निष्फळ प्रयत्नही त्याला सुखावून गेला.

'तडपने भी नहीं देती हमें मजबूरीयाँ अपनी.'

त्याच्या शेजारी जाऊन बसावं का? समसमा संयोग होईल का? की समान गुणधर्मात रिपल्शन जाणवेल? तो फटकळच असणार. खरंच काही माणसे फक्त दु:ख भोगण्यासाठीच जन्माला आलेली असतात. जन्मापासून दु:खाचं जड ओझं डोक्यावर घेऊन विनातक्रार वाट चालत असतात. त्यांच्या कंटाळवाण्या प्रवासाचा त्यांना कधीच कंटाळा येत नाही. अगदी मेताकुटीस येऊन मटकन् खाली बसली की, दैव एखादा बारीक सुखाचा किरण दाखवितो नि तेवढ्यानेच वखवखलेल्या मनाने धडपडून उठून ती पुन्हा शेवटी तीन हात जगाकडे जाणारी वाट चालू लागतात. ज्या वाटेचे तीन हात कधीच संपणार असतात. हा त्यातलाच असेल काय? तो त्याच्याकडे लक्षपूर्वक पाहत राहिला. त्यात नि आपल्यात काहीतरी साधर्म्य आहे नक्कीच! तेवढंच प्रकर्ष वेगळेपण सुद्धा.

नकळत त्याने गालावरून हात फिरवला, आपलीही दाढीची खुंट वाढली आहेत. हो! लक्षातच नव्हतं नाही! नाहीतरी पैसे कुठे होते म्हणा. पण त्याच्याइतकी नाही वाढली काही. आपले कपडेही बरेच स्वच्छ नि शिवाय बिनफाटके आहेत. त्याच्या पायात तर वहाणाही नाहीत. म्हणजे आपण नक्कीच त्याच्यापेक्षा सुखी? छे! आपल्याला सुखी कोण म्हणेल? मग आपल्या चेहऱ्यावर त्याच्यासारखी बेदारकारी, निष्काळजीपणा का नाही? का त्याला माझ्यासारखी लाचारी नाही? काळजी नाही? का त्याची मान खाली झुकत नाही? तो का शीळ

वाजवतोय, का जगतोय ? क्षणाक्षणात त्याचे उदास पापुद्रे का उलगडत जाताहेत ? छे ! इतक्या प्रश्नांची उत्तरे इथून मिळणारच नाहीत. त्याच्या अजून जवळ जायला हवं. अंतःकरणात शिरायला हवं.

नकळत तो त्याच्या शेजारी जाऊन बसला. त्यानं पाहिलं अजून शेवटचा स्टॉप यायला १५ मिनिटं अवकाश आहे. तोपर्यंत होईल सारं विचारून, च् ! पण त्याचं इकडे लक्षच जात नाहीय्. इतका कशात गुंग झालाय्? काहीतरी विचारायचं म्हणून त्याने विचारले, 'किती वाजले ?' त्याने एक तिरस्कृत दृष्टी फेकली. जसं काही त्याला स्वर्गसुखातून कुणी यमापुढे उभं केलंय्. माझ्या मनगटावरील घड्याळाकडे पाहून एक छद्मी हास्य, एक कोरडी नजर. 'माझ्याजवळ घड्याळ नाहीय्.' पुन्हा नजर बाहेर. चेहरा शांत. सालं उगाचंच विचारलं, मध्येच त्याचा चेहरा गंभीर झाला, भाव बदलले, डोळे बदलले. पुन्हा एक धसका !

पुढचा स्टॉप एक दूरवरचा शांत असा समुद्रकिनारा होता. हा तर येथेच उतरला. आपणपणं उतरायचं का ? नकळत तो उतरून त्याच्यामागे चालू लागला. त्याने एकदा मागे वळून पाहिलं, त्याच्या चेहऱ्यात आता उपहास, तिरस्कार काहीच नव्हते. आता हा नक्कीच आत्महत्या करणार. आपणही करावी का ? आयुष्यात कधी नाही तर जाताना तरी कुणाची साथ असावी. उद्या प्रेत सापडल्यावर लोक म्हणतील, क्या यारी है यार ! विचारू का त्याला ? हो ! काय हरकत आहे. नाहीतरी आता नजरेने थोडी ओळख झाली आहेच. पण त्याच्या चेहऱ्याकडे पहाताच याचं धैर्य कुठल्याकुठं पळालं. असलं चमत्कारिक तेज कुणाच्याच डोळ्यांत पाहिलं नाही. तोपर्यंत तो सरळ दूरवर एका उंचवट्यावर जाऊन बसला. आपण गेलो तर तो काहीतरी खवचट बोलेल. नकोच् त्यापेक्षा आपण येथेच लपून बसू. म्हणून आडोशाला बसून राहिला.

तो समोर कश्शात तरी हरवल्यासारखा पाहात होता. मध्येच काहीतरी पुटपुटत होता. बहुधा गुणगुणत असावा. चेहऱ्यावर आनंद नुसता ओसंडत होता. हा मरणापूर्वीचा उत्कट आनंद की काय ? कसल्या स्वप्नात रंगलाय ? धुंदलाय ?

तेवढ्यात धपदिशीन् आवाज झाला; विचारांची साखळी तुटली. नि तेव्हापासून दिशाच बदलली. एका तरूण मुलीने शेजारच्या उंच दगडावरून उडी मारली होती. ती तेथे असल्याचं आधी कुणाच्याच लक्षात कसं आलं नव्हतं ! त्याने लगेच तिच्या मागोमाग उडी टाकली.

—नक्कीच दोघे प्रेमिक, ठरवून आत्महत्या केली काय ? बरं झालं दोघांना एकत्र जगता नाही तर कमीत कमी मरता आलं. आपल्याला जमलं असतं हे ? छे ! पण ती सोनकळी आलीच नसती. जाऊ दे ! तेवढ्यात तो तिला घेऊन पाण्याबाहेर आला. दोघे एकदम् ओलेचिंब झाले होते. तिची मान खाली होती तरी, ती ओल्या राखीपेक्षा सुंदर वाटत होती. ही आपली स्वप्नातली राजकन्याच का ?— ओलीचिंब एकटी. पण त्याचे तिच्याकडे लक्षच नव्हते. किनाऱ्यावर येताच त्याने जोरात तिच्या थोबाडीत मारली.

ह्याचा हात उगाचच गालावर चोळला गेला. हा काय प्रकार आहे ? डोक्यात काहीच कसं शिरत नाहीयं. आपलं डोकं एवढं मठ्ठ आहे ? बहुधा त्याचं घरगुती भांडण असावं, नाही पण आपण ऐकूच ना ?

'तुला जन्माला कुणी घातलं ?' तो.

'... ... ... !' गोंधळात पडून तिचा कसातरी वरती हात.

'कशा करता ?' शब्दावरचा जोर वाढवीत तो.

'... .. ...'

'ऐकू आलं नाही का ?'

'माहीत नाही.'

'ते विचारायला चालली होतीस वाटतं ?' त्याचे एक छद्मी हास्य.

'... ... ..'

'बरं, मला कशाकरता घातलंय ?' तो.

'... ... ...' तिचा एक आश्चर्याचा भाव.

'हा समुद्र कशाकरता आहे ?'

'... ... ...' ती अधिकच भेदरलेली.

'हा बघण्याकरता, नि आनंद लुटण्याकरिता आहे. आपलं पाप धुण्याकरिता नाही.'

'मी खरंच पापी नाही हो !'... तिचा एक मुक्त सूर.

'कोण म्हणतो पापी नाहीस ? कदाचित आधी नसशीलही. पण जीव देणाऱ्या नि घेणाऱ्याइतकं पापी या जगात दुसरं कुणी नाही. देवाची सत्ता हातात घेऊ पहाणाऱ्या नादान पोरी, जरा समोर बघ की !'

आता हाही (आपला नायक) आडोशामागून एकदम पुढे आला. पण समोर आपलेच रूप पाहून एकदम दचकला. हबकला. त्याचीही नजर समोर वळली.

'तो सूर्य पाहिलास ? तोही आपलं आयुष्य संपवतोय. स्वतःची इच्छा नसतानाही,


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य
या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

**। मॅक्झिम गॉर्की ।**

**। सुमती देवस्थळे ।**

**मूल्य दहा रुपये**

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ । पुणे ४११ ०३०

रोज साऱ्यांना पुनर्जन्म देण्याकरिता– पण किती आनंदात, किती तृप्त चित्ताने. आपलं सारं कर्तव्य पार पाडल्यानंतर. तो कधी दुपारीच अर्धवट आयुष्य टाकून निघून गेल्याचं आठवतं तुला ? ढगांनी चारी बाजूंनी झाकाळून टाकलं तरी, जगण्याची त्याची अविरत धडपड मधूनमधून प्रकाश दाखवून जाते की नाही ? नि म्हणूनच संपण्याच्या क्षणीही तो अधिक सुंदर भासतो. या क्षणाला तू मला मुळीच आकर्षक वाटत नाहीस – तू अर्ध्या रस्त्यातून परततीयस. प्रत्येकाला पृथ्वीवर काही ना काही करण्याकरता पाठवलय्. उगाच मरण्याकरताच पाठवायचे असते तर त्याने जन्मालाच कशाला घातले असते ?'

आपला चेहरा का पालटायला लागला ? हा अंतापासून बाहेरपर्यंत कसला चमत्कारिक प्रत्यय अनुभवायला येतोय ? हे सारं अध्यात्म आपल्याला कसं पटतय् ? आपण कसं पटवून सांगू शकतोय ? असंख्य असंख्य प्रश्नचिन्ह डोळ्यासमोर ! आता तर तो दिसत सुद्धा नाहीय्. नुसता आवाज, दूरवरच्या पोकळीतून येणारा धीमा आवाज...

'समोरची नदी पाहा, झाडं पाहा, पक्षी पाहा ! कित्येकदा त्याचं जीवन उध्वस्त झालंय्, कितीदा ते कोलमडलंय्. पण ते कधी आत्महत्त्या करीत नाहीत. तुझ्या आत्महत्त्येचं कारण मला माहिती नाही. पण इथे कारणाला काही महत्त्वच नाही. कुठलंच नैतिक कारण आयुष्य संपविण्याइतकं बळकट असूच शकत नाही. प्रेमभंग झाला असेल, तर मागच्याला विसर. जा. नवीन प्रेम शोध. जगात प्रेम करण्याइतक्या इतर खूप वस्तू आहेत.–माणूस सोडून साध्या दगडमातीवरसुद्धा प्रेम करता येतं–त्यांच्याकडून परत प्रेमाची अपेक्षा नसतानाही. तुझीच जर तुझ्या घरात, समाजात राहायची इच्छा नसेल, तर अधिक चांगलं; हे सुंदर जग खूप मोठं आहे; तेथे माझ्यासारख्याला जागा आहे, तर तुला का नसावी ?'

आता तर बोलण्याचा आवाजही ऐकू येईनासा झालाय्, तो तर कधीचाच दिसत नाहीय्, कुठं गेलाय् ? आपण एवढे वेडे का झालो ? का जगण्याचं महत्त्व त्याच्याकडून ऐकून घेतलं ? का त्याच्या समोर जाऊन दोन थोबाडीत मारू शकलो नाही ? दुनियेची नालायकी का पटवू शकलो नाही, त्या फाटक्या माणसासमोर का म्हणून हरलो ?

छे ! पण हे सारं तर आपल्यालाही पटू लागलंय. खरं काय ? त्यानं तर बरंच काही भोगलंय, आपल्यापेक्षाही. समोरच्या झोपडपट्टीत हे काय चाललंय् ? दोन नागड्या पोरांचा भांडणवजा खेळ चालू आहे वाटतं. थंडीनं सारं अंग फुटलंय्. किती ठिकाणी खरचटलं तरी हसताहेत. तिथेच तुटक्या झोपडीच्या दारात, एक जोडपं बसलंय्. पोटात काही नसल्यानं पोट आणि पाठ ओळखू न येण्याइतपत. अंगात कपडा म्हणून म्हणायचं, की नाही अशा चिंध्या अडकवलेल्या. पण डोळ्यात केवढं कौतुक, केवढी तृप्ती, जगण्याची केवढी उभारी–

'जीवन है मधुबन, तू इसमे फूल खिला–'

त्याचीच त्याला लाज वाटायला लागली. आपला क्षुद्रपणा अधिकाधिक बोचायला लागला. आपल्यापेक्षा लहान रेषेपुढे त्याची रेषा आपोआप मोठी झाली. ती मुलगी आता हसत, बागडत परत निघालीय्–गाणं गुणगुणत; त्या वाचविणाऱ्याची नि वाचणाऱ्याची, दोघांची नजर केवढी तृप्त असेल. जगाचं रूप कितीही घाण असलं तरी तेवढंच ते लोभनीय आहे, हे त्याला प्रथमच जाणवलं. कधी नव्हते तेवढे त्याला ते दगड, ती वाळू तो किनारा सुंदर दिसू लागला. नजर आपोआप सौम्य झाली; तोंडातून हलकेच शीळ बाहेर पडली. तो फाटका माणूस समोर उभाच होता; नकळत त्याच्या चेहऱ्यावर ओळखीचे हास्य दिसले. तोही तोंडभरून हसला.

तो शीळ मारत, उड्या घेत घेतच दरडीवरून खाली उतरला. समुद्रात थोडा वेळ डुंबला. ताजातवाना होऊन रस्त्यावर आला. आज तो फार वेगळ्या मूडमध्ये होता. समोर अंतराअंतरावर सूर गातच होते. त्याची वाट पाहत–'जिंदगी हसने गानेके लिए है...' तो मनाशीच हसला. आज तो कितीतरी दिवसांनी साऱ्यांपेक्षा श्रीमंत झाला होता. रस्त्यातील प्रत्येक वस्तूकडे नव्या नवलाईने पाहत होता. प्रत्येकात आज काव्य दिसत होते. प्रत्येक गोष्ट सुंदर होती. आता असंच उड्या मारत जायचं का ? ती मगाचीच बस आली. तिचे लाल–लाल रूप त्याला फार आवडले. नकळत तो आत चढला. अगदी खुषीत, मगाच्याच सीटवर जागा मिळाली, तशी फारशी गर्दी नव्हतीच. तो अगदी आनंदात, मान डोलवीत, शीळ वाजवीत राहिला. कंडक्टरही आश्चर्याने बघतच राहिला.

मनातून गुरुदत्त, हिटलर कधीचेच गेले. त्यांची जागा त्या फाटक्या माणसाने व्यापली गेली. मघाची मुकी मुकी फुले त्याला खूप खूप बोलकी वाटली. त्याच्याशी गप्पा मारू लागली. स्मशानातूनही मुक्त हास्य ऐकू येऊ लागलं. सारे रस्ते नंदनवन वाटू लागले. पुनः मघाचेच हॉटेल आले. पण आता ते गात होतं...

'चल चल रे नौजवान, मरना तेरा काम नहीं...' पुढच्याच स्टॉपवर तो उतरला– जेथून चढला होता तेथेच. त्याने सहज घड्याळाकडे पाहिले–१७-३५.

दोन तासांत हे रस्ते असे का बदलले ? त्याचंच त्याला कळलं नाही. जाऊ दे, जास्त विचार न करता 'चल चल रे...' गुणगुणत तो चालू लागला. साडेतीन हातांची वाट. ☐



# अशी चौकशी, अशी फाशी !

**लेखांक सात । र. धों. घाणेकर**

**परराष्ट्रीय राजकारण लढविणे हेच निक्सनचे जीवन असल्यामुळे नेहमीच व्हिएटनाम प्रश्न त्याच्या मनामध्ये घोळत असायचा. म्हणून हे व्हिएटनाम प्रकरण येथे लेखकाने विस्ताराने सांगितले आहे.**

१९४० साली सुरू झालेले व्हिएटनाम युद्ध १९७५ च्या ३० एप्रिलला संपले; कारण त्या दिवशी दक्षिण व्हिएटनाम हा शत्रूसैन्याला शरण गेला. व्हिएटनाम– तसा पाहिला तर किती लहानसा देश, पण ३५ वर्षे त्याला झुंज खेळावी लागली. ह्याला कारण म्हणजे मुख्य देशाचे दोन तुकडे झाले– एक उत्तर व दुसरा दक्षिण. उत्तर व्हिएटनामच्या बाजूला चीन व रशिया ही कम्युनिस्ट विचारप्रणालीची २ राष्ट्रे तर दक्षिण व्हिएटनामच्या बाजूस अमेरिका-स्वातंत्र्यवादी–लोकशाही असे राष्ट्र ! अमेरिकेत ७ राष्ट्रपतींची कारकीर्द ह्या ३५ वर्षांच्या अवधीत झाली. रूझव्हेल्ट, ट्रुमन, आयसेनहॉवर, केनेडी, जॉन्सन, निक्सन व फोर्ड. युद्ध सुरू होऊन कित्येक वर्षे उलटून गेली तरी अमेरिकन जनतेला व्हिएटनाम हा देश आहे तरी कोठे ह्याचा ठावठिकाणाच नव्हता, कारण अमेरिकेने युद्ध असे पुकारलेच नव्हते. पहिल्यांदा पैशाची न सामानसुमानाची मदत सुरू झाली, हलके हलके सैन्य धाडले गेले, त्यांना संरक्षण देण्यासाठी विमाने, दारूगोळा व अन्य मदत गेली. हजारो सैनिक मारले गेले ह्या बातम्या जेव्हा अमेरिकेत येऊ लागल्या तेव्हा जनता जागी झाली, तोपर्यंत १९६६–६७ साल उजाडले होते.

सन १९४० पर्यंत coochin china, टोंकिनचा भाग, अन्नामचा भाग, कंबोडिया आणि लाओस हा सर्व भाग फ्रान्स देशाची वसाहत colony म्हणून समजली गेलेली होती; आणि ह्याचेच नाव Indo-china. त्या वर्षी जपानने आक्रमण केले व त्यांच्या ताब्यात हा भाग १९४५ पर्यंत राहिला. दक्षिण व्हिएटनामच्या किनाऱ्यावरून जपानच्या Tospedo Bomber नी ब्रिटिशांची दोन लढाऊ जहाजे– Prince of Wales व Repulse ही ठोकली व बुडविली.

६ ऑगस्ट १९४५ ला जपानच्या हिरोशिमा बेटावर अॅटमबॉम्ब टाकून दोन सबंध बेटे उध्वस्त झाली. जपानने शरणागती पत्करली. दुसरे महायुद्ध संपले.

मध्यंतरीच्या कालात १९ मे १९४१ ला इंडो-चायनीज कम्युनिस्ट पार्टी आस्तित्वात आली. तिने VIETNAM DOC–LAP–DONG MINH–HOI ( Revolutionary leaguc for the independance of Vietnam) अशी संघटना उभारली. ह्या संघटनेत Anti-French Nationalists होते. त्यांच्यातच एक कडवा शूर असा व्हिएटनामी होता. त्याचे नाव NGU YEN–AI–QUOC. १९२० पासून French Communist Party चा सभासद. १९४३ मध्ये HO CHI MINH ह्या नावाने हा कर्तबगार, हाडाचा कम्युनिस्ट पुढे आला व व्हिएटनाममधील सर्व रंग पालटून गेला.

हो चि मिन्ह हा १८९० मध्ये जन्मला व १९२० मध्ये साधा खलाशी म्हणून बोटीवर काम करू लागला. फ्रान्सला जाऊन त्याने टॉलस्टॉय व मार्क्सवादाचा अभ्यास केला. फ्रेंच, इंग्लिश, रशियन, जर्मन, झेक, जपानी, चिनी इत्यादी भाषा शिकला. अनेक खोटी नावे त्याने धारण केली होती, त्यांपैकीच एक नाव NGOYEN AI QUOC. लंडनहून तो पॅरिसला गेला. तेथे त्याची कार्ल मार्क्सचा नातू ज्यॉसेट ह्याच्याशी दोस्ती झाली. फ्रान्समधील इंडो-चायनीज ह्यांच्यामध्ये त्याने क्रांतीची बीजे पेरली. रुथ फिशर नावाचा जर्मन कम्युनिस्ट त्याचा दोस्त होता. तो हो चि मिन्हविषयी लिहिताना म्हणतो, 'It was Ho Chi Minh's nationalism which impressed the European Communists, born and bred in a rather grey kind of abstract internationalism.' १९२२ मध्ये तो मॉस्कोला गेला आणि लेनिन, ट्रॉटस्की, बुखारीन व वरच्या दर्जाचे कम्युनिस्ट ह्यांच्यामध्ये मिसळू लागला. १९२८ साली सयाम (थायलंड), मलाया व डच ईस्ट ह्या भागांतून 'अन्नामाईटस' जमातीच्या क्रांतिकारकांना भेटून तो हॅनोईला गेला. त्याच्यावर पकड-वॉरंट होते, त्यामुळे फ्रेंच पोलिसांच्या हातावर झकास तुरी देऊन तो हाँगकाँगला गेला. ब्रिटिशांनी तेथे त्याला पकडलेच; पण लवकरच तुरुंगातून तो फरारी झाला. १९३३ नंतर ते थेट १९४१ पर्यंत तो चीनमध्ये राहिला; व नंतर उत्तर इंडो-चायना ह्या भागात दडी देऊन होता. प्रसिद्ध फ्रेंच कम्युनिस्ट डू म्हणतो :

We cannot trust Ho. He is a Trotskeyite himself at heart !

दुसरे महायुद्ध संपले. परिस्थिती सगळ्यांचीच बिकट झाली, जपान्यांच्या हातातून घेतला खरा पण फ्रान्सला Indo china सांभाळणं अशक्य होऊन बसलं होतं. कारण लष्करी बळ एकदम सर्वांचेच खलास झाले होते. इंग्लंडचे लष्करी सामर्थ्य पार लयाला गेले म्हणून तर हिंदुस्थानला स्वतंत्रता देणं त्यांना भाग पडलं. त्यांचा नाइलाज झाला.

फ्रान्सशी बोलणे करण्यासाठी तो पॅरिसला गेला व हात हालवीत परत आला. तावडतोब फ्रान्सने दक्षिण व्हिएटनामचा कबजा घेतला व हो चि मिन्हने २ सप्टेंबर १९४५ ला स्वातंत्र्य जाहीर करून Democratic Repubiic of Vietnam उत्तर भाग आपल्या ताब्यात ठेवला आणि फ्रान्सला तंबी देण्यास सुरुवात केली.

६ मार्च १९४६ ला फ्रान्सनी 'The Republic of Vietnam as a free State-forming part of the french union'. वसाहत–अंतर्गत स्वराज्य ! जाहीर केले ! ज्या प्रकारचा घोळ इंग्लिश राज्यकर्ते हिंदुस्थानात १९४६ साली घालीत होते, त्याच प्रकारचा घोळ फ्रान्स इंडो-चायनात घालीत होता.

पूर्वीचा व्हिएटनामचा बाईलवेडा व व्यसनी बादशहा BAO DAI बाव-दाई हे बाहुले हाताशी धरून फ्रेंचांनी दक्षिण व्हिएटनाम-मध्ये Republic of Vietnam ची पुनर्घोषणा ८ मार्च १९४९ ला केली व हे Republic Non-Communist असेच राहील अशी ग्वाही दिली.

सप्टेंबर १९४९ मध्ये चायनामधील कम्युनिस्टांनी People's Republic of China स्थापन केल्याची घोषणा करून लगेच Formosa (आताचा तैवान) ताब्यात घेतला व होला आपले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी प्रत्येक प्रकारची मदत दिली जाईल, अशी घोषणा केली. दोन महिन्यांनी लगेच डिसेंबर १९४९ मध्ये माओ आणि चौ रशियाला बोलणी करण्यासाठी गेले.

ज्या अनेक चुका अमेरिकेने ह्या Indo-China प्रकरणात केल्या त्यातील पहिली मोठी चूक म्हणजे फ्रान्सला पाठिंबा दिला, ही होय. त्यानंतर दुसरी चूक म्हणजे १९४५ पासूनच हो चि मिन्ह हा अमेरिकेकडे Indo-China प्रकरणात अमेरिकन राज्यकर्त्यांनी हात घालावा व फ्रान्सला समजून सांगून राष्ट्राला पूर्ण स्वतंत्रता द्यावी असे सुचवीत होता; इकडे दुर्लक्ष केले. एवढेच नाही तर अध्यक्ष ट्रुमनला त्याने मदतीची याचना केली होती ती ट्रुमनने झिडकारून टाकली. वास्तवीक त्यावेळी, म्हणजे १९४६ मध्ये, चीनचे स्थिरस्थावर झालेले नव्हते, फ्रान्स, इंग्लंड, जपान सर्व मोठी राष्ट्रे मार खाऊन जेरीस आलेली होती– अशा वेळी जर हो सारखा कर्तबगार, लढाऊ, शूरवीर क्रांतिकारक अमेरिकेने हाताशी धरला असता तर त्याचे विचारच पालटून गेले असते व जे मरण १९७५ साली अमेरिकेला आपल्या डोळ्यांनी पाहावे लागले, ते पाहावे लागले नसते. 'हो चि मिन्ह हा साम्यवादी आहे' म्हणून मदत देण्याचे अमेरिकेने त्यावेळी नाकारले व Emperor Bao Dai चा राज्यकारभार चालविण्यास फ्रान्सला पाठिंबा दिला, ही महाभयंकर चूक झाली. जो हो तुमची मदत १९४६ मध्ये मागत होता, तो पुढे पक्का साम्यवादी झाला, चीन-रशियाला मिळाला आणि तुमचा काटा त्याने ढिला केला; हा इतिहास आहे. हीच चूक अमेरिकेने कॅस्ट्रोच्या बाबतीत केली, हे प्रसिद्धच आहे.

पेंटॅगॉन ह्या संस्थेने प्रसिद्ध केलेल्या अहवालावरून तर असे दिसते की, १९४५ च्या मध्यापासून तो १९४६ च्या मध्यापर्यंत हो चि मिन्हनी अध्यक्ष ट्रुमन ह्याला ८ पत्रे लिहिली व तगादा लावला की, युनायटेड स्टेटसने किंवा यु. एन ओ. ने फ्रान्स देशाचे वसाहत-वादाचे तत्त्व हाणून पाडावे व व्हिएटनाम स्वतंत्र करावा. त्या पत्रांना ट्रुमनने केराच्या टोपलीत टाकून दिले. एवढेच नव्हे, तर उलट फ्रान्सलाच मदत करण्यास अमेरिका बाहेर पडली. हो चि मिन्हचे माथे खवळले, तो चीन-रशियाला जाऊन मिळाला. कारण त्याला स्वतंत्रता पाहिजे होती.

हेगेल एके ठिकाणी म्हणतो The one thing one learns from history is that nobody ever learns anything from history.'

ह्या सूत्राची सत्यता आपल्याला प्रत्येक वेळेला ऐतिहासिक समालोचन करताना ध्यानात येते, ह्यात शंका नाही.

इंडोचायना हा इंग्लिश S ह्या मुळाक्षराच्या आकारासारखा आहे. एकंदर प्रजा ३॥ कोटी. १५०० मैल लांबच लांब. काही ठिकाणी अगदी अरुंद व उत्तर व्हिएटनाममध्ये ४५००० स्क्वेअर माईल भाग हा उंच उंच डोंगरांनी भरलेला. येथील टोंकिन भागाची बाजू चीनच्या हद्दीला लागून आहे. ह्याच्यातून लाल नदी ही वाहत जाते व समुद्राला मिळते. ह्याच भागामध्ये सतत वीस वर्षे उत्तर व्हिएटनाम गनिमी युद्ध खेळत होते. अमेरिकन सैन्य मारले गेले. बाँबवृष्टीचा काहीही प्रभाव होत नव्हता; व तो डोंगराळ भाग होता म्हणूनच गनिमी कावे लढून हो चि मिन्हला अमेरिकेस

जेरीस आणता आले,

१९४९ मध्ये माओनी चँग-कै-शेकला चीनमधून हाकलून दिला, ते ध्यानात घेऊन अमेरिका साम्यवाद्यांचा आशिया खंडात होणारा लोंढा थांबून धरण्याच्या पाठीमागे लागली,

हो चि मिन्हची उत्तर व्हिएटनाममधील राजवट ( Democratic Republic ) २० जानेवारी १९५० ला चीन व रशिया ह्या दोघांनीही मान्य केली व त्यानंतर लगेच ७ फेब्रुवारी १९५० ला अमेरिकेने दक्षिण व्हिएटनाममध्ये Bao Dai ह्याची राजवट मान्य केली– व संघर्ष सुरू झाला.

१९५१ च्या मे महिन्यात ब्रिटन, फ्रान्स, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया ह्या देशांनी लष्करी करार करून अमेरिकेकडे व्हिएटनाम प्रकरणाला पैसा पुरवावा म्हणून विनंती करण्याचे ठरविले, पण ट्रूमनने आपण अध्यक्षपदाची नोव्हेंबर महिन्यात होणारी निवडणूक लढविणार नसल्याचे जाहीर केल्यामुळे हा करार तसाच दप्तरी पडून राहिला.

२० मार्च १९५२ ला फ्रेंच चीफ ऑफ स्टाफ जनरल पॉल एली हा अमेरिकेत गेला व त्याने वॉशिंग्टनमध्ये प्रेसिडेंट, सेक्रेटरी ऑफ स्टेट डलेस ह्यांना भेटून मदतीची याचना केली. २५ मार्चला काँग्रेसच्या जबाबदार व्यक्तींच्यापुढे भाषण करून, साम्यवाद्यांचो मुसंडी आपण रोखलीच पाहिजे; नाही तर आशियात साम्यवाद प्रबळ होईल, हा विषय त्याने मांडला. त्याचीच री आयसेनहॉवरनी आपल्या ७ एप्रिलच्या भाषणात व निक्सनने आपल्या Newspaper Auditors Conference मध्ये १५ एप्रिलला केलेल्या भाषणात ओढली. डलेसनी वॉशिंग्टनमध्ये ब्रिटन, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, फिलिपाईन्स, थायलंड, व्हिएटनाम, लाओस व कंबोडिया ह्यांच्या राजप्रतिनिधींची भेट घेऊन बोलणी केली.

त्याच्यानंतरच्या महत्त्वाच्या घडामोडी विषद करण्यापूर्वी एक महत्त्वाचा विषय पुढे मांडावयाचा आहे व तो म्हणजे व्हिएटनामच्या युद्धावर अत्यंत गुपित असा १९६८ साली छापला गेलेला व १९७१ साली न्यूयॉर्कच्या वॉशिंग्टन पोस्ट ह्यांनी मोठ्या हिंमतीने जनतेसमोर ठेवलेला 'पेंटगॉन पेपर्स' हा दस्तऐवज–

## पेंटगॉन

वॉशिंग्टनच्या जवळच ३४ एकरांच्या विस्तीर्ण जागेमध्ये निरनिराळ्या भव्य व प्रशस्त अशा इमारतींचा एक, शहरापासून अगदी अलग केलेला, असा भू-भाग आहे, व त्याला पेंटगॉन अशी संज्ञा आहे. अमेरिकेचे भूदल, नौदल व वायुदल ह्यांमधील १२१४ अॅडमिरल्स व जनरल्स ह्या ठिकाणी अत्यंत गुपितपणे कामे करीत असतात. ह्यांचे काम तरी काय ? ह्या प्रश्नाचे अगदी मोजक्या शब्दात उत्तर देणे कठीण आहे. परंतु टीकाकार व्हाईट म्हणतो, 'They could strike terror or spread devastation around the entire world !'

'सबंध जगभर धुमाकूळ घालणं, दहशतीचे वातावरण निर्माण करणं आणि सर्वंकष नाश घडवून आणणं'– हे पेंटगॉनचे काम !

ह्या दशकामध्ये पेंटगॉनचा प्रमुख जॉन मॅकनॉटन हा होता.' ह्याने ह्या युद्धाच्या भूमिकेचा पूर्ण छडा लावला, महत्त्वाचे कागदपत्र जमा केले, अनेकांच्या मुलाखती घेतल्या व अखेरी ते सर्व छापून त्याच्या फक्त १५ प्रती काढल्या. 'व्हिएटनाम' वरील हा गुप्त अहवाल अगदी वरच्या अधिकाऱ्यांच्या हातात पडला. हा अहवाल एकंदर– ८००–९०० पानांचा फुल बाऊंड केलेला– असा ४७ ग्रंथात सामावलेला होता. त्याला नाव दिले होते, 'History of the U. S' decision making process on Vietnam Policy.'

व्हिएटनाम युद्धांवर १९७१ च्या अगोदर माहितीवजा असं पुष्कळच लिहिलं गेलं, परंतु त्याच्यातून सत्य बाहेर प्रकट झालं नव्हतं. ते ह्या अहवालावरून स्पष्ट झालं. पूर्वी येऊन गेलेलं लिखाण सरकारच्या देखरेखीखाली वावरणाऱ्या मध्यस्थांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे. स्वतंत्रपणाने माहिती एकत्र करून जगापुढे मांडलेला सत्य इतिहास म्हणजेच हे Pentagon Papers. व्हिएटनाम युद्ध लढविण्यामध्ये अमेरिका वा अन्य राष्ट्रांनी किती गलथानपणा दाखविला व अखेर मार खाल्ला–यांचं अत्यंत प्रामाणिक व सुंदर चित्रण ह्या पेपर्स मधून आपल्याला पाहावयास मिळतं ही ४७ ग्रंथांची छापील प्रत मिळविण्याची धडपड १९६८ पासून १९७१ पर्यंत– म्हणजे सतत ३ वर्षे न्यूयॉर्क टाईम्स, टाईम, वॉशिंग्टन पोस्ट ही वर्तमानपत्रे करीत होती. अखेर त्यांना यश आलं. न्यूयॉर्क टाईम्सने मे १९७१ मध्ये लेख छापण्यास सुरुवात केली. निक्सन अध्यक्ष होता– त्याचा तिळपापड उडाला. त्याने मिचेलमार्फत लेख छापण्यांवर बंदी घातली. प्रकरण कोर्टात गेलं. सरकारचं म्हणणं अमान्य अरून जज्ज् मुरे गुरफिन् ह्यांनी १६ जून १९७१ ला बंदी उठविली व लेख पुढे छापण्यास परवानगी दिली. एवढेच नव्हे तर हे प्रकरण पुढे अपिलांत जाणार हे ध्यानात घेऊन देखील जज्जनी म्हटले.

"By any definition of Democratic Government and Freedom of the Press, the Public is entitled to the information contained in this history, which in fact, is indispensible to an understanding of the evolution of American Policy in Vietnam.'

'It is an effort to expose and elucidate the TRUTH which is the very essence of FREEDOM OF PRESS.

'मुद्रणस्वातंत्र्य' ह्याचा अर्थच हा की, सत्य बाहेर फोडणे. लोकशाही व मुद्रणस्वातंत्र्य ह्यांनी 'सरकार राज्य कसे चालविते' हे जनतेला समजून सांगायलाच पाहिजे. व्हिएटनाममधील अमेरिकन– राजनीतीचे सत्य व त्याची पुरेपूर कल्पना जनतेला आलीच पाहिजे– तो जनतेचा अधिकार आहे !'

खालच्या कोर्टाचा निकाल १६ जून १९७१ ला लागला. २३ जूनपर्यंत किरकोळ कामे झाल्यावर २४ जूनला अपील दाखल झाले. २६ जूनला अपीलाची सुनावणी सुरू होईल म्हणून कळविण्यात

**सबंध जगभर धुमाकूळ घालणे, दहशतीचे वातावरण निर्माण करणे हे पेंटगॉनचे काम !**

आले. ३ जुलैला सुप्रीम कोर्टाने सरकारी अपील फेटाळले आणि न्यूयॉर्क टाईम्सने आपल्या वर्तमानपत्रांत पेंटॅगॉन पेपर्सला चांगलीच प्रसिद्धी दिली.

१० फेब्रुवारी १९७१ ला झालेल्या व्हाईटहाऊसमधील वृत्तपत्र परिषदेमध्ये पेंटॅगॉन पेपर्स आणि स्तंभलेखक अॅन्डरसन ह्या विषयावर प्रश्न विचारला गेला, त्याला उत्तर देताना अध्यक्ष निक्सन म्हणतो—

'Well, first we have a lot of circumstantial evidence. Second, as a lawyer, I can say that we do not have evidence that I consider adequate to take to court.'

'परिस्थितीजन्य पुरावा सरकारजवळ पुष्कळ आहे, परंतु न्यायालयात खेचण्याइतका पुरेसा पुरावा उपलब्ध नाही, हे मला कबूल करावे लागेल.'

पेंटॅगॉन पेपर्स जनतेपुढे आले आणि म्हणूनच १९७१ च्या अखेरपासून अमेरिकेमध्ये सर्व बाजूंनी सरकारविरुद्ध रान पेटविल्यासारखे झाले आणि म्हणूनच निक्सनला व्हिएटनाममधून काढता पाय घ्यावा लागला नाहीतर २५ वर्षे जनतेची फसवणूक करून चाललेले हे युद्ध किती वर्षे चालले असते कोणास ठाऊक ?

१ नोव्हेंबर १९५२ ला अमेरिकेनी पहिला हायड्रोजन-बाँब फोडून आपले लष्करी सामर्थ्य जगाच्या नजरेस आणून दिले.

४ नोव्हेंबर १९५२ ला आयसेनहॉवर व निक्सन अनुक्रमे राष्ट्राध्यक्ष व उपराष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आल्याचे जाहीर झाले.

६ मार्च १९५३ ला रशियाचा सार्वभौम स्टॅलिन हा कालवश झाला आणि त्यानंतर ५ महिन्यांनी १२ ऑगस्ट १९५३ ला रशियाने तोडीस तोड म्हणून पहिला हायड्रोजन बाँब फोडला; आणि बाजी मारली.

ह्या घटनांचा व्हिएटनाम युद्धावर मोठासा परिणाम झाला असे नव्हे, तर दोघांची इच्छा जगावर स्वतःचे स्वामित्व गाजविण्याची होती ती फलद्रूप करण्यासंबंधीची योजना आखता आली. मोठ्या संघर्षाच्या बाबतीत न पडता मिळतेजुळते घेण्याकडे दोघांचाही दृष्टिकोण फाकत चालला.

इंडोचायनातील परिस्थिती कशी आहे, ह्याचा अंदाज घेण्यासाठी अमेरिकेने एक शिष्टमंडळ सायगावकडे धाडले, त्यात राजप्रतिनिधी फिलिफ जोसेफ, रॉबर्ट ब्लूम, सॅम्युअल हायेस, रेमन्ड मॉयर ह्या व्यक्ती होत्या. त्यांनी सरकारला एक अहवाल सादर केला, त्यात महत्त्वाचा भाग हा होता :

'The revolutionaries of Vich-Minh are led by Communists but the majority is probably non-Communists. Their ordent nationalism and antagonism towords the French are so strong that they have accepted Communist leadership in their struggle to drive French from the country and achieve complete independance for Vietnam. French military forces control the major population centres and lines of communication.'

१९ फेब्रुवारी १९५४ ला फ्रेंचांचा जनरल नवारे ह्यांनी सायगाव मध्ये मुलाखत दिली. त्यात तो म्हणतो : One of the most fatuously optimistic situation on the eve of disaster !' व त्याच आठवड्यात चेअरमन ऑफ जॉइंट चीफ्स ऑफ स्टाफ ऑफ यु. एस. ए. ऑर्थर रेडफोर्ड आणि सेक्रेटरी ऑफ स्टेट बेडेल स्मिथ ह्यांनी वक्तव्य बाहेर पाडले : 'Communist Prospects of any decisive immediate success are slight while their prospects of their ultimate victory are non-existent !'

अगदी सर्वस्वी खोटी विधाने. केवळ जनतेची दिशाभूल करण्याच्या दृष्टीने केलेली !

२६ एप्रिलला जिनेव्हा परिषद भरणार होती. त्याच्या अगोदर दोनच दिवस म्हणजे २४ एप्रिलला ब्रिटिश पंतप्रधानांनी जाहीर करून टाकले की : British Govt. was not prepared to give any undertaking about U. K Military action in Indo-china in advance of the results of Geneva conference. We have not entered into any political or military Commitments.'

१८ फेब्रुवारी १९५४ ला युनायटेड स्टेटस, फ्रान्स, इंग्लंड, रशिया ह्यांच्या प्रतिनिधींची परिषद भरली त्या वेळी कोरिया-प्रश्न व इंडोचायनाचा प्रश्न सलोख्याने सोडवून टाकावा, अशी निश्चिती झाली.

२६ एप्रिल १९५४ पासून जिनेव्हाला ह्या दोन्हींचा विचारविनिमय करण्यासाठी १९ राष्ट्रांच्या प्रतिनिधींमध्ये खलबते सुरू झाली. प्राथमिक बोलणी झाल्यावर ८ मे ह्या दिवशी एकत्र यावयाचे ठरले. आदल्याच दिवशी ७ मेला DIN-BIN-PHU हे फ्रेंचांच्या ताब्यात असलेले ठिकाण उत्तर व्हिएटनाम सैन्यांनी, फ्रेंच सैन्यांची कत्तल करून ताब्यात घेतले. ती बातमी ८ मेला जिनेव्हाला येऊन पोहोचलीच. इंडोचायनाच्या प्रश्नावर सलोखा करण्यास इंग्लंड, रशिया, चीन ही राष्ट्रे उत्सुक होती. अमेरिकेला ते नको होते व तसेच उत्तर व दक्षिण व्हिएटनामही अलिप्त राहावयास पाहत होती. परंतु १९५४ मध्ये चीनची परिस्थिती कमताकद होती, रशिया व इंग्लंड ह्यांना कसे का होईना, पण युद्ध थांबवावयाचे होते.

सर अँथनी इडन ह्यांनी लिहिलेल्या full Circle ह्या पुस्तकात ह्याविषयीची आठवण लिहिताना ५३ पानावर लिहून ठेवले आहे :

'The French ambassador in Washington; Henry Bonnet seems to have formed] the opinion that Eisen-Hower not share Dulle's views on military intervention in Indo-china & would have been reluctant to sanction such a coures of action.'

२६ एप्रिलच्या परिषदेला चीनचा चू-एन्-साय हजर होता. सोव्हिएटचा मोलोटोव्ह पण जिनेव्हाला परिषदेसाठी आला होता, परंतु चू हजर होता म्हणून त्याने परिषदेला जाण्याचे टाळले. ३ मेला Nationalist Govt. of North Viet-Nam आणि Govt. of the Democratic Republic of South V. Nam ह्यांना

परिषदेत भाग घेण्यासाठी बोलावणे करण्यात आले. परिषदेला PHAM VON DONG हा ख्मेर व पॅथेट-लायो ह्या मोठाल्या जमातींच्या हितसंरक्षणासाठी हजर राहिला. NGUYON QUOC DINH Foreign Minister-Vietnam आलेला होता. परिषदेला विचारविनिमय करण्यासाठी मोलोटोव्हने पाच महत्त्वाचे मुद्दे सुचविले : १-युद्धबंदी, २-भू-भागाचे झोन्स पाडावेत, ३-युद्धबंदीनंतर कोणीही नवे सैन्य कोठेही पाठवावयाचे नाही व नवीन भरती करावयाची नाही, ४-करार पाळला जातो किंवा नाही, हे पाहण्यासाठी एक International कमिशन नेमावयाचे.

व्हिएटनामचा TA QUANG BU ह्याने आपण युद्धबंदी जाहीर करावयास तयार असल्याचे कळविले. १६ जून १९५४ ला फ्रान्समध्ये मेंडिस हा नवीन मंतप्रधान आला. त्याने चू व PHON VON DONG ह्यांची गाठ घेऊन जिनेव्हा-परिषदेवर चर्चा केली.

१९ जून १९५४ ला दक्षिण व्हिएटनामचा तात्पुरता अध्यक्ष म्हणून NGO DINH DIM ह्याला नेमले. ५ जुलैला त्याचा शपथविधी झाला.

एकदाचे २० जुलै १९५४ ला युद्धबंदी करारावर सह्या करण्याचे ठरले. ४७ कलमे असलेला हा दस्तऐवज Agreement on the cessation of hostilites in Vietnam तयार झाला व दुपारी १२ वाजता जिनेव्हा येथे For the Commander-in-Chief, of the French Union forces in Indo-china-ह्यासाठी ब्रिगेडिअर जनरल ( DELTIEL ) डेल्टिएल ह्यांनी व For the Commander-in-Chief of the Peoples Army of Vietnam ह्यासाठी TA GUANG BUU-व्हाईस मिनिस्टर of National Defence of the Democratic Republic of Vietnam. ह्यांनी सह्या केल्या. ह्या कराराला जोडून एक Annexture ही आहे.

दुसरा दस्तऐवज Final Declaration of the Geneva Conference हा २१ जुलै १९५४ ला तयार झाला. त्यात १३ महत्त्वाचे मुद्दे आहेत. कोणत्याच राष्ट्राच्या प्रतिनिधींनी ह्या दस्तऐवजावर सही केली नाही. मोठा नकार दाखविला तो अमेरिकेचा सेक्रेटरी ऑफ स्टेट डलेस याने.

थोडक्यात म्हणजे ह्या २१ जुलै १९५४ च्या जिनेव्हा कॉन्फरन्सची फलश्रुती काय ? तर ४ महिने घोळ घालून, लाखो रुपये उधळून १९ राष्ट्रांच्या हजर असलेल्या प्रतिनिधींनी सही न केलेला एक करारनामा ! काम करण्यापेक्षा रुसवा-फुगवाच फार, मान-सन्मानाच्या व मोठेपणाच्या कल्पनाच भरमसाट.

२० जुलैच्या कराराप्रमाणे ३०० दिवसांत इकडून तिकडे जाण्याची मोकळीक मिळाल्यामुळे अंदाजे ९०,००० दक्षिणी व्हिएटनामी उत्तरेकडे गेले व ९,००,००० उत्तर व्हिएटनामींनी स्थलांतर करून दक्षिणेत प्रवेश केला. ह्या ९ लाखांत २ लाख लोक हे उत्कृष्टपैकी लढाऊ शिक्षण घेतलेले लोक होते व पुढे जो दक्षिण व्हिएटनाम, लाओस व कंबोडिया ह्यांचा खुर्दा उडाला, त्याला मुख्य कारण म्हणजे स्थलांतराच्या रूपाने घुसविलेली ही सेना ! ३०० दिवसांची मर्यादा उलटल्याबरोबर दक्षिणेत BINH XUYEN ह्यांनी फार मोठ्या प्रमाणावर खाजगी सैन्य ठेवून बंडाची उठावणी केली. त्यात दहा लाख HOA HAO व CAO DAI ह्या जमातींपैकी लोक सामील झाले होते. त्यांना नगो डिनची राजवट मान्य नव्हती. ह्यांचा बीमोड करण्यातच ५ वर्षे वाया गेली.

उत्तर व्हिएटनाममध्ये तर काय कत्तलखानाच उघडला गेला. ५०,००० लोक फासावर लटकावले व १ लाख दूरदूरच्या ठिकाणी labour Camps व Concentration Camps मध्ये धाडले गेले.

इंडोचायना म्हणजे व्हिएटनाम, लाओस व कंबोडिआ ह्यांना Three Associated States of Indo-China असेच संबोधण्यांत येत होते.

International Commission नेमले गेले त्यावर हिंदुस्थान, पोलंड व कॅनडा देशाचेच प्रतिनिधी होते; व त्यांनी आपले काम चोख तऱ्हेने बजावले.

करार झाल्यावर प्रेसिडेंड आयसेनहॉवर उद्गारला.

'Anxious hours and days when the leaders of the free world tried to find amongst themselves atleast a temporary workable unity.'

जेनेव्हा करारावर सही न करणे, नगो डिमला पैशाची व हत्यारांची व सैन्याची मदत करण्यास अमेरिकेला भाग पाडणे, १९५६ सालांत दक्षिण व्हिएटनाममध्ये सार्वत्रिक निवडणुका घेऊ न देणे आणि सी-टू उभारणे-ह्या सर्वांच्या बुडाशी - सेक्रेटरी ऑफ स्टेट डलेस-ही व्यक्ती होती. आयसेनहॉवरने फारसे लक्ष कधीच घातले नाही हे स्पष्टच दिसते. आयसेनहॉवरच्या ह्या ८ वर्षांच्या काळात अरब-इस्रायल प्रकरण व व्हिएटनाम प्रकरण-दोन महत्त्वाची प्रकरणे ठरली. अमेरिकेनी पुष्कळ पैसा ओतला-पण परराष्ट्रीय राजकारण संभाळण्याकडे निक्सन-उपराष्ट्रपती व डलेस सेक्रेटरी ऑफ-स्टेट ह्या दोघांनीच भाग घेतला. आयसेनहॉवर विशेषता उत्सुक कधीच नव्हता.

दक्षिण व्हिएईनाममध्ये एका बाजूला खाजगी सैन्य उभारलेल्या दादा लोकांची बंडाळी, चैनी, व लाचलुचपत. रेल्वे, कालवे ह्यांची नासधूस चालूच होती. त्यांना आळा घालणे राज्यशकटाला भारी पडत होते.

१९५४ नंतर दक्षिण व्हिएटनामची परिस्थिती सुधारण्याऐवजी खराब होत चालली व त्यामुळे इच्छा नसतांना, केवळ Communist चा जोर आशियांत वाढवू देता कामा नये, ह्या विचारसरणीने भारावलेली अमेरिका युद्धांत ओढली गेली. त्यात त्यांचा स्वतःचा असा कांहीच स्वार्थ नव्हता, कांही मिळवावयाचे नव्हते, स्वतःच्या राष्ट्राला धोका नव्हता व धोका येण्याची शक्यताही नव्हती. Spanish American War, Mexican War, World war I, World war IInd, Berlin Air-Lift, Korean war आणि आता व्हिएटनाम युद्ध ! गडगंज संपत्ती असल्यामुळेच अमेरिकेला हे

**चार महिने घोळ घालून, लाखो रुपये खर्चून भरवलेल्या जिनेव्हा कॉन्फरन्सची फलश्रुती काय ?**

अव्यापारेषु व्यापार करणे सुचत गेले.

पुढे ऑक्टोबर १९६५ मध्ये Encounter ह्या मासिकांत प्रसिद्ध लेखक रीचर्ड लोवेनथॉल ह्याने America's Asian Commitment and how will it end? हा लेख लिहितांना पान ५४ वर लिहिले आहे की,

The decision taken by tha U. S. A. in 1954 not to sign the Geneva Agreement that ended the Indo-China war and subsequenthly to back the South Vietnames Government of NGO DINH DIEM, and refusing the All Vietnam elections proposed in that agreement, were, of course, conspicous examples of Dulles-Policy.

कम्युनिझम मारण्यासाठी प्रयत्न न करता अमेरिकेने डिमच्या भागातील बंडाळीचा पुरा बीमोड केला असता व राष्ट्रीयतेच्या कल्पना तेथे दृढमूल केल्या असत्या तर राज्य सुरेख चालले असते व पुढे होणारा कम्युनिस्टांचा मारा व स्वतःचा झालेला खुर्दा अमेरिकेला टाळता आला असता. पण नको ते कम्युनिझमचे भूत उभे करून उत्तर व्हिएटनामवर मारा करण्याकडेच अमेरिकेने ध्यान ठेवले व नाश करून घेतला. व्हिएटनाम ह्या विषयावरील फार खोलवर असा अभ्यास केलेला मोंटानाचा सिनेटर माइक मॅन्सफिल्ड की जो सिनेटमध्ये बहुसंख्याकांचा कर्णधार होता त्याने वारंवार आयसेनहॉवरला व निक्सनला सूचना दिली होती पण त्यांनी ती मानली नाही. जोसेफ बटिंजर ह्याने तर स्पष्टच सांगितले. 'Anti-Communism will be a useless tool as long as the problem of nationalism remains unsolved' सिनेटर जॉन केनेडी हा देखील डलेसच्याच मताचा. अमेरिकन सैन्य धाडून कम्युनिस्टांचा नाश केल्याविना सुटका नाही असे म्हणाऱ्यापैकी. निक्सनचेही तेच धोरण. आयसेनहॉवर गेला. केनेडी आला, तो गेला, जॉनसन आला, तो थकला, निक्सन आला. प्रत्येकजण कम्युनिस्टांना इंडोचायना मधून हाकलून द्यावे ह्याच मताचा. कम्युनिस्ट हाकलले गेले नाहीतच, त्यांनी १९७३ पर्यंत ते सर्व देश कम्युनिस्ट पंखाखाली आणून सोडले.

उत्तर व्हिएटनाममध्ये १९६० साली ८ मेला सार्वत्रिक निवडणुकांचा फार्स झाला. साम्यवाद्यांची LAO DANG (Workers Party) ९९ टक्यांनी निवडून आली. कारण दुसरे सर्व पक्ष अगोदरच जमीन दोस्त करून टाकले होते. विरोधी पक्ष नव्हताच! निवडणुका झाल्यावर मुलांच्या एका मेळाव्यात भाषण करतांना हो चि मिन्ह म्हणाला, 'When you grow up, you will have a communist constitution.'

हिंदुस्थान हे International Commissision for Supervision and control ह्याचे अध्यक्ष राष्ट्र होते. कॅनडा व पोलंड हे दोन देश सभासद. ह्या कमिशनने आपला कारभार चोख ठेवला. हिंदुस्थान नेहमीच सायगावच्या बाजूने झुकलेले असे, हॅनोईच्या नाही. नंतर १९६२ मध्ये ज्यावेळी मोठ्या प्रमाणावर साम्यवादी दक्षिण व्हिएटनाममध्ये घुसले त्यावेळी कॅनडाबरोबर हिंदुस्थानने देखील आपली नापसंती व्यक्त केली. वेस्ले फिशेल ह्या ग्रंथकाराने स्पष्टच लिहिले आहे की,

'Dim's regime never developed an easy relationship with the New Delhi government. In part, this was because of India's non-alignment policy.

१९५४ च्या करारानंतर जे उत्तरेतून दक्षिण भागात क्रांती करण्याच्या उद्देशानी व्हिएटनामी घुसले व जे हाडाचे कम्युनिस्ट होते त्यांचे ठिकाण सायगावपासून ६० ते १०० मैलाच्या घेऱ्यात Black lady Mountain चा डोंगराळ भाग व जंगले ह्याठिकाणी होते. ह्या भागात अगदी आतमध्ये त्यांनी गुप्तपणे National front for the liberation of south vietnam स्थापन करून चळवळ आरंभलेली होती. त्यांनी डिसेंबर १९६० मध्ये १० कलमी खर्डा तयार करून जनतेपुढे ठेवला. महत्त्वाची सदरे ५ होती.

1. To establish a coalition Government.
2. To promote democracy
3. To develop economy
4. To institute Land reforms
5. To work for reuniification.

बरोबर एक वर्षानी २१ डिसेंबर १९६१ ला ह्या दहा कलमी-दस्तऐवजाला जोडून 'ताबडतोब असे काय करावयाचे' हा कार्यक्रम जनतेपुढे ठेवला.

1: Withdrawl of all. U. S. Military personnel and weapons from S. Vietnam.

2: end of hostilities

3: establishment of political freedom.

4: release of political prisoners

5: dissolution of National Assembly and election of a new assembly and President.

डिम हा एकसारखा सांगत सुटला होता की, १९५४ च्या करारावर दक्षिण व्हिएटनामतर्फे कोणीही सही केलेली नाही, तेव्हा तो करार त्यांना बंधनकारक नाही. Free Election by secret ballot हे तत्त्व डिमने जाहीर करावे असा अमेरिकेचा आग्रह होता. जे धोरण आयसेन हॉवरने निक्सन व डलेस ह्यांच्या साह्याने १९५६ ते १९६० पर्यंत आखले ते साधारणतः असे होते :

१. दक्षिण व्हिएटनाम लष्करीदृष्टया मजबूत करावयाचा.

२. कम्युनिस्टांची जी जी उठावणी उत्तर व दक्षिण भागात होत राहील ती ती दडपून टाकावयाची व सबंध व्हिएटनाम हा Anti Communist Leadership खाली आणण्याचा प्रयत्न करावयाचा.

३. व्हिएटनाम साम्यवाद्यांच्या तावडीतून सुटल्यानंतर निवडणुका घ्यावयाच्या.

हे सर्व वरवर दिसावयाला ठीक होते, पण अमेरिका ह्या बाबतीत सावचितपणाने काहीच करत नव्हती. सायगावमध्ये असलेल्या अमेरिकन एम्बॅसी म्हणून C. I. A. कडून व बदली होणाऱ्या लष्करी अधिकाऱ्यांकडून एकसारखे अध्यक्षांकडे खलिते जात होते की, डिम ही व्यक्ती नालायक, व्यसनी असून त्याला देशात कशालाच आळा घालता येत नाही. सगळीकडे जुलूम, जबरदस्ती, बंडाळी, जाळपोळ, खून होत आहेत, लाचलुचपत वरवरच्या थरापर्यंत पोहोचली आहे-हे नावनिशीवार कळविले जात होते. महत्त्वाची दुसरी माहिती

कळविण्यात आली की, मे १९५९ मध्ये लॉओ डाँग ह्यांची १५ वी परिषद भरली होती व त्यात ठरले गेले आहे की, HO CHI MINH TRAIL येथील खुष्कीचे सर्व मार्ग ताब्यात घेऊन जबाबदार साम्यवादी दक्षिणेत घुसवून राज्ययंत्रणा खिळखिळी करावयाची–हे कळवून देखील आयसेनहॉवर स्वस्थ बसला. केनेडीने राष्ट्रपतिपदाची सूत्रे हातात घेतल्यावर दक्षिण व्हिएटनाममध्ये मोठ्या प्रमाणावर सैन्य, पैसा, विमाने, जहाजे व लढाऊ सामान धाडून देण्यास सुरुवात केली; पण ह्या गोष्टी फार उशीरा झाल्या. १९५२ नंतर ताबडतोब जर अमेरिकेने हे केले असते तर कम्युनिस्ट शरण आले असते. कारण त्यांना त्यावेळी चीन वा रशिया ह्यांचे कोणाचेच पाठबळ नव्हते.

प्रेसिडेंट डिमला काढून टाकावे, असे राजप्रतिनिधी डरब्रो पुनः-पुन्हा सांगत असताना देखील राष्ट्रपती स्वस्थ बसले.

६ जानेवारी १९६१ ला क्रुश्चेव्हनी जाहीर केले की, जगाच्या पाठीवर जेथे जेथे म्हणून राष्ट्र स्वतंत्र करण्याच्या दृष्टीने उठाव होत असतील तेथे तेथे रशिया मदत करत राहील.

व्हिएटनाम प्रकरण जगापुढे वेगळ्या तऱ्हेने ठेवले जात होते असे पेंटॅगाने पेपर्सवरून दिसते. त्यांचा अहवाल म्हणतो :

' Vietnam was the only place in the world where the administration faced a well-doveloped Communist effort to topple a pro-western Government with an externally aided pro-communist insurgency. Its a challange that could hardly be ignored. '

सेक्रेटरी ऑफ स्टेट, जॉन फॉस्टर डलेस, ह्या व्यक्तीने जवळ जवळ १० वर्षे परराष्ट्रीय राजकारणच हाताळलेले होते. विशेषत: व्हिएटनाम प्रकरण. चीन व रशिया ही वरवर दिसावयाला जरी २ अलग राष्ट्रे असली तर किरकोळ बाबी वगळता दोन्हीही राष्ट्रांचा ध्येयवाद एकच व तो म्हणजे साम्यवादाचा जगभर फैलाव. म्हणूनच त्यांना टक्कर देण्यासाठी जॉन फास्टर डलेस हा १९५० पासून अमेरिकेच्या राष्ट्रपतींना व्हिएटनाममध्ये भरपूर प्रमाणात लष्कर पाठवून कम्युनिस्टांचा काटा ढिला करावा हे सुचवीत होता व त्याप्रमाणे स्वतःही वागत होता. निक्सनचीही त्याला पूर्ण साथ होती. आयसेनहॉवरला ते तितकेसे पटत नव्हते. जुलै १९५९ मध्ये निक्सन रशियाच्या दौऱ्यावर जाणार होता, त्याच्या अगोदर ३ महिने डलेसची प्रकृती पूर्णपणे बिघडली. तो वॉल्टर-रीड हॉस्पिटलमध्ये दाखल झाला. निक्सन त्याला हॉस्पिटलमध्ये भेटण्यासाठी नेहमी जात असे व त्याच्या सल्ल्याचा निक्सनला पुष्कळच उपयोग झाला. दोघांची शेवटची भेट २३ मे १९५९ ला झाली. निक्सनच्या रशियनवारीविषयी बोलताना डलेस म्हणाला :

' Peaceful Co-existence which Kruschev advocates, represents peace for the Communists-world and constast conflict and strife in the New-Communist World. '

२४ मे १९५९ ला जॉन फॉस्टर डलेस ख्रिस्तवासी झाला आणि-२२ जुलै १९५९ ला निक्सन रशियाच्या दौऱ्यावर जाण्यास बाल्टिमोर विमानतळावरून, बरोबर ७० वृत्तपत्रलेखक, टीकाकार, भाषातज्ज्ञ, स्तंभलेखक घेऊन निघाला.

फार आशा होती की, क्रुश्चेव्ह-निक्सनच्या ह्या भेटीतून व्हिएटनामबद्दल काही समाधानकारक तोडगा निघेल. पण काहीच झाले नाही. निक्सन हात हलवीत परतला.

१७ ऑक्टोबर १९६१ ला अमेरिकेच्या अध्यक्षांनी Taylor Mission व्हिएटनाममध्ये पाठविले. आठ दिवसांतच सर्व आढावा घेऊन टेलरनी अध्यक्षांना कळविले की, ताबडतोब कमीत कमी १०००० Trained Army, लढाऊ सामान, विमाने, पाणबुड्या तिकडे धाडून द्याव्यात. उत्तर नाही. पुन्हा १ नोव्हेंबरला टेलरनी खलिता पाठविला.

डीन रस्क, सेक्रेटरी ऑफ स्टेट जपानला गेलेला होता. त्यामुळे अध्यक्षांनी काहीच दखल घेतली नाही. टेलरच्या म्हणण्याला मॅकनामारांनी साथ दिली. पण सिनेट-सभासद तयार होईनात. त्यांचे म्हणणे की, एकदा एवढे सैन्य धाडले गेले व युद्धाची ठिणगी पडली की, अमेरिकेला पुरते पडावे लागणार व पैसा, सैन्य व सामान इतक्या लांब १०,००० मैल दूरवर पाठवावयाचे, ह्या त्रासापेक्षा हळूहळू काढता पाय घेणे उचित ठरेल. त्या दोघांना आपसात लढू द्यावे, जो जिंकील तो राज्य करील. त्यात अमेरिकेला घुसण्याचे काहीच कारण नाही. कम्युनिस्टांच्या पासून आपल्या देशाला काही धोका नाही व अमेरिकेत अगोदरच असलेल्या कम्युनिस्टांवर रीतसर योग्य ती कारवाई करावी; म्हणजे संपले.

नोव्हेंबरमध्ये डीन रस्क परत फिरला. सिनेटला व काँग्रेसला विश्वासात न घेताच परस्पर अध्यक्षांनी सेक्रेटरी ऑफ स्टेट व इतर सल्लागारांच्या सांगण्यानुसार इंडोचायनामध्ये १४ डिसेंबर १९६० पासून लष्कर, लढाऊ विमाने व सामान धाडण्यास सुरुवात केली. त्या दिवशी 33/H–21/c हेलिकॉप्टरच्या कंपनीज धाडल्या गेल्या. पहिले हेलिकॉप्टर विमान उत्तर व्हिएटनामने ५ फेब्रुवारी १९६२ ला खाली पाडले.

२३ जुलै १९६२ ला जिनेव्हाला Laotian Peace Agreement झाला व अमेरिकेने आपले सैन्य हळूहळू व्हिएटनाममधून काढून घ्यावे अशी मॅकनमाराने सूचना केली. पेंटॅगॉनच्या हिशोबाने ऑक्टोबर १९६३ मध्ये अमेरिकन सैन्य व्हिएटनाममध्ये होते १६७३२. व्हिएटनाममधील नगो-डिन डिमची कारकीर्द खलास करणे हे क्रमप्राप्तच असल्याचे लष्करी अधिकाऱ्यांनी ठरविले. लेफ्टनंट कर्नल एल्यूसिन कोमीन ही कर्तबगार व्यक्ती पॅरॅशूटने १९४४ मध्येच इंडोचायनात उतरून वावरत होती हे अगदी वरच्या लष्करी अंमलदारांवाचून कोणालाच माहीत नव्हते. त्याच्याकडे हे प्रकरण सोपविण्यात आले व ते पूर्ण यशस्वी झाला.

क्यूबामधील Bay of pigs चे प्रकरण झाल्यानंतर अध्यक्ष केनेडी लॉजला (Ambassador) म्हणाला होता :

## आणि निक्सन हात हलवत परतला....

'I know from experience that failure is more destructive than an appearance of indecision. We go win For the military coup-d ' ctat against NGO DINH DIM, the U. S. must accept its' full share of responsibility.'

तिकडे Diem regime ही घरभेद्यांनी घेरलेलं होती तर खुद्द अमेरिकेतही केनेडीविरुद्ध तीच कारस्थाने रचली जात होती.

डिमचा खुर्दा उडविण्यात लॉज, जनरल हॉकिन्स व मेजर जनरल जॉर्ज पॅटन ह्यांचे विशेष अंग होते. मॅक्सवेल टेलर मात्र विरुद्ध होता.

त्याचे म्हणणे असे की, ' Rightly or wrongly, we have backed DIM for eight long, hard years. To me, it seenas incongratious now to get him down, kick him around and get rid of him.

ह्या वेळच्या परिस्थितीचे उत्कृष्ट वर्णन दुय्यम सेक्रेटरी ऑफ स्टेट, रोजर हिल्समनने १९६४ मध्ये लिहिलेल्या 'To move a Nation आपल्या पुस्तकात केलेले आहे. त्याने लिहिले आहे की डिमला त्याच्या भावाला व त्याच्या पत्नीला खलास करण्याची खलबते वॉशिंगटनमधेच शिजली व २४ ऑगस्ट १९६३ रोजी धाडलेल्या गुप्त संदेशामध्ये व्हिएटनाममधील अमेरिकन जनरलसना पूर्ण अधिकार दिले गेले. ३१ ऑक्टोबर हा दिवस उजाडला. दक्षिण व्हिएटनामच्या राजधानीत वातावरण तंग झालेले होते. त्या दिवशी लॉज अमेरिकेस जाणार होता तो बेत त्याने रहित केला. १ नोव्हेंबरला 'Coup' करण्याचे ठरले. सकाळी ९ वाजता लॉज, ॲडमिनिस्ट्रेटर फेल्ट बरोबर राष्ट्रपती डिमला भेटावयास गेला.

दुपारी १॥ वाजता पोलिस ठाणी, रेडिओ स्टेशन्स, विमानतळ ताब्यात घेतली गेली. राष्ट्रभवनाला वेढा पडला. संरक्षणासाठी सेना ठेवली होती त्यांना घेरा टाकला गेला. गुप्तपणे डिमला जनरलसनी कळविले की त्याने गादीवरून उतरल्याची घोषणा करावी. डिमने त्यांना भवनावर बोलावले. जनरलसनी नकार दिला. प्रेसिडेंट डिमने कॅबट लॉजला टेलीफोन केला. ते दोघांचे संभाषण टेपरेकॉर्ड झाले आहे ते असे–

Liem ; Some units have made a rebellion and I want to know what is the attitude of the U. S. A. !

Lodge : I do not feel well enough to be able to tell you, I have heard of shooting, but I am not well acquainted with all the facts, Also, it is 4/30 A. M. in Washington and the U. S. Government will not possibly have the view.

Diem ; But you must have general ideas. After all I am a chief of STATE. I have tried to do my duty. I Want to do now what duty and good couseience require. I believe in duty above all.

Lodge ; You have cartainly done your duty. As I told you only this morning, I admire your courage and your great contribution to your country. No body can take away from you the credit for all you have done. Now, I am worried about your physical safely. I have a report that those in charge of the current activity offer you and your brother safe conduct out of the country, if you resign Have you heard this ?

Diem : No. you have my telephone number......

Dodge : Yes, if I can do anything for your physical safety, please call me.

Diem : I am trying to reestablish ORDER.

राष्ट्रपती भवनात दंगे धोपे सुरू झाले. भवनापासन चोरवाटेनी जाण्यासाठी लांबचलांब भुयार तयार करून ठेवलेले होते त्यातून डिम व त्याचा भाऊ राजधानीतील चायना भागात पळून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत सर्व भवन ताब्यात घेण्यात आले. डिम व त्याचा भाऊ राष्ट्रभवनात कोठेच सापडले नाहीत. पण एक गट त्या दोघांच्या पूर्ण पाळतीवर होता व तो गट त्यांचा पाठलाग करत करत चाललाच होता. त्या दोघांनाहि माहिती नव्हते की आपल्याबरोबर भुयारातून चाललेल्या सशस्त्र पहारेकऱ्यांमधेच आपले मारेकरी आहेत. मागे सांगितलेला लेफ्टनंट कर्नल एल्युसिन कोनिन हा ह्या पहारेकऱ्यामधेच होता. 'आपण अत्यंत सुरक्षित स्थळी येऊन पोहोचलो आहोत' हे ज्याक्षणी डिम् व त्याचा भाऊ ह्यांच्या तोंडून उद्‌गार बाहेर पडले त्याच क्षणी कोनिन व त्याचे साथीदार डिमवर तुटून पडले व त्यानी क्षणार्धांतच दोघांना गोळी घातली आणि यमसदनाला पाठविले.

३ नोव्हेंबर १९६३ ला ही घटना दक्षिण व्हिएटनामध्ये घडली आणि ह्याच सुमारास तेथून १०००० मैल दूर आशा अमेरिकेतील डलास – ह्या प्रमुख शहरी कम्युनिस्ट क्रांतिकारक निराळीच योजना आखीत होते. तेथील त्यांचा पुढारी LEE HARVEY OSWALD हा आपली रशियन बायको व मुलगी बरोबर घेऊन ५ जून १९६२ लाच अमेरिकेत आलेला होता. तो Marxist होता. गवंडी काम, सुतार काम अशी कामे करून पोट भरत असल्याचा बहाणा करीत होता. १५ ऑक्टोबर १९६३ पासून Texas Sehool Book Depository ह्या Houstom आणि ELM ह्या दोन रस्त्यांच्या टोकावर असलेल्या पुस्तकविक्रेत्याकडे तो किरकोळ काम करण्यासाठी ताशी सव्वा डॉलर ह्या पगारावर काम करीत होता. राष्ट्राध्यक्ष केनेडी मोठ्या थाटात मिरवणुकीमधून ह्या भागातून जाणार असल्याचे ह्या ली ओसवाल्डला माहित होते. ती मिरवणूक दुपारी १२॥ वाजता त्या दुकानावरच्या रस्त्यावरून जाणारो. बरोबर नेम धरून ओसवाल्डनी बंदुकीच्या गोळ्या उडविल्या. केनेडीचे प्राणोत्क्रमण झाले. दुपारी १२॥ वाजता २२ नोव्हेंबर १९६३ ह्या दिवशी.

जगभरच्या देशादेशांतून शोक संदेश येऊन थडकले. रशिया व

चीन सोडून जगातील सर्व देशातील जबाबदार वर्तमानपत्रांनी केनेडीवर अग्रलेख लिहून आदरांजली अर्पण केली.

चीनमधील KUNGJEN JIH PAO ह्या प्रसिद्ध वर्तमानपत्रानी भले मोठे Cartoon काढले व शीर्षक दिले. KENNEDY BITING DUST! चित्रांत असे दाखविले होते की केनेडी पालथा पडून जमीन चाटत आहे! विसाव्या शतकातील सुप्रसिद्ध कवि T. S. Elliot ह्याने HOLLOW MAN म्हणून एक काव्य लिहिले आहे त्यात तो म्हणतो.

Between the idea
 And the reality......
Falls the shadow !
Between the emotion
 And the response......
Falls the shadow !
Between the desire
 And the spasm......
Falls the shadow !

व्हिएटकाँगच्या हो चि मिन्हनी दक्षिण व्हिएटनाममध्ये १९५४ सालच्या वावझोडीमध्ये लाखो शिकविलेले सैनिक धाडून दिले होते ते तेव्हापासून एकसारखा धुमाकूळ घालीत होते. त्यांना आवरणे डिगला अत्यंत कठीण झाले. दरवर्षी त्यांच्या दोन्ही संघटना– १. National Liberation Front व २. Revolutionary Party. दरवर्षी २० डिसेंबरला अत्यंत गुप्त जागी आपल्या कार्यकर्त्यांचा मेळावा भरवीत असत, ठराव करीत असत, वर्षाच्या कामाचा आढावा घेत असत. दरवर्षी मुख्य ठराव एकच– अमेरिकेने दक्षिण व्हिएटनाममधून लवकरात लवकर आपला काढता पाय घ्यावा!

डिमच्या नंतर सर्व सत्ता जनरल मिन्हकडे सोपविली. ३ महिन्यांतच मिन्हला बाजूस सारून NQOYEN KHANH ह्यांनी सत्ता काबीज केली व तो सर्वाधिकारी झाला.

अमेरिकेत केनेडीच्या खुनानंतर जॉन्सनची राजवट आली व त्याने आपण केनेडीच्याच धोरणानुसार व्हिएटनाममधील युद्ध पुढे चालविणार असल्याची घोषणा केली. मॅकनामारा मात्र ह्या धोरणाच्या विरुद्ध होता.

ऑगस्ट १९६४ मध्ये TONKIN GULF हे प्रकरण घडले. ७ ऑगस्टला अमेरिकेच्या कांग्रेसमध्ये, उत्तर व्हिएटनामच्या विरुद्ध अमेरिकेने युद्ध पुकारावे, असा ठराव आला पण ठरावावर पुढे भाषणेच चालू राहिली. ठराव मताला टाकला गेला नाही. १० ऑगस्टला कॅनेडियन एमिसरीमार्फत उत्तर व्हिएटनामचा अध्यक्ष फाम व्हॅन डुंग ह्याच्याकडे खलिता पाठविण्यात आला की, दक्षिणेत साम्यवादी लोक घुसून दंगेधोपे करीत आहेत, तरी त्याला बंदी घालावी व न घातल्यास त्यांना हाकलून दिले जाईल. काहीही उत्तर अध्यक्षाकडून मिळाले नाही.

उत्तर व्हिएटनामच्या बंदरावर हल्ले सुरू झाले. जनरल खान्हनी 'March North' चळवळ उभारली व उत्तर व्हिएटनाममध्ये दक्षिण व्हिएटनामच्या सैन्यांनी घुसावे असे हुकूम सोडले. उत्तरेत War of Liberation ची घोषणा झाली.

नोव्हेंबर १९६४ ला जॉन्सन राष्ट्रपती म्हणून निवडून आला व त्याने व्हिएटनामची जबाबदारी टेलर आणि वुइल्यम बुंडी ह्याच्यावर टाकली.

सायगावमध्ये जनरल खान्ह यांनी एक मंत्रिमंडळ तयार करून त्यांच्यावर सर्व जबाबदारी टाकली; आणि TRAN VAN HUONG ह्याला मंत्रिमंडळाचे मुख्य केले.

४ डिसेंबरला विचारविनिमय करण्यासाठी बुंडी ऑस्ट्रेलिया–न्यूझीलंडकडे गेला. उत्तर व्हिएटनामवर बॉबिंग सुरू करावे ह्या बुंडीच्या म्हणण्याला न्यूझीलंडने संमती दिली नाही. ९ डिसेंबरला बुंडी, जनरल खान्ह, प्रीमियर हुआंग यांची गुप्त बैठक झाली.

सायगावमध्ये दंगेधोपे सुरूच झाले. व्हिएटकॉन्गमधून आलेले क्रांतिकारक निरनिराळ्या ठिकाणी बॉबफेक करू लागले. ५ फेब्रुवारी १९६५ ला कॅंप हॉलोवे येथील हेलिकॉप्टर–बेसवर क्रांतिकारकांनी बॉब टाकले. ९ अमेरिकन मेले व ७६ जखमी झाले.

६ फेब्रुवारी १९६५ ला पहिल्याप्रथम १७ पॅरलल लाईनच्या आत उत्तर व्हिएटनामच्या हद्दीत ४० मैल अमेरिकन नेव्ही जेटस, A/4 स्कायहॉक्स, F/8 क्रूसेडर्स घुसली व त्यांनी डोंघोई लष्करी छावणीवर बॉंबवर्षाव केला.

ह्या युद्धातील हा पहिला बॉबहल्ला. येथून लढाईला तोंड लागले.

७ फेब्रुवारीला जॉन्सनने अमेरिकेचा राष्ट्रदूत जनरल टेलर याला संदेश धाडला की, उत्तर व्हिएटनामवर जोराचे बॉबहल्ले चालू ठेवावेत. नाणावलेले व मुरब्बी जनरलस वुइल्यम वेस्टमोरलंड- व व्हिलर यांना ते पटले नाही, परंतु हुकूम त्यांनी पाळले. ९ फेब्रुवारी व ११ फेब्रुवारीचे हल्ले महाभयंकर झाले. आता तरी समेट करण्यास उत्तर व्हिएटनाम तयार होईल असे वाटले, पण ती आशा फोल ठरली.

बाल्टिमोर येथील जॉन हॉपकिन्स युनिव्हर्सिटीच्या एका समारंभात भाषण करताना जॉन्सनने सांगितले की, त्याने उत्तर व्हिएटनामला संदेश धाडला आहे की, ज्याअन्वये दोन्ही पक्षांनी युद्ध-समेट केला तर मेकाँग नदीच्या खोऱ्यामध्ये अमेरिका १००० कोटी डॉलर्स खर्च करून तो सर्व प्रांत सुपीक करून टाकील व त्याचा फायदा दोघांनाही घेता येईल.

समेट होत नाही असे दिसल्यावर १५ फेब्रुवारीपासून पुन: जोराचे बॉबहल्ले सुरू झाले. तेलाच्या साठ्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. काहीही परिणाम झाला नाही. सर्व व्यवहार सुरळीतपणे चालू होते.

रॉबर्ट मॅकनामारा राष्ट्रपतीला पहिल्यापासूनच सांगत होता की, अमेरिकेला हे युद्ध लढविणे, केवळ 'Gorrila Warfars' असल्याकारणाने, जड जाणार आहे.

ऑगस्ट १९६६ पर्यंत ७० टक्के तेलाचे साठे उडवले गेले. ह्यावेळी व्हिएटनाममध्ये एकंदर ४,४३००० अमेरिकन सैन्य होते, व जॉन्सन अधिक सैन्य, दारूगोळा, हत्यारें व विमाने पुरवीतच होता. १९६७ च्या डिसेंबर अखेरपर्यंत ५,४२,५८८ अमेरिकन सैन्य व्हिएटनाममध्ये असल्याचे स्पष्ट दिसत होते.

संरक्षणमंत्री मॅकनामारा ह्याने ६ ऑक्टोबर १९६६ ला जॉन्सनला रीतसर लिहूनच कळविले की, बॉबवर्षावाला उत्तर व्हिएटनाम भीक घालणार नाही व शिवाय हल्ले चालू ठेवले तर बोलणी-चालणी करण्याला अडथळे येतील. पण जॉन्सनला त्याचे म्हणणे त्यावेळी पटले नाही. ३१ मार्च १९६८ ला मात्र जॉन्सनने कबूल केले की, रॉबर्ट मॅकनामाराचे म्हणणे अगदी बरोबर होते.

१७ जून १९६७ ला पुन: जॉन्सनचे मन वळविण्याचा मॅकनामाराने प्रयत्न केला. त्याचा परिणाम एवढाच झाला की, संरक्षणमंत्रिपदा-

धरून काढून त्याला जॉन्सनने वर्ल्ड बँकेचा चेअरमन करून टाकला.

ह्यावेळी अमेरिकेमध्ये ह्या युद्धाविषयी ३ गट पडले होते. पहिला गट जॉन्सनचा– त्याचे म्हणणे, सावकाश का होईना पण युद्ध चालू ठेवावे. दुसरा गट मॅकनामाराचा– युद्ध बंद करावे व निरर्थक बाँबवर्षाव न करता आपसात बोलणी करावीत आणि ह्या कारणामुळेच ह्या गटाचा 'Disillusioned Doves' ही संज्ञा मिळाली. तिसरा गट चीफ ऑफ स्टाफ वेस्टमोरलंडचा. त्याचे म्हणणे युद्ध करावयाचेच झाले तर सर्व बाजूंनी युद्ध सुरू करून शत्रुसैन्य जेरीस आणावे.

युद्ध जे जातीने रणांगणावर खेळत होते त्याचे १९६४ मध्येच ऐकले असते तर संपत्ती वाचली असती, अफाट सेना मृत्यूमुखी पडली नसती व साम्यवाद्यांशी दहशतीच्या जोरावर समझोता करून घेता आला असता.

पण सर्व फसले. अमेरिका नामोहरम झाली. व्हिएटनाम तर हातचा गेलाच, पण लाओस, कंबोडिया येथे देखील साम्यवाद्यांची पक्कड मजबूत झाली.

दुय्यम सेक्रेटरी ऑफ स्टेट जॉर्ज बॉल, C I. A. चा मॅकोन व अॅडमिरल रॅबोर्न हे युद्ध वाढविण्याच्या विरुद्ध होते व तसे त्यांनी प्रेसिडेंट जॉन्सनजवळ बोलूनही दाखविले. पेंटॅगॉन म्हणते : Ball was cold-blooded in his analysis. He says U. S. A. was pouring its resources down the drain in the wrong place. To cut losses and withdraw from Vietnam should be the policy.' जॉन्सनला बॉलचे म्हणणे पटले नाही.

मार्च १९६७ मध्ये जनरल वेस्टमोरलंड याने अधिक सैन्याची मागणी केली. ह्या महिन्यापर्यंत व्हिएटनाममध्ये एकंदर ६,७१,६१६ एवढे अमेरिकन सैन्य होते.

मे १९६७ मध्ये असिस्टंट सेक्रेटरी ऑफ स्टेट बुंडी, रोस्टॉव्ह, मॅकनॉटन ह्यानी देखील स्पष्टच सांगितले की, अमेरिकेने व्हिएटनाममध्ये अधिक सैन्य धाडणे ही मोठी चूक ठरेल. तसेच उत्तर व्हिएटनामवर बाँबवर्षाव व हायपॉन्ग बंदराभोवती माईन्स पेरण्याने परिस्थिती चिघळेल, स्फोटक होईल व चीन आणि रशिया दोन्ही राष्ट्रे एकत्र येऊन चवताळून उठतील आणि मग मात्र तोंड देणे जड जाईल.

जर सैन्य व दारूगोळा धाडला नाही तर आपण राजीनामा देऊ अशी धमकी जनरल्स वेस्ट मोरलंड व व्हीलर यांनी घातली.

१९ मे १९६७ ला मॅकनमारांनी आपला सल्लागार मॅकनॉटन ह्याला बरोबर घेऊन एक विनतीवजा पत्र तयार केले व ते जॉन्सनला धाडून दिले. मुख्य मजकूर हाच होता की, युद्ध वाढवू नये, अमेरिकेने काढता पाय घ्यावा.'

ह्या वेळच्या प्रेसिडेंट जॉन्सनच्या मनाची स्थिती वर्णन करताना पेंटॅगॉन म्हणते :

"This time he faced a situation where the chiefs were in ardent opposition to Mc Namara and his aides and created a gemmine Policy-Dilemma for President.'

सिनेटर्स स्टेनिस, सिमिंग्टन, जॅकसन, कॅनन, बायर्ड, स्मिथ, मिलर हे जॉन्सनला भेटले व त्यांनी युद्ध शेवटपर्यंत लढवावे, असा सल्ला दिला.

युद्ध अधिक पेटले. Rolling Thunders-57 ह्या बॉम्बर्सनी ५ ते २४ ऑगस्ट ह्या मुदतीत हॅनोईच्या भोवतालची १० मैलांची पट्टी अक्षरशः जाळून टाकली. हायपॉन्ग बंदराभोवती mines पेरण्यात आले. उत्तर व्हिएटनाम स्वस्थ बसून होते. प्रतिहल्ले मुळीच नव्हते.

अमेरिकेत १९६८ मध्ये राष्ट्रपतीच्या होणाऱ्या निवडणुकांकडे ते लक्ष लावून बसले होते. पूर्वीदेखील फ्रान्सच्या विरुद्ध ह्यांनी तेच केलं होतं मेंडिस निवडून येईपर्यंत त्यांनी काही हालचाल केली नाही व तो निवडून आल्यावर बोलणी सुरू केली.

चीन व रशिया ह्यांच्या गुप्त हेरांनी अहवाल सादर केला होता, त्यांनी निवडणुकांविषयी लिहिताना म्हटले होते की, जॉन्सन निवडणुकीला उभा राहणार नसून, रिपब्लिकन निक्सन हा उभा राहणार आहे.

१९६८ साल उजाडलं, परंतु जॉन्सनला सगळीकडे अंधारच दिसत होता. आता तो त्रासिक व द्विधा मनोवृत्तीचा बनला होता. कोठेच यशाची चिन्हे त्याला दिसेनात.

फेब्रुवारी महिन्यात त्याने जनरल वेस्ट मोरलंडला अमेरिकेत बोलावून घेतले व त्याला chief of Staff of Army करण्यात येऊन, भडकलेली आग विझवण्याच्या कार्यक्रमाला सुरवात केली.

२८ फेब्रुवारीला जॉन्सनने आपला जुना स्नेही क्लार्क क्लिफर्ड याला व्हाईट हाऊसमध्ये बोलावून घेतले. ४ दिवस महत्त्वाच्या बैठकी झाल्या. बैठकांना मॅकनमारा, टेलर, पॉल निटझ, हेन्री फाऊलर, निकोलस काटसेनबाच, रोस्टोव्ह, बुंडी, वॉरनके, फिलिफ हबीब ह्या महत्त्वाच्या व्यक्ती हजर होत्या. पेंटॅगॉन पेपर्समध्ये ह्याचा उल्लेख KLIFFORD GROUP असा केलेला आढळतो.

मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच अमेरिकेमध्ये निवडणुकांच्या प्रायमरीजला सुरुवात झाली. यूजेन मॅकार्थी, मिनिसोटा–डेमोक्रॅटिक उमेदवार न्यू हॅंपशामरच्या प्रायमरीजमध्ये हरला व जॉन्सनला थोडी अधिक मते पडली.

१६ मार्चला सिनेटर रॉबर्ट केनेडीने आपण डेमोक्रॅटिक पक्षातर्फे राष्ट्रपतींची निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले.

१८ मार्चला हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हच्या ९८ रिपब्लिकन व ४१ डेमोक्रॅट सभासदांनी ठराव केला की, प्रेसिडेंटनी सांगंत खरी हकिकत–व्हिएटनामविषयी–हाऊसपुढे ठेवावी. ३१ मार्चला जॉन्सननी टी. व्ही. वर भाषण करून आपण उत्तर व्हिएटनामवरील बॉम्बहल्ले बंद करून बोलणी करण्यास तयार असल्याचे सांगितले.

नवीन होणाऱ्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीकडे सगळ्यांचेच लक्ष लागून राहिले होते. व्हिएटनामच्या प्रश्नाकडे बारकाईने पाहण्यास कोणालाच अवसर नव्हता. सर्व सिनेटर्स व कॉंग्रेसमन–जुने व नवे, मंत्री–महामंत्री–अध्यक्ष–उपाध्यक्ष–सर्वजण आपापले असलेले आसन स्थिर कसे करावे, ह्याच विवंचनेत होते. नवनवीन कार्यकर्ते राज्यकारभारात घुसण्याची धडपड करीत होते.

जॉन्सनने जाहीर केले की, आपण निवडणुकीकरता उभे राहणार नाही.

एक पर्व संपले.

१९६८ च्या रिपब्लिकन पक्षातर्फे उभ्या राहिलेल्या निक्सनचे दैव फळफळले.

निक्सन निवडून आला. दुसरे पर्व सुरू झाले.

त्या १९६८ च्या निवडणुकांकडे जरा बारीक दृष्टीने व भेदक नजरेने आपणास आता पाहावयास हवे !

[ क्रमशः [

पुस्तके

प्रतिक्रियेची प्रभावी कविता

# नाकेबंदी

**अशोक प्रभाकर डांगे**

अस्पृश्यता हे भारतीय समाज जीवनाला जडलेलं एक भयंकर पारंपारिक दुखणं आहे. भारतीय जीवन परंपरेनंच उरीपोटी जपलेला तो एक जळता शाप आहे, ज्या परंपरेनं ह्या दुःखाला जन्म दिला आहे त्याच परंपरेनं ते वाढवूनही ठेवलं आहे. अशा शापाला, दुःखाला बळी पडलेल्या समाज घटकांची दुःखं त्याहूनही मोठी आहेत, अशा दुःखाच्या प्रतिक्रीयाच दलित साहित्यातून नोंदवल्या जात असतात. दलितांची दुःखं, त्यांच्या वेदना, आयुष्यावर दिल्या जाणाऱ्या डागण्या ह्यांचेच हे साहित्य प्रतिनिधीत्व करते. ज. वि. पवारांची कविता ह्याच प्रकारात मोडते.

नाकेबंदी हा पवारांचा नवा कवितासंग्रह राजा ढाले यांची प्रदीर्घ प्रस्तावना त्याला जोडलेली आहे. ह्या बत्तीस कविता ह्या प्रतिक्रियेंच्याच कविता म्हणायला हव्यात. ही प्रतिक्रिया प्रस्थापीत समाजानं नाकेबंदी करून टाकलेल्या दलीत समाजघटकाची आहे आणि त्याबरोबर त्याच प्रस्थापित समाजानं राबवलेल्या जीवन मूल्यांचीही आहे. ह्या साऱ्याच कवितांची भाषा जळजळीत आहे.

> 'जाळायचे [illegible]तोय संस्कृतीचे मढे
> जे शतकानु[illegible] तिरडीवर पडून आहे'

संस्कृतीचे मढे जाळायला निघालेल्या माणसाचे हे शब्द 'अॅम्बेसेडर्स हाकणाऱ्या डांबरट माणसांना किंवा 'प्पेटून उठलेल्या स्वतःलाच फ्रिझमधल्या बियरनं शांत करणाऱ्या' किंवा 'ताडामाडागत लांबलेल्या बॅकबॅलन्सवर झोके घेत जगणाऱ्या' माणसांना पचणार नाहीत. हा संताप आहे. ह्यात उपहास आहे. एकीकडे दारिद्र्य आणि दुसरीकडे उपेक्षा ह्यांच्यावर सीसॉ करत जगणाऱ्या दलितांना संस्कृती जाळण्याशिवाय दुसरा पर्यायच सापडू शकत नाही. हा एक आक्रोश आहे. हजारो वर्ष गाडल्या गेलेल्या जिवंत भावनांचा पुनरुच्चार आहे. पवारांनी मांडलेली दुःखं वणव्यागत आहेत. त्यात गवई बंधूंच्या डोळ्यांतून लोंबलेली बुबूळं आहेत. उंदराला समुदायात झोडपावं तसा झोडपला गेलेला दिनू रणदिवे आहे, लाथ खाणारं गर्भारणीचं पोट आहे, सामाजिक अत्याचारांना पवारांनी दिलेलं शब्दरूप, त्यावर मांडलेल्या त्यांच्या प्रतिक्रिया भेदक आहेत.

पवारांचे सारेच शब्द साध्या साध्या व्यक्तित्वाचे आहेत. त्यांची बरीचशी कविता घटनाप्रधान आहे. स्त्रियांची दुःखं मांडताना तर ते अधिकच प्रखर होतात आणि म्हणून जातात.

> **'आभाळाएवढा काळोख तेथील स्त्रिया पोटात साठवत आहेत'**

आभाळाएवढं दुःख उरात घेऊन उघड उघड पोटासाठी जगणाऱ्या आया-माया आणि खोट्या निष्ठांनी शरीर सजवून मिरवणाऱ्या ह्या स्त्रियांतला फरक ते विलक्षण कडव्या शब्दांतून रंगवत नेतात.

> **चोरपावली शरीर विक्रेत्या कल्चर्ड साळ्व्या कोठेही भेटतील**
>
> **झोपड्रीतील आया-माया बेदरकार मंगळसूत्रे गहाण ठेवतील**

नागव्या मनांनी जगणाऱ्या संस्कृती आणि नागव्या जीवनाला सामोऱ्या जाणाऱ्या संस्कृतीतला फरक पवारांच्या कवितेला मोठा करतो. व्यक्तीमत्व आणून देतो. त्यातला उपहास झोंबरा ठरतो.

पवारांच्या साऱ्याच काव्यांत एक चीड आहे.

> **मनाविरुद्ध जन्मल्यापासून मळतो आहे**
> **मळवाट**
> **अन पदरी पडलेल्या गोळाबेरजेने**
> **जीवनाकडे फिरते पाठ**

जीवनाची ही मळवाट चालून जाणाऱ्या पवारांची आदरस्थानंही प्रभावी आहेत. पन्नास वर्षांपूर्वी एका निद्रीस्त समाजाला हादरवून सोडणाऱ्या, चवदार तळ्याच्या काठावर रणशिंग फुंकणाऱ्या डॉ. आंबेडकरांचं वर्णन करताना ते म्हणतात—

> **तू निघालास तेव्हा काळोखाचं राज्य होतं**
> **सूर्य फुलांनी पाठ फिरविली होती**
> **मळवाटेनं जायचं नाकारलेस तेव्हा**
> **खाचखळग्यांनी तुझे स्वागत केले.**

आंबेडकर, बुद्ध यांना मानणारे पवार एकीकडे ज्ञानेश्वरांना झिडकारतात, तुकारामाला तुक्याऽ तुक्याऽ टाळकुट्या म्हणताना दिसतात. तर दुसरीकडे मार्क्सलाही नाकारताना दिसतात. आतड्यात लाव्हा भरून खडबडवणारे आंबेडकर त्यांची दवा असतात तर मार्क्सचे सिद्धान्त त्यांना 'दारू'प्रमाणे भासतात. आपलीही वैचारिक बांधीलकी, घडण, ते 'दवादारू' ह्या कवितेत सहज स्पष्ट करतात. दलित आणि श्रमजिवी या शब्दांना आपण कोणत्याही व्याख्यात बसवलं तरी जगातील तमाम श्रमजिवी आणि दलित समाजाला मार्क्सनंच आशेचा मार्ग दाखवला एवढं मात्र निश्चित म्हणावाच लागेल.

पारंपरिक कवितेचा मार्ग पवार निश्चितच चोखाळत नाहीत. त्यांच्या शब्दांची घडण अत्यंत सहजपणे जाणवत जाते. त्यांची कविता शब्दांपलीकडे जाऊन भिडते. आशयाच्या दृष्टीनं ह्या साऱ्याच कविता समृद्ध आहेत. तर परीणामांच्या दृष्टीनं फारच प्रभावी आहेत. ज. वि. पवारांचा हा नवा कवितासंग्रह दलित साहित्याच्या क्षेत्रांत मोलाची भर टाकतो. *

**नाकेबंदी / ज. वि. पवार**
**मुक्तछंद प्रकाशन,**
**पाच रुपये.**

# ऊर्ध्वगामी

विद्रोही परंपरेबरोबर जाऊ पाहणारा हा कवितासंग्रह, विद्रोही साहित्य सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक शोषणाच्या हकिकती सांगतं. शोषितांना वेदना नसते आणि असलीच तर त्यांनी ती व्यक्तही करायची नसते, ही समजूत आता खोटी पडू लागली

आहे. मागच्या पिढ्यांनी सारे अत्याचार. मुकाटपणे सहन केले. नवी पिढी फक्त बोलत नाही तर ती लिहिते आहे आणि —

'हाडाच्या वेदनेला अर्थ असतील
तर त्यांनाही वदवावे लागतील
वेदनांचे अध्याय !'

म्हणून स्वत:ची भावना, चीड व्यक्त करते आहे.

केशव वसेकरांचा हा पहिलाच कविता-संग्रह आहे. आतापर्यंत अस्मितादर्श, प्रतिष्ठान, मराठवाडा, अभिरुची, युगवाणी, साधना यांमधून त्यांच्या कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत.

आजच्या सामाजिक रचनेत असलेली विसंगती आणि विरोध वसेकरांनी आपल्या कवितांतून व्यक्त केला आहे. या संग्रहात काही कवितांमध्ये एक प्रकारची व्यक्तिगत निराशा व्यक्त झाली आहे. संग्रहाचे शीर्षक ऊर्ध्वगामी आहे. या ऊर्ध्वगामी संकल्पनेला घातक, विरोधी अशा प्रकारची ती व्यक्तिगत निराशा आहे. या कविता कदाचित लेखनाच्या आरंभीच्या काळातील असाव्यात, जिथे निराशेचे मूळ स्पष्ट झालेले नाही किंवा सापडलेले असले तरी ते स्पष्टपणे, प्रभावीपणे कवितांतून मांडता आलेले नाही. सामाजिक विसंगतीतून येणारी चीड, उद्वेग, वैताग, निराशा वसेकर कवितांतून सांगतात— सामाजिक विसंगतीला आव्हानही करतात. ज्यांनी स्वत:च्या हितासाठी तत्त्वज्ञान बनवले, वसेकरांच्या भाषेत सांगायचे तर 'अवैध नीतिमूल्ये' ज्यांनी तयार केली त्या तत्त्वज्ञानाला वसेकर आव्हान देतात—

'समजा आतापर्यंतचं तत्त्वज्ञान
मी सील करून ठेवलं
तर तुम्ही काय कराल ?'

ज्या विचारवंतांच्या हातात, ज्यांच्या लेखणीमध्ये सामाजिक बदल, परिवर्तन घडवून आणण्याचे सामर्थ्य असते, पण प्रतिष्ठेच्या लगामाने ज्यांनी वाचा आणि दिशा मर्यादित झालेली असते, त्यांनी ती आपणहून करून घेतलेली असते, त्या विचारवंतावर वसेकर ताशेरे ओढतात. हे सम्राटांनो ! टेन ओ क्लॉक फुलासारखे, आरसा, चष्मा या कवितांमधून ही चीड अतिशय प्रभावी शब्दांत व्यक्त झालेली आहे.

वसेकरांना आजचं युग हे त्यांचं युग वाटतं. ज्या युगात विचारांसह अभिमुख झालेली त्यांच्यासारखी माणसे आहेत. त्यामुळे या युगाशी बेईमानी करणाऱ्यांना त्यांच्या लेखी काही किंमत नाही. 'निगेटिव्हज्' या कवितेत ते लिहितात :

'या युगाशी विसंगत असणारं भाष्य
आणि भाष्यकार यांना झिरो पॉईंटस्
देऊन
शोरूममध्ये व्यवस्थित ठेवावं
पेंढा भरलेल्या प्राण्यासारखं.'

या कवितांमध्ये उद्वेग, चीड व्यक्त झाली आहे ती 'तुम्ही 'बद्दल आहे. हा तुम्ही एकवर्ण समीकरणाचे पाठ सोडवण्यात मश्गुल झालेला आहे, सोनेरी काड्यांचे चष्मे लावणारा आहे, प्रतिष्ठेचे चष्मे घालून मिरवणारा आहे, गावगंगेच्या महापुरात झोपड्यांची कवाडं वाहून गेली तरी सांस्कृतिक आणि ऐतिहासिक पोवाडे गाणारा आहे, दुसऱ्यांच्या हाडामांसाच्या देहांना शेणामातीचे गोळे समजणारा आहे, दुसऱ्यांच्या कोवळ्या आणि सुकुमार बाळांना चमचाभर दुधासाठी रडवणारा आहे, एरणगाव, किल्वेनमणीचा लांच्छनास्पद इतिहास घडवणारा आहे. या सगळ्या 'तुम्ही 'च्या पार्श्वभूमीवर वसेकरांचा 'मी' बोलत असतो— 'तुम्ही' शी झगडत असतो, त्याला आव्हान देत असतो :

'पेटत गेलो सर्पणासारखा,
नंतर स्वत:ला ऑफ
करताच आले नाही...'

अशी जिवंत प्रतिक्रिया हा 'मी' व्यक्त करतो.

'ऊर्ध्वगामी 'ला वर्गीय जाणिवेचा नुकताच स्पर्श झालेला आहे. या कवितांतून वर्गीय जाणीव प्रभावीपणे मांडलेली नाही. सामाजिक विसंगतीतून झालेल्या जखमा, जिव्हारी बसलेले घाव आलेले कडवट अनुभव मात्र वसेकर व्यक्त करतात.

वसेकरांजवळ भाषेचं सामर्थ्य आहे. त्या सामर्थ्याचा पुरेपूर उपयोग करून घेतात. तीव्र कडवट शब्द वापरून आपली प्रतिक्रिया जिवंत आणि रसरशीत करण्याची कलाही त्यांच्यात आहे. वर्गीय जाणिवेचा स्पर्श या कवितांना होऊ लागला आहे-जवळ समर्थ शब्द आहेत—त्यामुळे नजीकच्या काळात वसेकरांच्या कवितेचा प्रवास अधिक ऊर्ध्वगामी होईल, यात शंका नाही.

या संग्रहाला वामन इंगळे यांची प्रस्तावना लाभलेली आहे. मराठी सामाजिक कवितेचा थोडक्यात आढावा घेतलेलं हे छोटंसं प्रास्ताविक सामाजिक कवितेकडे विशेषत: वसेकरांसारख्या उगवत्या सामाजिक कवितेकडे, त्यांच्या कवितांकडे कोणत्या दिशेने जावे, याबद्दल बहुमोल मार्गदर्शन करणारे आहे. खुद्द कवींनाही ही प्रस्तावना मार्गदर्शक ठरावी.

मानवनिष्ठ जाणीव घेऊन ऊर्ध्वगामी प्रवासाला निघालेल्या या संग्रहाचे स्वागत.

लता भिसे

**'ऊर्ध्वगामी'**
केशव बा. वसेकर
प्रकाशक : मराठवाडा साहित्यिक मित्रमंडळ
वजिराबाद, नांदेड
मूल्य : ७ रुपये.

# Vitamin C And The Common Cold

By Linus Pauling, Nobel Prize Winner (A Pan / Ballantine Book, Pages 132, 30 Pence.)

हे पुस्तक डॉक्टरासाठी नाही परंतु सामान्य जनतेसाठी आहे. लायनस पॉलींग याला दोन वेळा नोबेल पारितोषक मिळाले आहे. एकदा १९५४ साली केमिस्ट्रीसाठी व परत एकदा १९६२ मध्ये शांततेसाठी. (पॉलींगला इतर इतकी मेडल्स मिळाली आहेत व इतर ठिकाणी त्याचा इतका सत्कार झाला आहे की ते सर्व इकडे नमुद केले तर अर्धे पान सहज भरेल. त्यानी ४०० पेपर्स प्रसिद्ध केले आहेत व युद्धावर सुद्धा No More War नावाचे पुस्तक लिहिले आहे. बऱ्याच वेळा त्याच्या मतामुळे अनेक वादळे उठली होती.

हे १३२ पानाचे पुस्तक म्हणजे व्हिटॅमीन C चे इतके गुण गायिले आहेत की ते सर्व

रोगावर एक रामबाण औषध तर नाहीना अशी आपली समजूत होते. मला स्वतःला आलेले अनुभव मात्र मी या लेखाच्या दुसऱ्या भागात प्रामाणिकपणे मांडीत आहे. पण त्याआधी आपण पॉलींगचे काय काय म्हणणे आहे ते 'चिमूटभर मीठ घेऊन' ऐकून घेऊ!

सर्दी पडसे, इन्फ्लुएंझा या व्याधी व्हिटॅमीन C मुळे बऱ्या तरी होतात किंवा त्यांचा जोर एकदम कमी होतो. ह्याचे मूळ कारण म्हणजे व्हिटॅमीन C मुळे शरीराची प्रतिकारक शक्ती पुष्कळ प्रमाणात वाढते. ज्यांना पंडु रोग असतो त्यांनी जर iron असलेले पदार्थ व्हिटॅमीन C बरोबर घेतले तर ते iron शरीरात जास्त प्रमाणात शोषले जाते. काही लोकांना साध्या पडशापासून पुढे Secondary infection होते व ते कर्णाच्या मध्यभागापर्यंत किंवा फुप्फुसात उतरते, तर काहींना सायन्स इन्फेक्शन होते. पॉलींगचे म्हणणे असे की हे व्हिटॅमीन C नियमीत घेतल्यावर इतर व्याधी आपोआप कमी होतील. पॉलिंग असेही म्हणतात की पडशामुळे कितीतरी लोक कामावर जात नाहीत व ते एक प्रकारचे उत्पादनासाठी नुकसानच म्हटले पाहिजे.

तंबाखूमुळे ज्यांना कॅन्सर झाले होते अशा लोकांना १ ग्राम व्हिटॅमीन C (त्याचे दुसरे नाव अॅस्कॉरबीक अॅसीड असे आहे) देण्यात आले व थोड्या आठवड्यानंतर त्यांचे कॅन्सर 'रीग्रेस' (म्हणजे रोगानी तात्पुरती माघार घेतली) झाले! काही शाळकरी मुलांना व्हिटॅमीन C प्रयोगासाठी नियमीत देण्यात आले तर त्यांची बुद्धी अधिक कार्यक्षम झालेली आढळली.

ज्यांना नेहमीच सर्दी पडशाचा त्रास होतो त्यानी हे व्हिटॅमीन नियमीत घ्यायला पाहिजे. पडसे एकदा जोरात झाल्यानंतर ते घेतले तर त्याचा उपयोग कमी होतो. हे व्हिटॅमीन सर्वात जास्त पेरूमध्ये असते. विशेषतः गावरान पेरूत ते सर्वात अधिक असते. त्या खालोखाल सर्व सीट्रस फ्रुटस म्हणजे संत्री, मोसंबी, लिंब, ग्रेप फ्रुट, टॅमॅटो, अननस इत्यादी. आपल्या आवळ्यामध्ये सुद्धा ते भरपूर प्रमाणात असते. पण शिजवल्यामुळे हे व्हिटॅमीन बऱ्याच प्रमाणात नष्ट होते. औषधवाल्याकडे हे व्हिटॅमीन कसे विकत घ्यावे याच्याही सूचना दिलेल्या आहेत. परंतु ते झाले अमेरिकेमधले. औषधवाले आपल्या देशात 'Cecon Soo' नावाच्या गोळ्या बाजारात मिळतात. ही गोळी जेवल्यानंतर (विशेषतः कोणतीही औषधाची गोळी काही खाल्यानंतरच घेतलेली बरी) घ्यावी असे पॉलिंग म्हणतात. लहान मुलासाठी Cecon Drops ग्लीसरीन मिश्रीत मिळतात. त्याचे २०-४० थेंब रोज दिल्यास मुलाची प्रतिकारशक्ती वाढते. आणखीन Celin व Red Oxon ह्या नावाखालीसुद्धा हे व्हिटॅमीन बाजारात मिळते. पॉलिंग तर असे म्हणतात की हे व्हिटॅमीन जास्त प्रमाणात घेतले तरी त्यापासून कोणताच अपाय होत नाही. साधे मीठ जास्त खाल्याने एकदा अपाय होईल. पण C घ्यायला अगदी 'सेफ' आहे. आता काही डॉक्टर्स पडसे झाले की सीट्रस फ्रुटस (लिंब, संत्री) वगैरे वर्ज्य करावयास सांगतात! पण आपल्यास दोन घड्याळे एकाच वेळेला अचूक वेळ दाखवत नाहीत त्याप्रमाणे दोन डॉक्टर्स कधी एकच निदान सांगणार नाहीत.

ह्या व्हिटॅमीनमुळे हार्ट अॅटॅक सुद्धा कमी होतात. कारण रक्तात किती कॉलेस्टेरॉल लिव्हर आहे ते फारसे महत्त्वाचे नसून ते कॉलेस्टेरॉल लीव्हरमध्ये जायला पाहिजे. म्हणजे तिकडे त्याचे bile acid मध्ये रूपांतर होते. म्हणजे आता तुम्ही भरपूर लोणी व तूप खा व बरोबर व्हिटॅमीन C घ्या म्हणजे नुकसान कमी होईल!

मुंबईचे एक नामांकित इंग्रजी दैनिक तर दर तीन-चार महिन्यांनी ह्या व्हिटॅमीनवर लेखच लिहित असते. आणि मथळे ही ('Cold Vitamin' 'Wonder Vitamin' 'C for Cold') मनोवेधक असतात. मला स्वतः आलेले अनुभव आता नमूद करतो.

ज्यांना अॅसिडीटीचा त्रास आहे त्यांनी हे व्हिटॅमीन थोडे जपूनच घ्यावे. कारण मला एकदा जोरात सर्दी झाली असता मी Cocon 500 च्या दोन गोळ्या घेतल्या. (डॉ. पॉलींग तर रोज १ ते ३ ग्रॅमपर्यंत डोस सुचवतात). दुसऱ्या दिवशी माझे पडसे थोडे वाढले व पोट पण बिघडले. परंतु मी डेली डोस कमी केला तेव्हा मला पडशापासून बराच रिलीफ मिळाला. म्हणजे एक गोष्ट निर्विवाद आहे की एका विशिष्ट मर्यादेपर्यंत ह्या व्हिटॅमीनचा फारच फायदा होतो. पण प्रत्येकानी आपल्या प्रकृतीनुसार कमी जास्त डोस घ्यायला हवा. कदाचित अमेरिकेच्या राहणीमानाने डॉ. पॉलींग यांनी डोस सुचवले असतील.


**SOME NEW TITLES RECEIVED**

1. **My Life and Times** – Vol.–1 (Autobiography) By V. V. Giri Rs. 70/–
2. **No Place for Crime** (Police novel-crime) By E. S. Modak Rs. 7/–
3. **Fair Game** (A motion Picture Story–Most electrifying thriller of the year) By Goorge Bartram 12/–
4. **Hold me Captive** (Mills and Boons Romance) By Margaret Pargeter Rs. 6/–
5. **Call of the Outback** (Mills and Boons Romance) By Anne Hampson Rs. 6/–
6. **Paris and My Love** (Mills and Boons Romance) By Mary Burchell Rs. 6/–
7. **Thundorbolt and Lightfoot** (Fast car Chases and gripping crime) By Joe Millard Rs. 11·75
8. **Pistols for Two** (Historical Romance) By Goorgette Heyer Rs. 12/–

☐ *Watching T. V. makes you – a conformist – reading books makes you an individualist !*

**THE PHOENIX LIBRARY**

727, Sadashiv Peth, Opp. Sadashiv Post, Pune – 411 030.

दुसरे असे की सर्दी–पडसे होण्याची बरीच कारणे असतात. साध्या पडशावर अजून रामबाण औषध मिळाले नाही व ते औषध म्हणजे हे व्हिटॅमीन असे पॉलींग म्हणतात. साध्या सर्दीपडशापासून रोज इतके लोक हैराण होतात की असे औषध सापडले तर असंख्य लोक जास्त उत्साहानें काम करू शकतील.

थोड्या वर्षांनी अॅलॉपॅथी, होमिऑपॅथी, आयुर्वेदिक व इतर पद्धती एकत्र येतील त्याचवेळेला बरेच उपाय सापडतील. ह्या बाबतीत मला एक दोन वेळा फार चांगला अनुभव आला.


व्हिटॅमीन C एकटे घेण्याऐवजी ते अॅस्पीरीन व बाराक्षार होमिऑपॅथीच्या औषधाबरोबर घेतली तर एकदा मला झालेला फ्लू एकदम लवकर बरा झाला. मी इतर काही लोकांना व माझ्या घरच्या लोकांना अशी औषधे दिल्यावर पुष्कळच आराम वाटला. मी त्यावेळेला विलमार श्वाब (Germany) ह्या कंपनीच्या नं. ६ च्या ४ गोळ्या व Micropyrin C ची एक गोळी अर्ध्या तासाच्या अंतरांनी दोन वेळा घेतल्या तर मला दोन तीन तासांतच बरे वाटले. ह्या नंबर ६ मध्ये फॅरम फॉस, काली मुर, मॅग्नम फॉस, नॅट्रम मुरी येक्टम, नेट्रम सल्फ अशी बाराक्षाराची औषधे आहेत. अर्थात ती जर्मनी कंपनीची असल्यामुळे फारच बावनकशी असणार. पण ह्याप्रमाणे जर कुणी एकाच गोळीत ही औषधे एकत्र आणली तर खात्रीनें लोकांचा पुष्कळच फायदा होईल. अर्थात तसे करण्यासाठी या औषधात बरेच बदल करावे लागतील. Micropyrin C म्हणजे अॅस्पीरीन व व्हिटॅमीन C कंबाइंड. ह्याच्या जोडीलाच बाराक्षारच्या गोळ्या मी घेतल्या होत्या. ह्या लेखाच्या वाचकांपैकी कुणालाही ह्याप्रमाणे औषधे वापरून सर्दी–पडसे, फ्लू ह्यापासून आराम मिळाला तर त्यांचा अनुभव मला पत्राने कळवावा. ह्या तिन्ही औषधांपासून कोणत्याच प्रकारचे नुकसान होण्याची शक्यता नाही.

अगदी अलीकडे एका ऑस्ट्रेलीयन डॉक्टरने एका मागासलेल्या जमातीवर व्हिटॅमीन C चे प्रयोग केले होते. ह्या जमातीत नवजात अर्भकाचे मरण्याचे प्रमाण दर हजारी ५०० इतके होते. तर ह्या डॉक्टरनी (त्याचे नाव कॅलॉकर्नीयोस असे आहे.) प्रत्येक गर्भवती स्त्रीला व नवजात अर्भकाला ५०० मीलीग्रॅम किंवा त्यापेक्षा कमीजास्त व्हिटॅमीन C दिले. आणि काय आश्चर्य ! हा ५०% Mortality rate दर हजारी ५ मृत्यूपर्यंत घसरला ! जे जंत शरीरात घुसतात त्याला हे व्हिटॅमीन C निष्प्रभ करून टाकतात असे ह्या ऑस्ट्रेलीयन डॉक्टराचे म्हणणे आहे. ही बातमी टाईम्स ऑफ इंडियाच्या २८–१०–१९७६ च्या अंकात आली होती.

मला वाटते की हे व्हिटॅमीन C व होमिऑपॅथीचे Silicea ह्याचे एकत्रीकरण केल्याने अॅसिडिटी होण्याचे प्रमाण बरेच कमी होईल. फक्त अॅसीडिटी होणाऱ्या लोकांनाच ह्या व्हिटॅमीनपासून थोडासा त्रास होण्याचा संभव आहे. एरवी ते तुम्ही जास्त प्रमाणात घेतले तर काहीही नुकसान न होता लघवीतून ते निघून जाईल. हे व्हिटॅमीन C व्हिटॅमीन A सारखे शरीरात ‘स्टोअर’ होऊ शकत नाही म्हणून ते रोजच्या रोजच घेतलेले बरे.

जे. एन. पोंडा
फिनिक्स लायब्ररी


**प्रसिद्ध झाले !**



लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी
१९४८-४९

**लेखक : पु. ल. इनामदार**

**मूल्य : वीस रुपये**

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०**

हिंदी चित्रपट । शिरीष सहस्रबुद्धे

# बालिका वधू

## वाट पाहण्याचा आणि पाहिल्यानंतरचा आनंद

आर. डी. बर्मन हा मोठा गमतीदार गृहस्थ असला पाहिजे, अशी माझी समजूत झाली आहे. म्हणजे असं की, सगळ्याच सिनेमात एकाच साच्याचं, प्रकारचं, पातळीचं संगीत देण्याचं लक्ष्मीप्यारेचं तंत्र त्याला अवगत किंवा मान्य नसावं. तो फ्लॉप् म्युझिक देतो, तेव्हा ते उषा खन्नापेक्षा फारसं दर्जेदार नसतं. पण असे चार–सहा चित्रपट ढकलल्यानंतर एखाद्याचं संगीत तो असं जमवून बनवतो की, त्याला आधीच्या अपराधांची माफी द्यायचा मोह व्हावा. अमर प्रेम, आँधी किंवा खुशबूला त्यानं दिलेलं संगीत ही अशी काही दुर्मिळ पण मोलाची उदाहरणं. अशीच एक अपवादात्मक कामगिरी त्यानं शक्ति सामंतांच्या 'बालिका वधू'साठी बजावली आहे. मला विशेष लक्षणीय वाटलं, ते त्यातलं पार्श्वसंगीत–काळ आणि प्रसंगाचा 'मूड' यांना अनुरूप असलेलं आणि देश–प्रदेश–रीतीचा विचार करून योजलेलं. चित्रपटाच्या श्रेय–नामावलीच्या वेळी वाजवलेली धून हे याचं एक उत्तम उदाहरण. पुढेही भावप्रवण प्रसंगात वाजवलेल्या काही नाजुक, काही लोकसंगीताचा भास देणाऱ्या मंजुळ सुरावली संस्मरणीय आहेत. पार्श्वसंगीताकडे इतक्या बारकाईनं, भावाविष्काराचं एक माध्यम बनावं इतक्या बारकाईनं बघायचा जमाना गेलेला असताना हे एक सुखद आश्चर्य. चित्रपटात गाणी बरीच आहेत, आणि तीही आर. डी. च्या वहिवाटीबाहेरची, म्हणजे कर्णसुखद. 'बडे अच्छे लगते हैं' आणि 'डोलीमें सवार सजनी का प्यार' ही दोन गाणी–त्यातलं दुसरं पालखी-डोलीचं लोकगीत–तर विशेष मनात घोळणारी आणि लोकप्रियसुद्धा. याशिवाय 'जगत मुसाफिरखाना' हे एक पारंपारिक भजन, कुणी नव्या गायकानं चांगलं गायलंय आणि दिग्दर्शकानं दोन–तीनदा अत्यंत अर्थपूर्ण रीतीनं वापरलंय. इतर दोन नृत्यगीतांचा वापरही लेखक-दिग्दर्शक तरुण मुजुमदार यांनी चित्रपटाला भावानुकूल आणि कथेत सुसंगत वाटेलसा केला आहे, हे विशेष.

लेखन–दिग्दर्शन या 'बालिका वधू'च्या संगीताइतक्या जमेच्या बाजू. चित्रपटाची कथा तशी परिचयाची आहे. चाळीस–पन्नास वर्षांपूर्वीची ही कथा बंगालमधल्या बालविवाहाच्या परंपरेशी निगडित आहे. अर्थात बालविवाहाचं यात घडवलेलं दर्शन, त्याच्या सुखी संपन्न पैलूचं आहे, बालविवाह हा इथं 'समस्या' म्हणून वागवलेला नाही. एका समृद्ध घरात सोळा–अठरा वर्षांच्या अमल (सचिन) ची पत्नी म्हणून रजनी (नवतारका रजनी शर्मा) येते, तेव्हा ती असते चौदा वर्षांची, बालिका वधू. त्यानंतर, जेमतेम वर्षभरात घडलेल्या घटनांचं हे चित्रण. म्हणजे पतिपत्नीच्या नात्याचा खरा अर्थ कळून त्यांचं सहजीवन सुरू होईपर्यंतच्याच काळातलं. त्यातही तसे भावनात्मक ताण–तणावे, चढउतार वगैरे काहीच नाहीत. कौटुंबिक जीवनक्रमातलेच हर्षखेद, रागलोभ, सुखदुःखं–बस, एवढंच; आणि याबरोबरीनं बंगालच्या तत्कालीन समाज-संस्कृतीचा अविच्छिन्न धागा. तरुण मुजुमदार यांचं कौशल्य पणाला लागलं आहे, ते बालविवाहाचा हा अपरिचित पैलू आकर्षक रीतीनं मांडण्यात, आणि त्यात ते कसोटीला उतरले आहेत. मुख्य म्हणजे लोकजीवनाची आणि देश-काल-परिस्थितीची नस त्यांनी अचूक ओळखली आहे, आणि म्हणून स्वातंत्र्यपूर्वकालातलं आणि एरवी कालबाह्य ठरलं असतं असं हे कथानक जिवंत आणि रसरशीत वाटतं. स्वातंत्र्यपूर्वकाळात घडलेल्या या कथानकाला, स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारी चळवळीचं एक उपकथानक जोडलं आहे. त्याला 'शेपूट' म्हणणं मला गैर वाटतं, कारण एक तर ते काही कृत्रिमरीत्या चिकटविल्यासारखं किंवा कथेवर बाहेरून लादल्यासारखं वाटत नाही, आणि दुसरं, त्यांच्यावाचून तत्कालीन सामाजिक संदर्भांची चौकट केव्हाही अपुरीच वाटली असती. दोष एवढाच, की बाकीचं चित्र कलात्मक वास्तवतेची कास धरून आखणाऱ्या मुजुमदारांनी स्वातंत्र्यलढ्यासंबंधीचा कथाभाग चाकोरीप्रमाणे ढोबळ व रटाळ घेतला आहे, म्हणजे एक तळमळून म्हटलेलं गाणं वगैरे. अर्थात हे उपकथानक आहेच इतकं लहानसं की मुख्य कथाप्रवाहाला त्याचा अडथळा येऊ नये.

चित्रपटाच्या इतर वैशिष्ट्यात अतिशय देखण्या आणि अर्थपूर्ण छायाचित्रणाचाही उल्लेख केला पाहिजे. पश्चिम बंगालमधल्या एका खेड्यातच चित्रित केलेला हा चित्रपट त्यातल्या निसर्गवैभवामुळे अधिकच समृद्ध आणि सुखद झाला आहे. दुसरी आणि महत्वाची बाब पात्रचित्रण आणि अभिनयाची. त्यातले लेखक-दिग्दर्शकाला धन्यवाद द्यायचे ते अशासाठी की यातली अगदी लहानसहान पात्रसुद्धा 'खरी' वाटतात. म्हणजे ती सिनेमावाल्यांनी 'मेड टू ऑर्डर' बनवलेली कचकडी बाहुली वाटत नाहीत. चित्रपटाची प्रकृती सौम्य असल्याचे जाणून पात्रचित्रणातही उग्र-भडक रंग वापरण्यात आलेले नाहीत. एरवी हिंदी चित्रपटात नायक-नायिका, त्याचे आईबाप वगैरे कौटुंबिक पात्रांचेसुद्धा कसे ठसे-साचे झाले आहेत, हे जगजाहीर आहेच. आणि अभिनेत्यांनीही (बहुधा) आपापल्या भूमिकेची प्रकृती लक्षात घेऊन समजुतदारपणे काम निभावलं आहे. प्रामुख्यानं उल्लेख केला पाहिजे, तो 'बालिका वधू'ची लोभस भूमिका, त्या भूमिकेला शोभेल इतक्याच गोड अल्लडपणे सादर करणाऱ्या रजनी शर्माचा. चित्रसृष्टीतील प्रथम पदार्पणातच ही सुंदर भूमिका तिच्या वाट्याला आली आहे, आणि तिनंही ती जबाबदारीनं केली आहे. (मूळ बंगाली 'बालिका बधू' मध्ये ही भूमिका करूनच हेमंतकुमारची सून मौसमी चतर्जी नावारूपाला आली, हे मी इथं विसरू शकत नाही. अर्थात ते विसरलेलं बरं असं काहीवेळा वाटल्याशिवाय रहात नाही !) तिच्यासमोर सचिनची भूमिका लेखन आणि अभिनय या दोन्ही दृष्टींनी किंचित फिकीच पडलेली आहे, यात शंका नाही. ओम शिवपुरी, एके हनगल (सुद्धा) समाधानकारक चित्रपटाच्या सुरुवातीला अशोककुमारच्या फक्त आवाजाचा केलेला वापर आणि एकंदर सुरुवातच अत्यंत हृद्य आणि हळवी नसली तरी पुरेशी उत्कट.

'बालिका वधू' मुंबईला व इतरत्र प्रदर्शित झाल्याला इतका प्रदीर्घ काळ लोटला आहे, की ह्याच्या 'इन्तजार' मधली मजा संपून निराशा व्हायची वेळ आली होती. इतक्या उशिरानं प्रदर्शित होऊनही शिवाय तो एकदम मॅटिनीला एकाच चित्रगृहात लागावा, हे पुणेकरांच्या चो खंदळ रसिक बद्दलच्या अविश्वासाचं किंवा कटु अनुभवाचं चिन्ह तर नव्हे? □

'क्रेझी बॉईज्' आणि समानतेचा जमाना

# क्रेझी गर्ल्स अॅन्ड अ फनी बॉय

'क्रेझी बॉईज' मालिकेतले (बहुधा) दोन चित्रपट आपल्याकडे येऊन गेले, त्यातला ऑलिंपिक छाप क्रीडास्पर्धेची या उणाख पोरांनी उडविलेली टर तर भलतीच लोकप्रिय झाली होती. 'वांडपणातून सावळागोंधळ उडवून द्यायची मक्तेदारी फक्त पुरुषाकडेच का असावी?' अशा समानतेच्या ईर्षेतून काढल्यासारखा वाटणारा 'क्रेझी गर्ल्स अॅन्ड अ फनी बॉय' सध्या राहूलला दाखल झालेला आहे. अर्थात हा ईर्षेबद्दलचा केवळ माझा तर्क, कारण सिनेमाच्या नावातच, हा सहशिक्षणासारखा सहगोंधळ आहे हे उघड दिसतं. दोन तास मनसोक्त हसणं, आणि तेही डोक्याला अजिबात तकलीफ न होऊ देता, ज्यांना पसंत आहे, त्यांनी बिलकुल चुकवू नये अशा धर्तीचा हा चित्रपट!

अर्थात चित्राच्या शीर्षकात 'क्रेझी गर्ल्स' ना अग्रस्थान मिळालेलं असलं, तरी चित्रपटभर पसरलेल्या सावळ्यागोंधळात सरशी झाली आहे ती मात्र त्या 'फनी बॉय'चीच. अर्थात त्या पोराचे चाळे कितीही 'फनी' असले, तरी त्याला 'बॉय' म्हणून कबूल करणं अंमळ कठीणच आहे, कारण तो आहे एक प्राध्यापक, आणि तोही गणित-संख्याशास्त्राचा. कुठल्याही आदर्श प्रा. ने असावं, त्यापेक्षा काकणभर अधिकच बावळट असलेली ही वल्ली नेमकी एका मुलींच्या बोर्डिंग स्कूलमध्ये चिकटली आहे. तिथल्या वात्रट पोरी तर त्याच्या मागे हरतऱ्हांनी हात धुवून लागलेल्या आहेतच, पण तो स्वतःही काही कमी धांदरट आणि गडबड्या नाही. एका फोटोग्राफर मित्रानं दिलेली 'खास' छायाचित्रांची फाईल आणि आणि आपल्या मेयर असलेल्या वडिलांची भाषणाची फाईल हा गृहस्थ बदलतो आणि मग चूक सुधारण्यासाठी उडालेल्या धावपळीत अनंत उत्पात करतो. रेडइंडियन्सवरच्या एका चित्रपटाचं शूटिंग चालू असताना त्यांच्या घोड्यापाठोपाठ या स्वारीची अगांतुक गाडी घुसते आणि शूटिंगचा बट्ट्याबोळ होतो. तिथून निसटून, हे महाशय दुसऱ्या एका गाडीत शिरतात, तर ती त्यातल्या प्रमुख नटीची निघते, आणि साहेब थेट तिच्या बेडरूममध्ये घुसतात. तिथून परतल्यानंतर, त्याचं आणि त्या नटीचं नाव एकत्र जोडून त्याच्या वडिलांची बदनामी सुरू होते, आणि वडिलांना तर मेयरपदाची निवडणूक जिंकायची असते. मग हे बिनबुडाचं प्रकरण निस्तरण्यासाठी धावपळ सुरू होते, त्यातही भानगडी वगैरे वगैरे...

पटकथालेखक आणि दिग्दर्शक क्लाडड झिदी यांनी चित्रपट उघडउघडच फार्सिकल किंवा कार्टूनकॉमेडीच्या अंगानं घेतला आहे. उगीचच वास्तववादाची भरमार न करता, सेकंदासेकंदाला प्रेक्षकांना हसवायचंच अशा जिद्दीनंच बहुधा झिदीसाहेबांनी कार्यकारणभावासारख्या किरकोळ गोष्टींना बिलकुल भाव दिलेला नाही, आणि तरीही एका गोंधळातून दुसरा गोंधळ सफाईदारपणे उलगडत नेला आहे. आपल्या, किंवा क्वचित पाश्चात्य विनोदी चित्रातही रसभंग करते ती मुख्यतः चित्रपटाची संथ गती. झिदी यांनी मात्र हा दोष टाळून भन्नाट वेगानं हास्यस्फोट वगैरे म्हणतात तसे करण्याची दक्षता घेतली आहे. या वेगामुळे तर्कशुद्ध प्रसंगमांडणीची अपेक्षा करण्याइतका किंवा अतिशयोक्ती हुडकून काढण्याइतका वेळही प्रेक्षकांना रहात नाही. उलट माझ्या मते हसता हसता खुर्चीतून उभं राहावं लागावं इतक्या ताकदीचे प्रसंग निर्माण करण्यातच झिदी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी डाव जिंकला आहे. आंघोळीच्या टबमध्ये पडलेला प्राध्यापक बाहेर पडतो आणि घड्याळांला किल्ली देतो, तेव्हा त्या डबीतनं कारंजासारखे पाण्याचे फवारे बाहेर पडतात, हा असाच एक प्रकार. बदनामीमुळे चिडलेले मेयरसाहेब आपल्या दवाखान्यात (होय, ते डॉक्टरसुद्धा असतात बहुतेक!) जी खाटकाला लाजवणारी शस्त्रक्रिया करतात तो किंवा आपले आणि प्राध्यापकाचे संबंध ज़ोडले गेल्यामुळे खवळलेली जॅकी लोगन, मारामारीच्या दृश्याच्या शूटिंगमध्ये दोन डझन गुंडांचं पानिपत करते तो प्रसंग हेही असेच नामी नमुने. झिदी यांना या हास्यस्फोटात आपल्या सर्वच सहकाऱ्यांचं सहकार्य झकास मिळालं आहे, दुय्यम/लहानसहान पात्रंच नव्हेत तर अगदी मॉबसीनमधली मंडळीसुद्धा अगदी सहजतेनं वावरून, स्वतंत्रपणेसुद्धा हशे वसूल करतात. प्राध्यापक महाशयांच्या भूमिकेत तर पियर रिचर्ड यानं नुसती धेधमाल करून सोडलेली आहे. व्यंगचित्रासारख्या चेहऱ्याची नैसर्गिक देणगी लाभलेल्या या नटानं बावळटपणाचा जो बुरखा पांघरलाय, तोही कवचकुंडलासारखा जन्मजात भासावा यातच त्याचं यश आहे!

--शिरीष सहस्रबुद्धे

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### १।१।७७ ते ७।१।७७

### भारताच्या राजकीय जीवनात धक्का देणारे बदल

वृश्चिक लग्न उदित असताना व वृषभ-चंद्र उदित असताना हा आठवडा उगवत आहे. यावेळी भारताच्या मकर राशीला राजकारणाच्या कारक ग्रह रवी बारावा आहे. त्याचप्रमाणे मंगळ हा सत्तेचा व अधिकाराचा कल्पक असलेला ग्रह बारावाच आहे. गुरू राशीला, आजच्या उदित राशीला बारावाच आहे. या सर्व ग्रहमानांवरून असे स्पष्ट दिसते की, भारताच्या राजकीय जीवनांस अनपेक्षित धक्का देणारे बदल घडून येण्याची दाट शक्यता निर्माण होईल. उच्चपदावर राजकारणी नेते लोकांच्या दृष्टिक्षेपात येतील. नेते लोकांच्या दृष्टीने टीकेचा व उपहासाचा विषय बनतील. महाराष्ट्र आघाडीवर राहील. राजधानी दिल्लीत महाराष्ट्रीय नेते, प्रामुख्याने यशवंतराव चव्हाण लोकांच्या अपेक्षा उंचावतील अशी चिन्हे दिसतात. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी राजकारणात अधिक स्नेहशील बनतील. महाराष्ट्र मंत्रिमंडळात व काँग्रेसमध्ये बदलांची चाहूल लागेल.

**मेष : सुखाची चाहूल**

आजच नव्या वर्षाची सुरवात होत आहे. त्यामुळे नव्या वर्षाचा भविष्यकाळ आपणास गेल्या वर्षापेक्षा सुखाचा जाणार आहे, हे लिहायलाच मला आनंद वाटतो. या आठवड्यात गुरू पहिला व रवी-मंगळ दहावे आहेत ही आशादायक अशीच परिस्थिती आहे. अकरावा शुक्र स्त्रीकडून लाभ करून देणार आहे. स्त्रीच्या भागीदारीत एखादा धंदा सुरू करायला पुष्कळच अनुकूलता आहे. धंद्यातील चढउतार यावेळी कमी होऊन स्थैर्य मिळण्याची चिन्हे दिसू लागतील. नोकरांना शुभ काळ आहे. पगारवाढ व इतर मागण्या सहज मान्य होतील. बेकारांना आता फार काळ नुसती वाट पाहावी लागणार नाही. धंदा अगर नोकरी सुरू होईल. शुभ दिनांक १–४.

**महिलांना :** विवाहेच्छू तरुणींचे विवाह कोणत्याही त्रासाशिवाय पार पडतील.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासावर मन केंद्रित होईल. मनाची चंचलता संपेल.

**वृषभ : प्रगतीला उपकारक**

आज नव्या वर्षाच्या शुभेच्छा व उज्ज्वल भविष्यकाळाचा संदेश देताना मला आनंद होत आहे. केतू व गुरू बारावा असला तरी तुमची रेंगाळत पडलेली अनेक कामे या वेळी मार्गी लागणार आहेत. तुमच्या योजना कार्यान्वित होण्यासाठी तांत्रिक व आर्थिक सहकार्य तुम्हाला अवश्य मिळणार आहे. तुम्ही या वेळी एखादी उद्योगाची योजना आखू शकता. चालू धंद्यात असलेल्या अडचणींचा निरास होऊन तेथे प्रगतीचे नवे पर्व सुरू होणार आहे. तोटा भरून निघेल. सरकार व लोक यांचे मोठे सहकार्य तुम्हाला मिळणार आहे. आरोग्याची आता काळजीच करू नका. आळस, निराशा आता शिल्लक उरणार नाही. भविष्याची स्वप्ने पडतील. नोकरीत अनुकूलता आहे. शुभ दिनांक ४–५.

**महिलांना :** कलावंतांना मोठी मागणी येईल.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासाचे फळ पदरात पडेल.

**मिथुन : दक्षतेने वागा**

आज नवे वर्ष सुरू होत आहे. हे तुम्हाला गेल्या वर्षापेक्षा निश्चितच प्रगतीचे जाईल, याची खात्री बाळगा. आज बाराव्या गुरूचा सासुरवास संपलेला असून तो तुम्हाला पैसा मिळवून देणारा ठरला आहे. बुद्धीच्या जोरावर या वेळी पैसे मिळवण्यासाठी तुम्ही जे जे उद्योग कराल, ते ते तुमच्या पदरात मोठे लाभ घालणार आहेत. रेस, लॉटरी, लेखन, नाट्यव्यवसाय, बँकिंग, व्यापार इत्यादी कोणत्याही बाबतीत तुम्हाला उलाढाल उपकारक व लाभदायक झाल्याशिवाय राहणार नाही. अडचण, बेफिकिरी यांचा आता तुम्हाला उपसर्ग पोचणार नाही. जुने येणे वसूल होईल. नोकरीत कामाचा ताण पडला तरी तुमचा दर्जा वाढणार आहे. प्रतिष्ठा प्राप्त होणार आहे. सहकार्य आणि प्रसन्नता याचे नवे युग सुरू होणार आहे. मात्र वाईट प्रवृत्तीबद्दल दक्ष राहा. शुभ दिनांक ४–६.

**महिलांना :** संसारात प्रसन्नता राहील. नोकरी कायम होईल.

**विद्यार्थ्यांना :** स्पर्धा-परीक्षेत यश मिळेल.

**कर्क : नोकरीत अनुकूलता**

दहावे गुरुमहाराज नव्या वर्षाची आजची सुरवात सुखदायक करील, याची खात्री बाळगा. शनी, रवी, मंगळ प्रतियोग सुरू आहे. त्यामुळे तुमचे सारे तंत्र यावेळी गुरूच्याच हाती आहे. तो तुम्हाला काही कमी पडू देणार नाही. यावेळी तुम्ही कोर्टातील एखादा दावा जिंकला तर आश्चर्य वाटू नये. प्रगतिकारक असे हे सुचिन्ह ठरणार आहे. नोकरीत स्वतःचेच म्हणणे खरे, असे मानू नका. स्थित्यंतर घडेल. काही बाबतीत तुमचे स्वप्न साकार होईल. वरिष्ठांचा विश्वासही संपादन करू शकाल. मात्र वरिष्ठांचा अगर मालकांचा विश्वास गमवणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. सांसारिक जीवनात मतभेदांना वाव देऊ नका. दोघांनीही एकमेकांना समजून वागणे आवश्यक आहे. विशेषतः नवविवाहित जोडप्यांनी अधिक काळजी घ्यावी. शुभ दिनांक ३–४.

**महिलांना :** नोकरीइतकेच घरात लक्ष देणे आवश्यक आहे.

**विद्यार्थ्यांना :** भावनेच्या आहारी जाऊ नका.

**सिंह : सफलता मिळेल**

या आठवड्याची सुरुवातच मुळी वृषभ–चंद्रावर होत आहे व राशीबरोबर रवी–मंगळाचा त्रिकोणयोग होत आहे. त्यामुळे

# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजरातेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १५ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १६ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १७ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १८ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| १९ | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| २० | मॅक्झिम गॉर्की | सुमती देवस्थळे | १० – ०० |
| २१ | लालकिल्ल्यातील अभियोगाची कहाणी | पु. ल. इनामदार | २० – ०० |

**आगामी**

| | |
|---|---|
| प्रतापगड आणि शिवदर्शन | ब. मो. पुरंदरे / श्री. ग. माजगावकर |
| पुरंदऱ्यांची दौलत | ब. मो. पुरंदरे |
| पुरंदऱ्यांची नौबत | ब. मो. पुरंदरे |
| सांगत्ये ऐका | हंसा वाडकर (ति. आ.) |
| संध्याकाळ | गजानन जागीरदार (दु. आ.) |
| शतपावली | रवींद्र पिंगे (दु. आ.) |
| टॉलस्टॉय-एक माणूस | सौ. सुमती देवस्थळे (दु. आ.) |
| मी नेताजींना बघितलंय | अशोक शहाणे |

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०**

निराशा आणि उपेक्षा, अडचणी आणि आपत्ती याने ग्रासलेले गेले वर्ष आता इतिहासजमा होत आहे. हा आठवडा काही शुभकारक घटनांची चाहूल घेऊन येत आहे. तुमच्या जीवनात नव्या पर्वाची सुरुवात होत आहे. नोकरीधंद्यातील अनेक प्रकारच्या इच्छाआकांक्षा सफलतेचे सुवर्णकण घेऊन जीवनात प्रवेश करणार आहेत. हक्काचे जे लाभ दूर पळून गेले होते ते आता अपेक्षेपेक्षा सहजसुलभतेने पदरात पडणार आहेत. अधिकाराचा शिरपेच डोक्यावर बसेल. वरिष्ठांना तुमची गरज भासेल. तुमच्या भावना ते जाणून घेतील. चालू धंद्यात प्रगतीचे नवे पर्व सुरू करता येईल. व्यापार सुधारेल. परदेश-प्रवास सहज घडून येईल. आरोग्याच्या तक्रारी दूर होऊन उत्साह व प्रसन्नता यांचे नवे वारे वाहू लागतील. शुभ दिनांक २–५.

**महिलांना :** मानसन्मान घेऊन हा आठवडा येत आहे.

**विद्यार्थ्यांना :** आर्थिक बळ उत्तम राहील.

## कन्या : अर्थप्राप्ती

आज नव्या वर्षाची सुरुवात होत आहे. हे वर्ष आपणास गतवर्षापेक्षा सुखदायक जावो, ही शुभेच्छा. या आठवड्यात आठवा गुरू मानसिक स्थिती जरी शंकित ठेवणार असला तरी तसे काहीच प्रतिकूल नाही. सुखस्थानी धनराशीत असलेल्या रवी-मंगळाच्या हाती तुमच्या यशाची सारी सूत्रे आहेत. त्यामुळे कोणत्याच बाबतीत काही उणे पडणार नाही. नोकरीत विरोधकांनी उचल खाल्ली तरी ते तुमचे काहीच वाईट करू शकणार नाहीत. उलट कार्यक्षमतेचा प्रभाव वाढेल. जुनी कामे उरकून घ्याल. वरिष्ठांना आपले म्हणणे पटवून देण्यात यश मिळवाल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. घरगुती कामात लक्ष द्यायला सवड मिळेल. पत्नीचे उत्तम सहकार्य मिळेल. शुभ दिनांक ३–६.

**महिलांना :** घरच्या कामात मन लागेल. कौटुंबिक संबंध सुधारतील.

**विद्यार्थ्यांना :** बुद्धीच्या प्रभावाने शिक्षकांना चकित कराल.

## तूळ : उद्योगात नवे पर्व

नव्या वर्षाच्या आजच्या सुरुवातीलाच चंद्राचा त्रिकोण योग होत आहे. तिसरे रवि–मंगळ आणि सातवा गुरु हे ग्रहमान झाले छान आहे असे की गेल्या कित्येक वर्षांत इतका छान ग्रह योग झाला नव्हता. आजवरच्या तुमच्या प्रयत्नाचे फार मोठे यश तर तुमच्या पदरात पडणार आहेत. शिवाय आजच्या काळातील विक्रमी कर्तृत्वाला नवे क्षेत्र तुम्हाला उपलब्ध होणार आहे. तुमचा धंदा नव्या जोमाने अंग धरणार असून त्यापासून भरपूर लाभ होईल. एखादी चागली योजना जर घडून राहिली असेल तर तिला यावेळी चालना मिळणार आहे. नफ्याचे प्रमाण काढून सरकारी आश्रयहि मिळणार आहे. नोकरीत अस्ममान्य असे स्थित्यंतर घडून येईल. कर्तृत्व दाखवण्याची मोठी संधी उपलब्ध होईल. भाग्य उजळून निघेल. पैसा भरपूर मिळेल. शुभदिनांक २–५

**महिलांना :** नोकरीत आनंददायी असा बदल संभवतो.

**विद्यार्थ्यांना :** संगीत क्षेत्रात नांव चमकेल.

## वृश्चिक : कौटुंबिक प्रश्न मिटेल

आज प्रथमच नव्या वर्षाच्या शुभेच्छा तुम्हाला देताना मला आनंद होत आहे. यावेळी सुखस्थानी चंद्र आहे तर गुरु शत्रूस्थानी आहे. रवि–मंगळ दुसरे आहेत. सामन्यतः हा आठवडा अनुकूल आहे. कौटुंबिक समस्या सुटतील. कामाबद्दल भांडणे मिटतील स्थावरोचा वाद तडजोडीने मिटेल. प्लॉट, घर असे काही तुम्हाला हवे असेल तर त्याला हा आठवडा अनुकूल आहे. घर बांधणीचा मुहूर्तहि यावेळी करू शकाल. धंदा सुधारेल. भांडवल मिळेल. पण भागीदारीत तरी धंदा करू नका. शेतीचा व्यवसाय किफायतशीर होईल. उत्पन्न मिळेल. उसाचा व्यवसाय चालेल. नोकरीत मनासारखे असे काही घडेल यावर विश्वासून राहू नका. मात्र वरिष्ठांबरोबरचेसंबंध सुधारतील प्रमोशन मिळण्यासाठी अनुकूल परिस्थती हळूहळू निर्माण होईल. बदली होण्याची शक्यता आहे. शुभदिनांक ३–५

**महिलांना :** नोकरीत अनपेक्षित अनुकूल बदल होईल.

**विद्यार्थ्यांना :** वाहन हाकताना फार दक्ष राहा.

## धनु : वर्चस्व राहील

आज सुरू होणारे नवे वर्ष आपल्या इच्छाआकांक्षा सफलतेच्या मार्गावर आणील यात शंका नाही आज पहिलाच दिवस राशीतील रवि–मंगळाचा गुरुबरोबर त्रिकोण योग करून आहे. त्रिकोण योग म्हणजे आजायी क्रांतिकारक अनुकूल काळाची माहीच होय! गेल्या वर्षास जे मनोरथ पूर्ण होऊ शकली नाहीत किंवा अडचणी आल्या ते मनोरथ यावेळी पुरे होतील. तुमची अध्यात्मिक शक्ति वाढेल. धार्मिक बाजू सुरळीत होईल. यावेळी प्रामुख्याने नोकरीत काही तरी आशादायक घडेल. प्रभाव व प्रतिष्ठा वाढेल. स्थैर्य प्राप्त होईल. पगार वाढीसंबंधी अनुकूलता राहील. अनपेक्षित प्रभाव घडू शकेल. महत्त्वाची कामगिरी हातून घडेल. आर्थिक स्थिती सुधारेल. देणे घेता येईल. येणे वसुल होईल. मन प्रसन्न राहील. उत्साह वाढेल. अनेक नवे संबंध जुळतील. ते उपकारक जाईल. शुभदिनांक ३–५

**महिलांना :** धार्मिक कार्य फार पडेल. व्रतवैकल्ये पार पडतील.

**विद्यार्थ्यांना :** संस्कारीत मनाने नवे विषय आत्मसाद कराल.

## मकर : धाडस जपून करा

कर्तबगार म्हणून नावाजलेली मकर राशीची माणसे आज सुरू होणाऱ्या वर्षात देखील भलतीच गाजणार आहेत. नवे वर्ष सुखसमृद्धीचे जावो ही शुभेच्छा! या आठवड्यात गुरू चौथा व रवी-मंगळ बारावे अशी ग्रहरचना आहे. काही तरी लोकविलक्षण करण्याची तुमची धडपड या आठवड्यातदेखील प्रत्ययाला येईल. मात्र यावेळी तुमच्या वाट्याला लोकप्रियता येणे जरा कठीणच आहे. वैयक्तिक खर्चात काटकसर करणे आवश्यक वाटेल. उसने पैसे मिळणार नाहीत. नोकरीत वरिष्ठांबरोबर खटके उडतील. मात्र त्यामुळे काही अनुचित घडणार नाही. आपल्या मागण्या काळजीपूर्वक मांडा. वरिष्ठ जागी कामे करणाऱ्यांनी

हाताखालच्यां लोकांना दुखवू नये. शुभ दिनांक ४–७.

**महिलांना :** मनःस्वास्थ्य थोडे कमीच राहील. नोकरीत कामाचा शीण होईल.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षार्थींनी उत्तरे वरवर लिहू नयेत.

### कुंभ : अनपेक्षित बदल

आज सुरू होणारे नवे वर्ष सुखाचे व उत्कर्षाचे जावो, ही शुभेच्छा तुम्हाला देताना, मला आनंद होत आहे. यावेळी अंतरिक्षातील ग्रहमान तुमच्यावर एवढे खूष आहे की, तुमच्या ध्यानीमनी नसताना तुम्हाला जर एखाद्या 'पदाचा' योग आला तर तुम्ही आश्चर्य मानू नये. राजकारणात तुमचे यावेळी मोठेच कौतुक होणार आहे. कर्तबगारीचा प्रभाव पडून लोकांच्या स्तुतीचा वर्षाव होणार आहे. नोकरीधंद्याची स्थिती समाधानकारक राहील. अकरावे रवी-मंगळ रेस-लॉटरीत तुमचे नशीब बहरून टाकू शकतील. व्यापारात अंदाज अचूक उतरतील व नफा भरमसाट मिळेल. व्यापार अथवा एखादा आवडता धंदा सुरू करा. ग्रहाची कृपा आहे. आरोग्यात चांगली वाढ होईल. प्रवासात वेळ सुखाचा जाईल. नोकरीत प्रमोशन मिळेल. शुभ दिनांक ३–६.

**महिलांना :** अनेक दिवस मनाशी बाळगलेल्या इच्छा पुऱ्या होतील.

**विद्यार्थ्यांना :** यश व प्रगती सहज हाती येईल.

### मीन : नोकरीत उत्कर्ष

आज सुरू होणारे नवे वर्ष तुम्हाला भाग्यवर्धक जाईल, यात शंकाच नाही. दुसरा गुरू राशिस्वामी आहे. तो तुमचे आर्थिक स्वास्थ्य सांभाळणार आहे. दहावे रवी-मंगळ धंदा व नोकरीचे क्षेत्र संरक्षण करणार आहे. नोकरीत अनपेक्षित अनुकूल बदल होईल. सन्मानाचा योग येऊन, बढती मिळून मोठे अधिकार प्राप्त होतील. सार्वजनिक दृष्टीने मानसन्मान होईल. लोकांकडून अनुकूल पत्रे येतील. चालू धंद्याची स्थिती सुधारेल. त्यात भांडवलगुंतवणुकीसाठी मदत मिळेल. जमिनीचा प्रश्न सुटेल. कोर्टकचेरीचे काम मार्गी लागेल. बरेच दिवस वादात पडलेला स्थावराचा प्रश्न तडजोडीने मिटू शकेल. कौटुंबिक स्वास्थ्य मिळेल. लेखकांना व पत्रकारांना दिलासा देणारा आठवडा आहे. शुभ दिनांक २–६.

**महिलांना :** स्वावलंबी बनण्यासारखा धंदा सुरू होईल.

**विद्यार्थ्यांना :** आजवर केलेल्या श्रमाचे चीज होऊन आनंद मिळेल. □

## आर्थिक वृद्धीचा अंत : पृष्ठ ७ वरून

समस्या त्यांना गैरलागू आहे ? तर तसे नाही. हे निष्कर्ष जगातील सर्वच राष्ट्रांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. विकसनशील देशांनी केवळ वृद्धीचे धोरण अवलंबिणे म्हणजे वृद्धीविषयी नकारात्मक भूमिका घेणे होय. उलट लोकसंख्येच्या नियंत्रणाविषयी काही निश्चित धोरण आखणे अत्यावश्यक व निकडीचे आहे. त्यामुळे वृद्धीचे धोरण अर्थपूर्ण होईल.

तसेच वृद्धीचे धोरणही अधिक डोळसपणाने अंगीकरणे आवश्यक आहे. त्यांची आजची विकासाची दिशा दूर चीनचा काही अंशी अपवाद सोडता पाश्चात्त्य देशांत ज्या दिशेने गेली तीच आहे, त्या वाटेवरचा धोका या अभ्यासाने दाखविला आहे. त्यामुळे आपले विकासाचे चित्र आखीत असताना अभ्यासगटाने सुचविलेल्या समतोलाशी सुसंगत असे आखणे शक्य व अगत्याचे आहे. या देशातील मुख्य प्रश्न अधिक उत्पादनाचा व त्यातून उंचावणाऱ्या राहणीमानाचा असला तरी 'राहणीमान' कशाचे बनवायचे व त्याचा मापदंड व त्याची मर्यादा कोणती, हे प्रश्न शिल्लक राहतातच. हा निर्णय प्रगत देशांची नक्कल करून घेतला जाणारा असेल तर जगाचा विनाश अटळ आहे.

अखेरीला, ज्या 'क्लब ऑफ रोम' या संस्थेने हा अभ्यास आयोजित केला होता, त्याचे या अहवालावरचे भाष्य पाहणे उद्बोधक ठरेल. या क्लबचे सभासद अभ्यासगटाच्या निष्कर्षाशी सहमत होताना म्हणतात "अधिकाधिक बिघडत जाणारा समतोल व भीतिदायक प्रमाणात खालावलेली जागतिक परिस्थिती ही त्वरित व मूलतः बदलणे हीच आजच्या मानवी समाजापुढील महत्त्वाची जबाबदारी आहे." हा विनाश टाळण्यासाठी जे काही करायचे ते त्वरेने करणे तर आवश्यक आहेच पण तेही कोणत्या एका देशाने करणे परिणामकारी होणार नाही, ते उभ्या जगाने एक होऊन करणे आवश्यक आहे. हे केल्यास अभ्यासगटाने सुचविलेला समतोल निर्माण करणे शक्य आहे. परंतु याकरता प्रत्येक राष्ट्राला आपल्या राजकीय व आर्थिक वर्चस्वाच्या आकांक्षा पूर्णपणे सोडाव्या लागतील. हा समतोल म्हणजे स्थितिशीलता नव्हे. असा अर्थ केला तर आज जे आर्थिकदृष्ट्या मागासलेले देश आहेत त्यांचा विकास थिजला पाहिजे असा त्याचा अर्थ होईल. मागास देशांच्या दृष्टीने अशा समतोलाचा आग्रह म्हणजे वसाहतवादाचे नवे रूपच ठरेल. अभ्यासवर्गाने सुचविलेला समतोल प्रस्थापित करण्यासाठी जर काही प्रयत्न केले नाहीत तर ज्या आपत्ती येत्या ३०–४० वर्षांत निर्माण होतील त्याकरता प्रत्येक राष्ट्र आपल्या हिताच्या दृष्टीने उपाय शोधण्याचा प्रयत्न करील व त्याचे दुष्परिणाम इतर देशांवरही होतील व त्यामुळे विनाशाचा काळ शीघ्रतेने जवळ येईल, हे सर्व राष्ट्रांनी जाणणे आवश्यक आहे. □

● संदर्भ : *The limits to Economic Growth,* (A Report For the Club of Rome's Project on The Predicament of man), by Donella H. Meadows and others.

[ समाज प्रबोधन पत्रिका : जुलै-ऑगस्ट १९७६ अंकावरून लेख साभार पुनर्मुद्रित ]